म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८०१८
१८२२
REFBK-0002136

# अभिनवकाव्यमाला

## भाग पांचवा

केवळ आधुनिक कवयित्रींच्या काव्यांचाच संग्रह.

—:0:—

संपादिका
सौ. सरस्वतीबाई भिडे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण,
[redacted] बुधवार चौक, पुणें शहर.

श. १८२२.

किंमत एक रुपया.

शारदाप्रसादनमंडळ, पुणें.

# अभिनवकाव्यमाला

## भाग पांचवा

यांत केवळ आधुनिक कवयित्रींच्या काव्यांचा संग्रह केला आहे.

REFBK-0002136

REFBK-0002136

संपादिका

सौ० सरस्वतीबाई भिडे

शके, १८४३; इ. स. १९२२

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—

नवीन किताबखाना, बुधवार चौक पुणें.

किंमत एक रुपया

BHAVE

भावे आळी ... बुकसेलर्स व ...

... दा. क. 2136

मुद्रक

लक्ष्मण भाऊराव कोकाटे, "हनुमान" प्रेस

सदाशिव पेठ, पुणें सिटी.

प्रकाशक

विद्याधर हरि दामले, मालक, नवीन किताबखाना,

बुधवार चौक, पुणें सिटी.

# शारदाप्रसादनमंडळ, पुणें.

## या संस्थेची संक्षिप्त हकीकत.

पुणें येथें इ. स. १९०९ सालच्या मे महिन्यांत रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर, रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले व रा. विद्याधर वामन भिडे हे तीन गृहस्थ एके ठिकाणीं जमले व त्यांनीं, आधुनिक पद्यात्मक वाङ्मय लहान लहान पुस्तकांच्या द्वारें संगृहीत करावें अशा उद्देशानें, आपल्या तिघांचीच एक सभा स्थापन केली व तिला 'शारदाप्रसादनमंडळ' हें नांव दिलें. संस्थेचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां मंडळानें एक पुस्तकमाला सुरू केली. तिचें नांव 'अभिनवकाव्यमाला' असें आहे. हिचे आजपर्यंत चार भाग प्रसिद्ध झाले आहेत. हिचा चवथा व साहावा असे दोन भाग लवकरच बाहेर पडतील. बारा वर्षांतली मंडळाची ही कामगिरी विशेष आहे अशांतला अर्थ नाहीं. तथापि मंडळाचे नियम यापुढें दिले आहेत ते पाहिले असतां; काव्याची अभिरुचि, त्याच्या वाचकवर्गाची संख्या व प्रचलित शिक्षणक्रमांत त्याला मिळणारें स्थान यांचा विचार केला असतां; तसेंच निरपेक्षपणें मालेच्या भागाचें संपादकत्व पतकरण्याची व तें योग्य रीतीनें पार पाडण्याची हौस लोकांत कितपत आहे ही गोष्ट मनांत आणली असतां, अभिनवकाव्यमालेच्या बाबतींत मंडळाला दोष देण्याचें साहस कोणीहि समंजस माणूस करणार नाहीं असें वाटतें. मालेचे पहिले तीन भाग लोकांपुढें आहेत. त्यांच्या मुद्रणखर्चासंबंधानें कशी तरी तोंडमिळवणी झाली. मालेच्या नियमांप्रमाणें कवींनीं आपापल्या पुरता मुद्रणखर्च द्यावा असें आहे. पण हा नियम प्रस्तुत पांचव्या भागासंबंधानें अक्षरशः अंमलांत आणतां आला नाहीं. कांहीं थोड्या कवयित्रींनीं संतोषपूर्वक मदत केली आहे. पांचव्या भागाच्या खर्चाचा बराच मोठा बोजा मंडळावर पडला आहे. मराठी काव्यवाचक, राजेरजवाडे व संस्थानिक उदार मनानें या भागाला आश्रय देतील व मंडळावरचा भार कमी करतील अशी आशा आहे. मंडळाच्या विनंतीला मान देऊन सौ. सरस्वतीबाई भिडे यांनीं हा भाग संपादिला याबद्दल मी मंडळातर्फे त्यांचे आभार मानतों.

मंडळाचे कायमचे सभासद वरतीं दिलेच आहेत. मंडळाचे कायमचे अध्यक्ष रा. सा. कानिटकर होते व कायमचे चिटणवीस रा. लक्ष्मण-शास्त्री लेले आहेत. मंडळाच्या कार्यकारीसभेची रचना प्रथम अशी होती:—रा. सा. कानिटकर–कायमचे अध्यक्ष. रा. लक्ष्मणशास्त्री लेले—कायमचे चिटणवीस. रा. विद्याधर वामन भिडे बी. ए., रे० नारायण वामन टिळक व रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए. हे कायमचे सभासद होते. शेवटल्या दोन गृहस्थांस मंडळानें सभासद करून घेतलें होतें.

मंडळ स्थापन झाल्यापासून आज बारा वर्षांत मंडळाची फार हानि झाली. माझे मित्र व मंडळाचे कायमचे अध्यक्ष रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर व कायमचे सभासद रे. टिळक हे सहृदय रसिक कवि दिवंगत झाले ! तसेंच अभिनवकाव्यमालेशीं कवि या नात्यानें ऋणानुबन्धी असलेले डॉ. कीर्तिकर, गणेश जनार्दन आगाशे, कोऽपि, माधवानुज, कवि वसंत, रेंदाळकर, बालकवि ठोमरे, गोविंदाग्रज, लेंभे इत्यादि गृहस्थही कालवश झाले ! मालेशीं साक्षात् संबंध नसलेले मोगरे, ह. ना. आपटे, लोंढे इत्यादि कविही स्मृतिशेष झाले ! कवि मालेचें सौभाग्य किंबहुना जीवनच होत. त्यांच्या अत्यंत वियोगानें मंडळाला पराकाष्ठेचें दुःख होत आहे ! तथापि, मंदगतीनें व अल्प प्रमाणानेंच कां होईना, आपलें अंगीकृत कार्य शारदाप्रसादनमंडळ पुढें चालू ठेवणार आहे. मराठी कवींची परंपरा अखंडित चालू राहो, एवढीच त्याची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

मंडळाचे अध्यक्ष रा. सा. कानिटकर हे निवर्तल्यामुळें त्यांच्या जागीं दुसऱ्याची नेमणूक करावी लागली. तसेंच परिस्थितीप्रमाणें व व्यवहार-सौकर्याच्या दृष्टीनें मंडळाची घटना व नियमही सुधारून तयार करावे लागले. ते पुढे दिले आहेत. अभिनवकाव्यमालेच्या तिसऱ्या भागाच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तींत मंडळाचे नियम छापले आहेत ते यापुढें रद्द समजावे.

पुणें.
८, जानेवारी १९२२.

लक्ष्मणशास्त्री लेले.
चिटणवीस—शारदाप्रसादनमंडळ, पुणें.

# शारदाप्रसादनमंडळ, पुणें.

## १. स्थापना.

पुणें—इ० स० १९०९.

## २. घटना.

### (विद्यमान शारदाप्रसादनमंडळ.)

रा० रा० विद्याधर वामन भिडे, बी. ए., कायमचे अध्यक्ष.
रा० रा० लक्ष्मण गणेशशास्त्री लेले, कायमचे चिटणवीस.
रा० रा० बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए. } कायमचे सभासद.
काव्यकल्पलता श्रीमती सारजाबाई बापट. } कायमचे सभासद.

### ( विद्यमान कार्यकारी मंडळ. )

रा० रा० विद्याधर वामन भिडे, बी. ए., कायमचे अध्यक्ष.
रा० रा० लक्ष्मण गणेशशास्त्री लेले, कायमचे चिटणवीस.
काव्यकल्पलता श्रीमती सारजाबाई बापट, कायम सभासद.

## ३. हेतु.

आधुनिक मराठी काव्यवाङ्मयाचें लहान लहान पुस्तकांच्या द्वारें प्रकाशन करून त्यास चिरस्थायित्व आणण्याचा प्रयत्न करणें.

## ४. साधन.

वरील हेतु सिद्ध करण्याकरितां मंडळानें अभिनवकाव्यमाला ही पुस्तकमाला काढिली आहे.

## ५. नियम.

(१) अभिनवकाव्यमालेचा एकेक भाग दोन वर्षांनीं तरी बाहेर पडेल असा प्रयत्न व्हावा. ( २ ) या भागाचा आकार क्राउन षोडशपत्री असून त्याचीं पृष्ठें १६०–१९२ पर्यंत असावीं. ( ३ ) भागाची किंमत एक रुपयापेक्षां अधिक नसावी. ( ४ ) भागाच्या प्रती एक हजारापासून दोन हजारांपर्यंत काढाव्या. ( ५ ) एका कवीची कविता एकाच भागांत दोन फर्म्यांपेक्षां अधिक असूं नये. ( ६ ) कवीची कविता होतां होईल

तों अमुद्रित किंवा दुर्मिळ असावी. ( ७ ) कवीनें आपल्या कवितांपुरता मुद्रणखर्च द्यावा. तो कवितांबरोबरच कवीनें संपादकांच्या हवालीं करावा. ( ८ ) मुद्रणखर्चाचा आकार संपादकांनीं त्या त्या वेळच्या छपाईच्या भावाप्रमाणें करावा. ( ९ ) मुद्रणखर्चाची जेवढी रक्कम कवीनें दिली असेल तेवढ्या रकमेच्या किंमतीचीं पुस्तकें संपादकांनीं कवीला नजर करावीं. ( १० ) कवींकडून मिळालेल्या रकमेंतून संपादकांनीं छपाईचें बील चुकतें करावें; व त्याची पावती मंडळाच्या चिटणविसांकडे द्यावी. ( ११ ) विनंतीपत्रें, पत्रव्यवहार, प्रुफतपासणी वगैरे कामाला लागणारा खर्च संपादकांनीं संपादित पुस्तकांच्या रूपानें मंडळाच्या चिटणविसांच्या लेखी अनुमतीनें भागवावा. ( १२ ) संपादकांनी छापण्याकरितां तयार केलेली हस्तलिखित प्रत कार्यकारीमंडळाच्या अध्यक्षांस किंवा चिटणविसांना दाखवावी व त्यांची लेखी मान्यता घेऊन छापण्याचें काम करावें. ( १३ ) पुस्तक छापण्यास घेण्यापूर्वीं संपादकांनीं आपण पुस्तक कोणत्या छापखान्यांत छापविणार, त्याच्या प्रती किती काढणार व त्याची किंमत काय ठेवणार याविषयींची लेखी माहिती चिटणीस यांस द्यावी. ( १४ ) पुस्तकाचा सगळा खर्च वजा जातां शिल्लक राहतील तीं पुस्तकें संपादकांनीं कार्यकारी मंडळाचे चिटणवीस यांच्या स्वाधीन करून त्याची पावती घ्यावी. (१५) संपादकांनीं आपल्या भागास लहानशी प्रस्तावना लिहावी व तिच्यांत संपादित पुस्तकाचें स्वरूप अभिव्यक्त करावें; तसेंच पुस्तकाच्या पाठीवर मालेच्या सर्व भागांची सविस्तर जाहिरात द्यावी. ( १६ ) कार्यकारी मंडळानें बहुमतानें योग्य संपादकांची योजना करून त्यांस तें काम करण्याविषयीं लेखी विनंति करावी. [१७] मंडळाच्या नियमांप्रमाणें आपण काम करण्यास तयार आहों अशी संपादकांची लेखी मान्यता मिळाल्यास त्यांस पत्र लिहून मंडळानें त्यांची नेमणूक कायम करावी. ( १८ ) संपादकांनीं मंडळाच्या नियमांचें उल्लंघन केल्यास त्याची जबाबदारी त्यांचेवरच राहील. मंडळावर राहणार नाहीं. [ १९ ] मंडळाचें कार्यालय पुणें येथें कायमचें असावें. [ २० ] काव्यमालेच्या कोणत्याही भागांत ज्याची कविता छापली गेली असेल तो गृहस्थ मंडळाचा सामान्य सभासद होतो. [ २१ ] अशा सभासदाला मंडळाच्या चिटणविसांच्या

मार्फत मंडळाला योग्य त्या सूचना करण्याचा अधिकार आहे. [२२]मंडळाच्या सामान्य सभासदानें एकदम पन्नास रुपयांची देणगी मंडळाला दिल्यास त्याला मंडळाचा कायमचा सभासद होतां येतें. पण याला मंडळाच्या कायमच्या सभासदांच्या बहुमताची आवश्यकता आहे. [ २३ ] सामान्य सभासद नसणाऱ्या कोणत्याही गृहस्थास एकदम शंभर रुपये देऊन मंडळाचे कायमचे सभासद होतां येतें. पण याला मंडळाच्या कायमच्या सभासदांच्या बहुमताची आवश्यकता आहे. [ २४ ] मंडळांत एक कायमचा अध्यक्ष, एक कायमचा चिटणवीस व बाकीचे कायमचे सभासद असावे. [ २५ ] कार्यकारी मंडळांत एक कायमचा अध्यक्ष, एक कायमचा चिटणवीस व एक सभासद असे तीनच अधिकारी असावे व यांची नेमणूक मंडळाच्या कायमच्या सभासदांच्या बहुमतानें व्हावी. [ २६ ] मंडळांतील कायम सभासदाची जागा मृत्यूमुळें किंवा अन्य अपरिहार्य कारणानें रिकामी झाली तर मंडळाच्या कायमच्या सभासदांनीं ती आपणांतील कोणाची तरी बहुमतानें निवड करून भरून काढावी. ( २७ ) कार्यकारी मंडळांतील जागा अशा प्रकारें रिकामी झाली तर ती मंडळाच्या कायमच्या सभासदांनीं बहुमतानें भरून टाकावी. [ २८ ] कोणाही योग्य गृहस्थास मंडळाचा कायमचा सभासद बिनशर्तपणें करण्याचा अधिकार मंडळास आहे; मात्र अशा बाबतींत मंडळाच्या सर्व कायमच्या सभासदांचें ऐकमत्य असलं पाहिजे. [ २९ ] आपलें उद्दिष्ट कार्य चालू ठेवणें, त्याच्या क्षेत्राचा संकोच, विस्तार किंवा उपसंहार करणें, या गोष्टी मंडळाच्या पूर्ण अधिकारांतल्या आहेत. या बाबतींतलें मंडळाचें धोरण कार्यकारी मंडळानें मान्य केलें पाहिजे. [३०]मालेच्या संबंधाचीं कामें व इतर जीं कामें मंडळ करावयाला सांगेल, तीं करणें, हें कार्यकारी मंडळाचें काम आहे. [३१] मंडळाच्या कायमच्या सभासदांची एक सभा प्रतिवर्षीं पुणें येथें मे महिन्यांत भरावी व तिच्यांत मंडळाच्या चिटणविसांनीं पूर्ववर्षाचा अहवाल वाचून दाखवावा. आणखी कांहीं विशेष काम असल्यास तेंही या सभेनें करावें. [ ३२ ] कार्यकारी मंडळाच्या एका वर्षांत तीन सभा भराव्या. तिच्यांत झालेल्या कार्यांचा अहवाल चिटणविसांनीं वाचावा, व तो मंजूर करण्यांत यावा. [ ३३ ] मंडळाचे व कार्यकारी

मंडळाचे अध्यक्ष व चिटणवीस पुण्याचे कायमचे रहिवासी असावे.[३४] मंडळाला अनुकूलता झाल्यास त्यानें संपादकांचा आर्थिक परामर्श यथाशक्ति घ्यावा. तो शक्य नसला तर संपादित पुस्तकांच्या रूपानें शक्य तितकी त्यांची संभावना करावी. [ ३५ ] संपादकांनीं संपादित भागाच्या पांच प्रती भाग छापल्याबरोबर मंडळास नजर कराव्या. मंडळानेंही तितक्याच प्रती संपादकांस नजर म्हणून द्याव्या. ( ३६ ) मालेच्या पुस्तकांची व त्यांच्या पुनर्मुद्रणादिकांची सर्व व्यवस्था मंडळाचे चिटणवीस यांनीं आपल्या मुखत्यारींत करावी व केलेल्या व्यवस्थेचा अहवाल मंडळास कळवावा. [३७]मराठी वाङ्मयाची अभिवृद्धि व अभ्युदय करणाऱ्या सर्व संस्थांशीं मंडळानें सहकारिता व सहानुभूति ठेवावी. मराठी वाङ्मयाच्या संबंधानें होणाऱ्या परिषदांना मंडळाचे प्रतिनिधि म्हणून मंडळाच्या चिटणविसांनीं हजर राहावें व तेथें मंडळाच्या कार्याविषयीं माहिती सांगून मंडळाचे कायमचे सभासद वाढवून त्याच्या कार्याची भरभराट होईल असा प्रयत्न करावा. [ ३८ ] मंडळाचीं व कार्यकारी मंडळाचीं कामें बहुमतानें चालावीं. मंडळांत सारखीं मतें झाल्यास अध्यक्षांना एक अधिक मत देण्याचा अधिकार असावा. [ ३९ ] मंडळाच्या कामाला लागणारा खर्च चिटणविसांनीं मालेच्या पुस्तकांच्या विक्रीनें वसूल करावा; किंवा त्याकरितां वर्गणी गोळा करून तिच्यांतून तो करावा. कारण, मंडळाच्या जमेची बाजू बहुधा कोरीच असणार ! आणि कदाचित् जमेला कांहीं आले तर तीं प्रत्यक्ष पुस्तकेंच असणार ! त्यांची सर्व व्यवस्था चिटणविसांकडेच पूर्णपणे ठेविली आहे. [ ४० ] २० व्या, २३ व्या व २८ व्या नियमांत गृहस्थ या शब्दांत स्त्रियांचाही समावेश होतो.

# चार शब्द.

शारदाप्रसादनमंडळाच्या अभिनवकाव्यमालेच्या या पांचव्या भागाला मंडळाच्या नियमाप्रमाणें संपादकीय प्रस्तावना आहेच. तिच्यांत त्याच्या संबंधाच्या बहुतेक गोष्टींचा मार्मिक रीतीनें उल्लेख आलेला आहे. मला या भागाविषयीं लिहिण्याचें वस्तुत: कांहीं कारण नव्हतें. तथापि मंडळाच्या सभासदांनीं इच्छा प्रकट केल्यावरून मी हे चार शब्द लिहिण्यास प्रवृत्त झालों आहें. शिष्टाचें आगमन झालें तर अनध्याय करण्याचा आपल्यांत पूर्वसंप्रदाय आहे. आधुनिक कवयित्रींच्या कवितांचा हा विशिष्ट भाग पुढें येतांच वरील संप्रदायाला अनुसरून, एवढ्या भागापुरती, मंडळाच्या कांहीं नियमांना विश्रांति द्यावी लागत आहे, याबद्दल सहृदय वाचक मला क्षमा करतील अशी आशा आहे.

आधुनिक कवयित्रींच्या काव्यांचा हा पहिलाच संग्रह आहे असें या भागाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. त्याच्याच बरोबर मला आणखी असें म्हणावेंसें वाटतें कीं, असल्या संग्रहाला संपादक न मिळतां संपादिका लाभल्या हा योगही अपूर्वच आहे! यांत एक प्रकारचें औचित्य व माधुर्यही आहे. या पुस्तकांतील कवितांवर संपादिकाबाईंनीं हलव्याचें सुंदर रूपक केलें आहे. पण त्यांत हलव्याचें माधुर्यच मुख्यत्वेंकरून विवक्षित आहे. हें ठीकच आहे. पण मी थोडा याच्या पुढें जातों. कंटक ही वस्तु बोंचणारी आणि म्हणूनच प्राय: तापदायक असते. परंतु गुलाब, केतकी, सात्त्विक प्रेम यांत तिची मोठी प्रतिष्ठा आहे. हलव्यांतही तिचें माहात्म्य कमी नाहीं. एवढेंच नव्हे, तर एखादी मानाला हापापलेली तिखट विहीण कांटेरी हलव्याकरितां रुसूनही बसल्यास नवल नाहीं! हलव्याच्या माधुरींत कांटा भर घालीत नाहीं असें कोण रसिक म्हणेल? प्रस्तुत काव्यमय

हलवा चांगला कांटेदार आहे. तेव्हां काव्याविषयीं विशेष काळजी बाळगणाऱ्या स्त्रीवाचकांस तो विशेषच प्रिय होईल असें वाटतें. दुसरें असें. जात्या अमंगलभीरु अशा आर्यकुलांगना, खलांची दृष्ट पडेल अशा भीतीनें, आपल्या स्वभावसुंदर मुग्ध बालकांच्या मुखांवर काजळाची तीट लावीत असतात. या पुस्तकांतील काव्यें कवयित्रींचीं प्राणप्रिय अपत्येंच आहेत. दुर्वृत्त लोकांची दृष्ट लागूं नये म्हणून त्यांनीं त्या अपत्यांच्या गालांवर दोषकज्जलाच्या टिकल्या मुद्दामच राहूं दिल्याचा भास होतो !

स्त्रियांविषयीं कित्येक प्रसिद्ध संस्कृत व प्राकृत ग्रंथांत फार विलक्षण विधानें केलेलीं आढळतात. त्यांपैकीं एक सर्वश्रुत विधान असें आहे:—

**अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।**
**अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥**

निर्णयसागरछापखान्यांत प्रसिद्ध झालेल्या सुभाषितरत्नभांडागारांतलें हें एक रत्न आहे ! अशीं रत्नें त्यांत अनंत आहेत ! तीं 'स्त्रीस्वभावनिंदा' या स्वतंत्रप्रकरणांत गुंफिलीं आहेत. जगांतील कोणत्याही पुरुषांनीं स्त्रियांची अशी नालस्ती केली असेल असें मला वाटत नाहीं. ज्याला सत्याची व संभावितपणाची थोडीशी तरी चाड असेल तो असल्या वचनांना कवडीची देखील किंमत देणार नाहीं हें उघड आहे. पिढ्यान् पिढ्या मोठ्या प्रसिद्ध ग्रंथांतून आर्यस्त्रियांची अशी बदनामी कशी चालत आली याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें! 'स्त्रियाश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम्' इत्यादि वचनें अपरिपक्व बुद्धीच्या मुलांच्या जिव्हेवर नृत्य करीत असतात ! अल्पस्वल्प गोष्टींत देखील, 'मी बायको लागलों आहें काय?' अशी मर्दानी बढाई मारण्यांत पुरुषवर्गाला प्रतिष्ठा वाटत असते! एकंदर समाजामध्यें स्त्रियांविषयींच्या अत्यंत अनुदार कल्पना बद्धमूल झालेल्या पदोपदीं दिसून येतात. असले प्रकार लांछनास्पद आहेत. हे

ग्रंथांतून निघून गेले राहिजेत. संस्कृतांतला अबला हा शब्द केवळ शरीरसामर्थ्याच्या दृष्टीनें योजतात. त्यांत स्त्रीची नालस्ती नाहीं. इंग्रजींत Softer sex, Weaker sex, इ. प्रयोग अशाच दृष्टीनें आहेत, निंदार्थक नाहींत. ज्या देशांत द्रौपदी, अनसूया, जानकी, अरुन्धती इत्यादि तेजस्वी कुलवधू जन्माला आल्या; ज्यामध्यें जिजाबाई, लक्ष्मीबाई, अहिल्याबाई, मिराबाई, कृष्णाकुमारी यांच्यासारखीं स्त्रीरत्नें अगदीं अलीकडे पैदा झालीं; व ज्यांत आजही श्री० सरोजिनी नायडूसारख्या विदुषी कवयित्री समाजास भूषवीत आहेत; त्या समाजानें आपल्या मातांची, भगिनींची, मुलींची, स्नुषांची, नायकांची, व इतर आप्तेष्ट स्त्रियांची विटंबना यापुढे तरी सहन करूं नये. पुरुष व स्त्रिया जन्मतः सारख्याच स्थितींत असतात. संस्काराप्रमाणें त्यांस तेज चढतें. धर्मशास्त्रकारांनीं प्रायश्चित्तप्रकरण लिहिलें तें केवळ स्त्रियांकरितां नसून सर्व मानवांकरितां आहे. यावरून पुरुष जन्मतः शुद्ध व स्त्रिया जन्मतः पातकी ही कल्पना फोल ठरते. शिक्षण ही गोष्ट उभयतांना सारखीच हितावह आहे. समाजानें तें योग्य दिशेनें देऊन उभयांची उन्नति करणें अवश्य आहे.

बरें, उलट पहावें तर कित्येक रंगेल कवि स्त्रीरत्नसृष्टीनें अगदीं मुग्ध होऊन काल्पनिक शृंगारतरंगिणींत मीन होऊन स्वेच्छ विहार करतांना दृष्टीस पडतात !

मला वाटतें वरील दोन्ही पक्षांच्या अत्युक्तीचा भाग सोडला तर आर्य स्त्रीची यथार्थ कल्पना ‘ गृहं तु गृहिणीशून्यं कांतारादतिरिच्यते ’ या पद्यार्धांत सुव्यक्त झाली आहे. वेदकालीं, रामायणभारताच्या वेळीं, कालिदास-भवभूतींच्या समयीं, स्त्रियांविषयीं साधारणपणें मोठें दाक्षिण्य दिसून येतें. कित्येक स्मृतिग्रंथांत, हरिवंशांत व पुराणादि ग्रंथांत मात्र वर दर्शविलेला उद्वेगजनक प्रकार दिसून येतो. आपल्या हल्लींच्या स्थितींत कित्येक उदात्त धर्मबंधनें स्त्रीवर्गानेंच कायम ठेविलीं आहेत व समाजाची अब्रू राखिली आहे. पुरुषांतल्याप्रमाणें

स्त्रीवर्गांतही अपवादक उदाहरणें सांपडतात. समाजाच्या दृष्टीनें स्त्री व पुरुष यांना सारखेंच महत्त्व आहे कुटुंबापुरतेंच पाहिलें तर स्त्री त्याची राणी आहे. हा अधिकार योग्य रीतीनें बजावण्याचें आंगीं सामर्थ्य येईल, असें शिक्षण तिला देण्यांत आलें पाहिजे. ती अधिकारसंपन्न गृहस्वामिनी झाली तर संसार रमणीय होणार आहे. अशा गृहिणी निपजल्या तर राष्ट्राचाही भाग्योदय होणार आहे.

संसारांत स्त्री कविता असून पति हा कवितेचा अर्थ आहे, ही कल्पना मोठी सुंदर आहे. स्त्री ही पुरुषाची अर्धांगी आहे, या कल्पनेंतही माधुर्य आहे. हा संगम कोणा सहृदयास प्रिय होणार नाहीं ? कविकुलगुरूच्या प्रतिभेनें ह्या कल्पना पुढील पद्यांत चांगल्या नटविल्या आहेत :—

**वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।**
**जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ ॥**

यांत उपमानोपमेयभावानें वरील कल्पनाद्वयास हृदयंगमत्व आलें आहे.

दुसऱ्या एका दृष्टीनें विचार केला तर स्त्री भावनाप्रधान व पुरुष विचारप्रधान असें म्हणावें लागतें. हे यांचे धर्म सामान्यतः स्थिर असतात. तथापि क्वचित् ते आपलीं अधिष्ठानें सोडून अमर्यादपणें संचार करतात. उदाहरणार्थ, शौर्य हा गुण प्रायः वीरपुरुषाचा आहे. पण झांशीच्या लक्ष्मीबाईसाहेब इंग्रेजी सेनापतीशीं झुंज करून त्यांस आपल्या समरनैपुण्यानें थक्क करून सोडतात ! तसेंच महासाध्वी अहिल्याबाई होळकर या बायकांचीं पलटणें तयार करून राघो भरारीस खालीं मान घालावयाला लावतात ! उलट क्षत्रियकुलावतंस विराटपुत्र उत्तर बृहन्नडेच्या विक्रमलीला पाहून निरुत्तर होतो व वीरविडंबनाचा प्रकार जगाला जाहीर करतो ! आपणास मर्दानी शाहीर म्हणविणाऱ्या केशवसुताला एखाद्या अल्लड मुलीच्या मुखांत शोभेल असें ' झपूर्झा ' गीत गात बसण्याची हुक्की येते ! या उदाहरणांत स्त्रीपुरुषांच्या स्वाभाविक मनोवृत्तींचा विनिमय झालेला नजरेस येतो !

स्त्रीपुरुषांच्या कायमच्या मनोवृत्तींकडे लक्ष्य दिल्यास कोमल वृत्तींचें स्वामित्व स्त्रियांकडे येतें. प्रेम, अनुकंपा, सहनशीलता, लज्जा, वात्सल्य, अधर्मभीरुता, दयालुता, अमंगलासहिष्णुता, मृदुता, अल्प-संतुष्टता, धार्मिकता, शुचिता इत्यादि धर्म त्यांच्या ठिकाणीं पुरुषां-तल्यापेक्षां अधिक प्रमाणानें राहतात. या त्यांच्या वृत्ति, थोड्या कारणानें व फार लवकर, उद्दीपित होतात. स्त्रियांचें मोठें शस्त्र म्हणजे रुदन; व हें त्यांच्या अगदीं हुकमांत असल्यासारखें दिसतें ! कवितेचें स्वरूप भावनाप्रधान असल्यानें तिचें स्त्रियांच्या मनोवृत्तीशीं फार जुळतें. या वृत्तीच्या झटक्यांत चिमकुली, चमत्कार उत्पन्न करणारी, व प्रतिभेनें चमकणारी कविता त्यांच्या हातून होण्याचा फार संभव असतो. इंग्रेजीमध्यें जिला लिरिक्स मध्यें गणतां येईल अशी ही कृति असणार. लिरिक—काव्याला वीणाकाव्य असें म्हण-ण्याचा प्रघात पडूं पाहत आहे. या बाबतींत मतभेद होण्याचा संभव आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या विविधज्ञानविस्ताराच्या अंकांत असल्या काव्याला 'तरंग' किंवा 'लहरी' म्हणावें असें रा. कीर्तिकर यांनीं सुचविलें आहे. पण या शब्दांत कल्पनेचें लघुत्व व चांचल्य हीं दोन मात्र ध्वनित होतात. तुंतुण्यावर गाण्याची पात्रता हा विशेष अर्थ लिरिक—मध्यें आहे. तो 'तरंग' आणि 'लहरी' यांत येत नाहीं. या सर्व अर्थाचा संग्राहक असा एकादा मधुर शब्द तयार झाला पाहिजे. तों पर्यंत वीणाकाव्य या शब्दावर निर्वाह करणें प्राप्त आहे. असो. आपल्या स्त्रीसमाजांत शिक्षणाचा फैलाव अद्यापि व्हावा तसा झालेला नाहीं. यामुळें काव्यरचनेला आवश्यक असा भावनांचा विकास व परिणति त्यांच्या ठिकाणीं झालेली दिसत नाहीं. असल्या स्थितींतही कित्येक स्त्रियांनीं काव्यें रचिलीं आहेत. पण तीं जगापुढें न येतां उगमस्थानींच अंतर्धान पावल्याचे दाखले आहेत ! या संबंधांत एका आधुनिक कवयित्रीच्या एका पद्याची आठवण होते. तें पद्य ग्रे—कवी-च्या कवितेचें गोड रूपांतर आहे. तें असें:—

( पृथ्वी )

**अनंत जलधींमधीं पडुनियां किती लोळती,**
**सतेज नव मौक्तिकें कुणि न त्यांस सम्मानिती.**
**सुरम्य कुसुमें किती फुलति निर्जनीं काननीं,**
**कुणी न बघती तयां, अहह ! जाति कोमेजुनी.**

हें अगदीं खरें आहे ! वृत्तींची स्थिरता व दृढता यांचें साहाय्य स्त्रियांना कमी असल्यामुळें व परिस्थिति प्रतिकूल असल्यानें त्यांच्या हातून मोठ्या बैठकीचीं मोठीं काव्यें होणें अशक्य आहे. अलीकडे स्त्रियांसंबंधाचे दुग्रह थोडे थोडे कमी होऊं लागले आहेत व त्यांस शिक्षणाचा कांहींसा लाभही होऊं लागला आहे. त्याचेंच फल प्रस्तुतचा काव्यसंग्रह होय. यांत सर्वच लघु वीणाकाव्यें आहेत.

कवितेप्रमाणें दुसऱ्या दोन ललितकला, संगीत व चित्रलेखन, यांचीही स्त्रीस्वभावाशीं फार सलगीची मैत्री आहे. संगीतकलेच्या परिशीलनाच्या मार्गांत तर स्त्रियांना वरच्या पेक्षांही अधिक अडचणी आहेत ! संगीतकला वारांगनांच्या व समाजाकडून हीन मानल्या जाणाऱ्या नटवर्गाच्या संसर्गानें दूषित झालेली आहे असें समजण्यांत येतें ! त्यामुळें त्या बिचाऱ्या निरपराधी कलेला कुलवधूच्या किन्नरकंठाचें दिव्य आसन व समाजांतील प्रतिष्ठित पद मिळत नाहीं ! गायनकला ही खरोखर स्वर्गीय कला असून कवितेप्रमाणें निर्भेळ आनंद देणारी, दुःखांचा विसर पाडणारी, श्रमाचा परिहार करणारी व चित्ताला शांति देणारी आहे. राजेरजवाड्यांच्या स्त्रियांना गायन व चित्रकला शिकवीत असल्याचे दाखले इतिहासांत सांपडतात. कवितेप्रमाणें याही तिच्या दोन मैत्रिणींचा लाभ स्त्रियांस करून दिला पाहिजे. म्हणजे त्या आपल्या गृहराज्यांत जिकडे तिकडे सौंदर्य, माधुर्य व आनंद यांचें साम्राज्य स्थापन करतील व सर्व समाजास शांति व सुख यांचा लाभ करून देतील यांत संशय नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत स्त्रियांच्या कवितेचे दोन प्रकार दिसून येतात. एकावर पुराणपद्धतीचा छाप आहे; दुसरा आधुनिक वळणावर गेला

आहे. याचीं कारणें उघड आहेत. ज्यांचें वाचन व श्रवण जुन्या कवींच्या पलीकडे गेलेलें नाहीं, त्यांच्यावर कल्पना व रचना यांच्या दृष्टीनें, जुन्याची मुद्रा असणें अपरिहार्य आहे. ज्यांना आलीकडील शिक्षण मिळालें आहे व थोडा इंग्रजीचाही संस्कार झाला आहे त्यांच्या विचारांचा व रचनेचा ओघ वरच्यापेक्षां अर्थात् भिन्न आहे. एकंदरींत कवयित्रींचा पदें रचण्याकडे अधिक कल दिसून येतो. या संग्रहांत एकंदर बत्तीस कवयित्रींच्या कविता आलेल्या आहेत. मराठी बोलणाऱ्या सर्व प्रांतांतून या आल्या आहेत, यावरून प्रस्तुत काव्यसंग्रह अखिल महाराष्ट्रिय कवयित्रींचा आहे, असें म्हणण्याला हरकत नाहीं.

सौ० सत्यभामाबाई खरे, श्रीमती मनूबाई केळकर, काव्य-कल्पलता श्री० सारजाबाई बापट, सौ० शांताबाई फणसे, सौ० लक्ष्मी-तनया, सौ० मनोरमाबाई रानडे, सौ० शारदाबाई परांजपे, श्रीमती यमुनाताई नागपूरकर, श्रीमती राधाबाई केळकर, यांची वृत्तात्मक कविता कौतुकास्पद आहे. पूर्णविराम, अंमळ, श्रीकृष्णाचा हट्ट, मीठ, चहाची चहा, खानदेशचा विठोबा, करंज्यांमध्यें मोदक कशाला, कीलोत्पाटी वानर, इत्यादि कवितांत मुग्ध विनोद प्रतीतीला येतो. मृतबालकास, मातृगीत, मातेचे दुःखोद्गार, माझें ध्येय, पुत्रस्मरण, मुग्ध मुलीस, द्रौपदीचा धांवा, जगिं कशास आला होतास, मुरलीचा विलाप, इत्यादि प्रकरणांत करुणरस परिपुष्ट झाला असून त्यांत वाचकांचीं मनें वितळविण्याचें सामर्थ्य आहे. श्रीरामजन्मकथा, मुरली, गंगावंदन, देवी सरस्वती, ईशप्रार्थना, धांवा, कृष्णप्रबोधन, वनमाळी, मुरलीधर वगैरे काव्यांत कवयित्रींची भक्तिप्रवणता स्पष्ट झाली आहे. श्रीजिजाईचे डोहाळे, सिंहगडाकडे पाहून, माझ्या बाळाचा वाढदिवस, लोकमान्यांचा वाढदिवस, स्वदेशाभिमान हीं काव्यें राष्ट्रिय कल्पना उद्दीपित करणारीं आहेत. संक्रांतीचा तिळगूळ, संक्रांत, गेलें तें गेलें, मायेचें जाळें, बकुलमाला, द्रौपदीगर्वहरण,

तुळशीवृंदावन, कृष्णजन्मरहस्य यांत तात्विक व बोधपर विचार भरले आहेत. दिव्य उद्यान, कौमुदीविहार, उषा, चैत्रोत्सव वगैरेंत वर्णनाचें कौशल्य दिसून येतें. गेलें तें गेलें, कमलिनी-चीं बहुतेक काव्यें, सुशीला—काव्यें, पतिव्रतेचें हृदय, सीताशुद्धि, निमीलित पद्मास, यांत भावनांच्या दृष्टीनें मनोहरत्व आहे. हंसदूतकाव्य मेघदूताच्या धर्तीवर रचण्याचा प्रयत्न आहे. तो बराच चांगला साधला आहे. कांहीं कवितांत आर्यांचें कौटुंबिक प्रेम व्यक्त झालें आहे. हिंदु स्त्रियांची स्थिति, विधवांची दुःस्थिति, स्त्रियांची थोरवी, ही सामाजिक प्रकरणें स्त्रियांविषयीं स्त्रियांचे विचार स्पष्टपणें समाजाच्यापुढें व्यक्त करीत आहेत. ग्रंथाचा आरंभ, मध्य व शेवट यांत एक गोष्ट सहज नजरेस आली. ग्रंथाच्या आरंभीं श्रीरामजन्मकथा, मध्यें अनसूया साध्वीची गोष्ट व शेवटीं तुळशीवृंदावन असा प्रकार पाहून, ज्याला आर्यस्त्रीच्या मनोरचनेची व जिव्हाळ्याच्या धार्मिक विषयांची माहिती आहे, तो निःशंकपणें सांगेल कीं, हा संग्रह आर्य कवयित्रींचाच असला पाहिजे. पवित्र रामनामाचा घोष करीत, सीतादेवीला वंदनीय झालेल्या अनसूयेला वंदन करून, रामप्रिय तुळशीच्या वृंदावनावर अवतीर्ण होणारी कवयित्री आर्य भगिनीशिवाय दुसरी कोण असणार ? याप्रमाणें आदिमध्यावसानीं आर्य स्त्रीच्या प्रेमाचा विशुद्ध ठसा ज्यावर उमटला आहे असा हा संग्रह आहे. हा वाचनीय व संग्राह्य आहे. यांत स्त्रीजातिसुलभ मर्यादा, प्रेमळपणा, सहजसुभगता, कोमलवृत्ति व माधुर्य हे गुण विशेषेंकरून दृष्टीस पडतात. मराठी काव्याचे वाचक या पुस्तकाचा आदरपूर्वक स्वीकार करतील व स्त्रीवर्ग तर अभिमानानें, कुतूहलपूर्वक व प्रेमदृष्टीनें याकडे पाहील असा भरंवसा आहे.

पुणें शहर.
१० जानेवारी १९२२.

लक्ष्मणशास्त्री लेले.

# प्रस्तावना.

---o--

गेल्या सप्टेंबर महिन्यांत येथील शारदाप्रसादनमंडळाचे कायमचे चिटणवीस सुप्रसिद्ध कवि, ग्रंथकार आणि टीकाकार श्रीयुत रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनीं मंडळानें चालविलेल्या अभिनवकाव्यमालेच्या पांचव्या भागाची संपादिका होण्याविषयीं मला विनंति केली; कारण, हा भाग केवळ आधुनिक कवयित्रींच्या कवितेचाच काढावयाचा असें मंडळानें ठरविलें होतें. आधुनिक स्त्रीवर्गाच्या काव्याविषयीं मंडळानें योग्य दाक्षिण्य दर्शविलें हें पाहून माझ्या मनाला फार आनंद वाटला. परंतु रा. लेलेशास्त्री यांनीं केलेली विनंति ऐकून मला थोडासा विचारच पडला. कारण, मीं पूर्वीं कधीं पुस्तक संपादण्याचें काम केलें नव्हतें, म्हणून तें हातीं घेतल्यास आपल्या हातून तें पार पडेल किंवा नाहीं याविषयीं माझें मन फार साशंक होतें. तथापि, मंडळानें शारदोपासनेची ही पवित्र व अमोल संधि देऊन माझ्यावर एक प्रकारचा अनुग्रहच केला असें मनांत येऊन व कवयित्री भगिनींच्या मदतीनें हें काम आपण सिद्धीस नेऊं अशी उमेद मनांत बाळगून मीं मंडळाची आज्ञा मान्य केली; व लवकरच अंगीकृत कार्याच्या तयारीला लागलें.

शारदाप्रसादनमंडळाच्या मार्फत गुंफिल्या जाणाऱ्या अभिनवकाव्यमालेच्या पांचव्या भागांत केवळ आधुनिक स्त्रीवर्गाच्या कवितेचा संग्रह करावयाचा आहे; तेव्हां ज्या कवयित्रींना आपलीं काव्यें त्यांत प्रकाशित व्हावीं अशी इच्छा असेल त्यांनीं आपलीं काव्यें मजकडे पाठवावीं अशा अर्थाची सूचना केसरी व ज्ञानप्रकाश या स्थानिक वृत्तपत्रांत प्रथमतः जाहीर करण्यांत आली. नंतर एक खाजगी छापील विनंति–पत्र काढून तें मीं माझ्या माहितीच्या अनेक लेखनव्यवसायिनी भगिनींकडे पाठविलें. कित्येकींची मीं समक्षच गांठ घेतली व त्यांस आपली कविता मजकडे पाठविण्याविषयीं तोंडी विनंति केली. हस्तेंपरहस्तेंही कवयित्रींकडून काव्यें मिळविण्याचा मीं प्रयत्न केला.

या प्रयत्नास सुदैवानें चांगलें यश आलें. रोज नवनव्या कविता येऊं लागल्या. तेव्हां त्यांची निवड व संशोधन करण्याचें काम हातीं घ्यावें

लागलें. या कामाकरितां एक लहानसें मंडळ नेमून त्याच्या अध्यक्षस्थानीं रा. लेलेशास्त्री यांची योजना करण्यांत आली. जसजशीं काव्यें शोधून तयार होऊं लागलीं तसतशीं तीं छापून घेण्यास सुरवात केली. पण या व्यवस्थेमुळें कवयित्रींचा कालक्रम साधला नाहीं, त्यांच्या काव्यांचें विषयानुरोधानें वर्गीकरण करतां आलें नाहीं, व लहानमोठीं या दृष्टीनेंही त्यांची जुळणी करतां आली नाहीं. असली व्यवस्था पुढच्या आवृत्तींत करणें शक्य आहे. आपल्या काव्यांत शब्दादिकांचे फेरफार करण्यास हरकत नाहीं असें अनेक कवयित्रींनीं सुचविलें होतें, त्याप्रमाणें फेरबदल केले आहेत. ते आवडल्याविषयीं कित्येक भगिनींचें लिहून आलें आहे. केलेले फेरफार सर्वांनाच पसंत पडतील असा मला भरंवसा वाटत आहे. एक दोन कवयित्रींकडे त्यांच्या कवितांचीं प्रुफें, कामाच्या घाईमुळें, पाठवितां आलीं नाहींत, याबद्दल त्या मला क्षमा करतील अशी आशा आहे.

ज्या कवयित्रींनीं काव्याबरोबर आपल्या जन्मकालाची, मुद्रित व अमुद्रित काव्यांची व आपल्या शिक्षणादिकाची माहिती पाठविली ती त्यांच्या काव्यांच्या आरंभीं दिली आहे. ज्यांच्याकडून कांहींच माहिती मिळाली नाहीं आणि ज्यांनीं आपली माहिती प्रसिद्ध होऊं नये अशी विशेष सूचना केली, त्यांच्याविषयीं अर्थात् कांहींच लिहितां आलें नाहीं. कांहीं कवयित्रींनीं टोपणनांवानें आपली कविता छापण्याविषयीं इच्छा दर्शविली. त्यांच्या इच्छेस नाइलाजानें मान द्यावा लागला. एक कवयित्री झाली म्हणजे दुसरी, ती झाली म्हणजे तिसरी, असा कविता छापण्याचा क्रम ठेविला आहे व तो मालेच्या पूर्वपरंपरेला अनुसरून आहे.

या पुस्तकांत कवितेच्या वेषाचें वैचित्र्य दिसून येतें. संस्कृत व प्राकृत छंदांत रचिलेल्या पुष्कळ कविता या भागांत आहेत. त्यांत कोठें कोठें वृत्तदोष अद्यापि दृष्टीस पडतात. पदांच्या रचनेला तर कांहींच धरबंध नाहीं. त्याचें कारण उघड आहे. पदांच्या रचनेचें नियामक शास्त्र अद्यापि अस्तित्वांत आलेलें नाहीं, यामुळें या प्रकारच्या रचनेमध्यें फार शिथिलता आढळून येते. पदांच्या रचनेचें नियमन झाल्याशिवाय पदप्रबंध बिनचूक व एकतंत्री होणार नाहींत. या पुस्तकांत पदांच्या रचनेच्या बाबतींत कवयित्रींचें निरंकुशत्व अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतें. कवयित्रींनीं

कांहीं ठिकाणीं पदांच्या चाली दिल्या नाहींत. मी गायनाभिज्ञ नसल्यानें त्या चाली देण्याचें साहस केलें नाहीं.

या पुस्तकांतील विषयांतही विविधत्व व वैचित्र्य हीं दिसून येतात. परमेश्वर, परमार्थ, भक्ति, ज्ञान, वैराग्य, सृष्टि, लोकव्यवहार, प्रचलित परिस्थिति, प्रेमादि मनोवृत्ति असे अनेक विषय यांत आलेले आहेत. यांतील काव्यें एकंदरींत सुंदर, मधुर व वाचनीय आहेत, असें माझ्या अल्पमतीला वाटतें. रसिक वाचकांचाही असाच अभिप्राय पडेल असा भरंवसा वाटत आहे. तथापि रुचिभेदामुळे या संबंधांत थोडा मतभेदही होण्याचा संभव आहे.

पुस्तकाच्या पृष्ठांची संख्या नियत असल्यामुळें कांहीं कविता चांगल्या असूनही त्यांचा संग्रह करतां आला नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटत आहे. परीक्षक मंडळानें थोडयाशा कविता नापसंत केल्या त्याही या पुस्तकांत घालतां आल्या नाहींत. याबद्दल माझ्या भगिनी माझ्यावर रुष्ट होणार नाहींत अशी आशा आहे. शारदाप्रसादनमंडळानें आपल्या मालेचा आणखी एक भाग केवळ स्त्रियांच्याच कवितेकरतां राखून ठेवावा अशी मीं त्यास आग्रहाची विनंति करून ठेविली आहे. ही विनंति मान्य झाल्यास आज शिल्लक राहिलेली चांगली कविता व या भागाला न लाभलेल्या भगिनींच्याही चांगल्या कविता, यांचा संग्रह त्या भागांत सहज करतां येईल.

आज संक्रांतीचा दिवस आहे. आधुनिक कवयित्रींच्या काव्याचा हा पहिलाच संग्रह आहे असें मला वाटतें. या दृष्टीनें याला अपूर्वता आहे पुरुषांबरोबर स्त्रियाही काव्यप्रदेशांत अहमहमिकेनें संचार करण्यास तयार व समर्थ आहेत, ही गोष्ट या पुस्तकानें सिद्ध केली आहे. हें एक प्रकारचें संक्रमणच आहे. कवयित्री भगिनींनीं मोठ्या कुशलतेनें व प्रेमानें आपण तयार केलेला जो काव्यमय हलवा मजकडे पाठविला तोच या पुस्तकाच्या सुंदर पिशवींत घालून त्यांचा त्यांस मोठ्या आदरानें व प्रेमानें मी परत देतें व तो देतांना म्हणतें, 'कवयित्री भगिनींनो ! हा मधुर काव्यमय तिळगूळ घ्या व अशाच सदैव गोड बोलत राहा !' इतर सर्व बंधुभगिनींनीही याचा स्वीकार करावा अशी माझी त्यांस सप्रेम विनंति आहे.

या हलक्याइतकेंच गोड एक काम करावयाचें राहिलें आहे; तें मी आतां मोठ्या आनंदानें करितें. ज्या कवयित्रींनीं माझ्या विनंतीला मान देऊन मजकडे आपलीं काव्यें पाठविलीं त्या सर्वांचे मी येथें मनःपूर्वक आभार मानतें. ज्यांना माझ्या विनंति-पत्राला मान देण्याची सवड झाली नाहीं आणि ज्यांच्याकडे विनंति-पत्रेंच नजरचुकीनें जाण्याचीं राहिलीं त्यांच्या कवितांचा परामर्ष मीं स्मरण ठेवून घेतला आहे. या धृष्टतेबद्दल भगिनींचा मजवर रोष होणार नाहीं अशी खात्री आहे. उतारे घेण्यांत किंवा कविता छापण्यांत कवयित्रींना कांहीं दोष आढळल्यास त्यांनीं ते मला अवश्य खालील पत्त्यावर कळवावे म्हणजे पुढील आवृत्तींत त्याप्रमाणें सुधारणा करतां येईल. कांहीं ठळक चुकांचें शुद्धिपत्र या पुस्तकाला जोडलें आहे.

अभिनवकाव्यमालेच्या पांचव्या भागाचें संपादनाचें काम चालू असतां मला शारीरिक अस्वास्थ्यानें पछाडल्यामुळें माझें काम कांहीं दिवस बंद पडलें. परंतु मंडळाचे चिटणीस श्रीयुत लक्ष्मणशास्त्री ळेले यांनीं अतिशय उत्साहानें व आनंदानें माझें शिल्लक पडलेलें सर्व काम पथकरून पुढें चालविलें. त्यामुळेंच हें पुस्तक इतक्या अल्प अवधींत व प्रस्तुतच्या व्यवस्थित स्वरूपांत प्रकाशित झालें. याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

शारदाप्रसादनमंडळासारख्या विद्वन्मंडळानें प्रस्तुत पुस्तकाच्या संपादिकेचें काम मला दिलें यांत माझा बहुमान झाला असें मी समजतें. असा बहुमान केल्याबद्दल मी मंडळाची अत्यंत ऋणी आहें.

शारदाप्रसादनमंडळाचें आधुनिक मराठी काव्याच्या प्रकाशनाचें स्तुत्य कार्य अखंड चालो व तें अधिकाधिक यशस्वी होत जावो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी ही लहानशी प्रस्तावना पुरी करितें.

७३५, सदाशिव पेठ, पुणें शहर.
ता. १०, जानेवारी, इ. स. १९२२ } सौ० सरस्वतीबाई भिडे.

# अनुक्रमणिका.


कवयित्री व काव्यें. पृष्ठांक.

(१) सौ. सत्यभामाबाई खरे.
- १ श्रीरामजन्मकथा. ... १
- २ संक्रांतीचा तिळगूळ. ... ७

(२) काव्यचंद्रिका सौ. राधाबाई आपटे.
- १ गेलें तें गेलें. ... ९
- २ मृत बालकास. ... ९
- ३ पूर्णविराम ! ... ११

(३) श्रीमती सावित्रीबाई दाते. ऊर्फ ' कमलिनी '
- १ दुःख कुठें तें सांग ! ... १२
- २ वासना. ... १३
- ३ कर्मयोग. ... १४
- ४ भूपाळी. ... १४
- ५ ' अंमळ ! ' ... १५
- ६ वेडी ... १६
- ७ ' ये बैस हृदयिं तूं माझ्या ' १७
- ८ मुरली ... १७
- ९ बाळपणची एक आठवण. १८
- १० गंगावंदन. ... २०

(४) सौ. पार्वतीबाई केतकर.
- १ श्रीजिजाबाईचे डोहाळे. २१

(५) सौ. इंदिराबाई देवधर.
- १ सिंहगडाकडे पाहून. ... २३
- २ माझ्या बाळाचा वाढदिवस. २४

(६) ' सुशीला. '
- १ स्वर्गगमन. ... २६
- २ मायेचें जाळें. ... २७

(७) सौ. द्वारकाबाई जोशी.
- १ मातृगीत. ... २९
- २ चंद्रग्रहण. ... ३०

(८) सौ. लक्ष्मीबाई लेले.
- १ मातेचा दुःखोद्गार. ... ३१
- २ हिंदुस्त्रियांची स्थिति. ... ३२
- ३ देवी सरस्वती ... ३२

(९) श्रीमती मनूताई केळकर.
- १ ईशप्रार्थना ... ३३
- २ स्वतः ... ३४
- ३ श्रीरामाची प्रार्थना ... ३४
- ४ लोकमान्यांचा वाढदिवस. ३५
- ५ नुकतेंच लग्न झालेल्या धाकट्या बहिणीस. ... ३७

(१०) काव्यकल्पलता श्री. सरोजाबाई बापट.
- १ बकुलमाला. ... ३९
- २ माझें ध्येय. ... ४२
- ३ पातिव्रतेचें हृदय. ... ४४
- ४ धर्माभिमानी वीराचा बच्चा ४७
- ५ सीताशुद्धि. ... ५४

(११) सौ. शांताबाई फणसे.
- १ चैत्रोत्सव. ... ५८
- २ विरहपत्रिका. ... ५९
- ३ आईस. ... ६२
- ४ पतीस विनवणी. ... ६४
- ५ धांवा. ... ६५
- ६ पुत्रस्मरण. ... ६७
- ७ शस्त्रक्रियेपूर्वी प्रभुप्रार्थना. ६७

कवयित्री व काव्यें. पृष्ठांक.

८ शस्त्रक्रियेनंतर डॉ. वानलेस यांस. ... ६८
९ मुग्ध मुलीस. ... ६९

(१२) सौ. उषाबाई खरे.
१ अपुरें ज्ञान. ... ७१

(१३) सौ. आनंदीबाई बिवलकर ( आसूद )
१ सती अनसूया ... ७२
२ श्रीकृष्णाचा हट्ट. ... ७४
३ मीठ. ... ७६
४ चिंधी. ... ७७
५ द्रौपदीगर्वहरण. ... ७८

(१४) श्रीमती अंबुबाई.
१ आशा. ... ८०
२ निमीलित पद्मास. ... ८१

(१५) श्रीमती शांताबाई भिडे.
१ कौमुदीविहार ... ८२
२ उषा. ... ८३

(१६) श्रीमती शांताबाई कयाळ.
१ त्रिवेणीसंगम. ... ८४
२ कृष्णप्रबोधन. ... ८५

(१७) श्रीमती सावित्रीबाई जोशी
१ सरस्वतीस्तवन. ... ८६
२ विधवांची दुःखस्थिति. ८७
३ स्त्रियांची थोरवी. ... ८८

(१८) सौ. मनोरमाबाई रानडे बी. ए.
१ रम्य भुवन. ... ९०
२ संक्रांत. ... ९१

कवयित्री व काव्यें. पृष्ठांक.

३ '—' स. ... ९२
४ उत्कंठितेचें गाणें. ... ९२
५ ' गातचि आलें मृत्यूचें गीत ! ' ... ९४
६ रूपमोहना. ... ९५
७ अनुताप. ... ९६
८ पदसेवा. ... ९७

(१९) कुमारी चिंगुताई लिमये.
१ वनमाळी. ... ९८

(२०) श्रीमती कृष्णाबाई पाटील.
१ चहाची चहा. ... ९९
२ मैनावतीचा उपदेश. ...१००
३ कथेचें वेड. ...१००
४ खानदेशचा विठोबा. ...१०१
५ द्रौपदीचा धांवा. ...१०२

(२१) सौ. राधाबाई फाटक.
१ ब्रह्मपदाचा ध्यास. ...१०३
२ तारूं. ...१०४
३ सद्गुरूचा धांवा. ...१०५

(२२) श्रीमती वेणुबाई दाणी.
१ सुखाची कल्पना. ...१०५

(२३) सौ. ' लक्ष्मीतनया '
१ हंसदूतकाव्य ( दमयंती-संदेश. ) ...१०८

(२४) सौ. शारदाबाई परांजपे.
१ कृष्णजन्मरहस्य. ...११३

(२५) सौ. इंदिराबाई गोखले.
१ ' जगिं कशासि आला होतास ? ' ...११७

| कवयित्री व काव्यें. | पृष्ठांक. |
|---|---|
| (२६) श्री०यमुनाताई नागपूरकर. | |
| १ अहल्या. | ...१२० |
| २ अक्रूरागमन. | ...१२१ |
| ३ गुरूचा धांवा. | ...१२३ |
| ४ फटका. | ...१२४ |
| (२७) कुमारि दुर्गाबाई नेने. | |
| १ मुरलीचा विलाप. | ...१२६ |
| २ स्वदेशाभिमान | ...१३० |
| (२८) कै. सौ. लक्ष्मीबाई बेहेरे. | |
| १ उद्यान. | ...१३२ |
| २ 'ना कळे !' | ...१३३ |
| (२९) सौ. वेणुबाई केळकर. | |
| १ सायंतारा. | ...१३४ |
| (३०) श्री. लक्ष्मीबाई टिळक. | |
| १ करंज्यांमध्यें मोदक कशाला ? | ...१३५ |
| २ कविसंमेलनास | ...१३७ |
| ३ लक्ष्मीनारायणसंगम ! | १३८ |
| (३१) श्री. राधाबाई केळकर. | |
| १ कीलोत्पाटी वानर. | ... ३९ |
| २ गृहस्थाश्रमधर्म. | ...१३९ |
| ३ मुरलीधर. | ...१४० |
| ४ दिव्य उद्यान | ...१४१ |
| (३२) ' कोणी तरी ' | |
| १ ' भाउजी ! वाट तुम्ही चुकला ! ' | ...१४२ |
| २ जिह्वा. | ...१४३ |
| ३ तुळशीवृंदावन. | ...१४४ |


## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १० | त्याशिवाय त्यांची आणखी कांहीं कविता आहे. तिच्या— | त्यां— |
| ३ | ५ | आप्तजनहित ऐशा | आत्महितसाधन या |
| ३ | १८ | त्याग | याग |
| ४ | १४ | भाग | याग |
| ४ | २६ | सदा | तदा |
| ७ | १७ | झला | झाला |
| १० | ७ | प्राण—अंश | प्राणांश |
| १० | २४ | गोड हेतु हे | हे गोड हेतु |
| १८ | ६ | मधुर | मधुर |
| २४ | १४ | आङ्ग्लमगिनिं | आङ्ग्लभगिनि |
| २४ | २३ | आवडतां | आवडता |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २६ | २२ | निलांकुरही | नीलांकुरही |
| २६ | २३ | जनता | जनते |
| २८ | २९ | विद्वज्जनही | कविजनही |
| ३० | १३ | विघु | विधु |
| ३१ | ७ | रमवी | रमवी |
| ४० | १२ | गडया | गड्या |
| ४३ | १४ | संकटीं | शिक्षणीं |
| ४३ | १५ | जाहलें सौख्य | लाभलें ज्ञान |
| ४३ | २६ | सिद्ध्यर्थ | सिद्ध्यर्थ |
| ४४ | ९ | ध्येयाच्या | ध्येयाच्या |
| ४४ | १७ | रधुवंशांत | रघुवंशांत |
| ५७ | १५ | इ. स. १८९६ | इ.स.१८९६ जबलपूर |
| ५७ | १६ | नाशिक | नाशिक—जबलपूर |
| ५७ | १९ | २९।११।९९ | २१।११।९९जबलपूर |
| ५७ | २३ | ५।६।१९०२ | ५।६।१९०२जबलपूर |
| ५८ | १ | २३।१।१९०३ | २३।१।:९०३सिहोरा |
| ५८ | २ | १०।७।१९०४ | १०।७।१९०४सिहोरा |
| ५८ | ३ | २५।४।१९०५ | २५।४।१९०५ पुणें. |
| ५८ | २२ | मधूनी | मधुनी |
| ६२ | २३ | वाढला | वाटला |
| ६३ | १७ | नाटकांत | तारकांत |
| ६६ | १८ | उाशर | उशिर |
| ६६ | २६ | वसा | घसा |
| ९४ | ८ | हृदयावरी अदळतो | हृदयावरि आदळतो |
| ९९ | २७ | मा | मी |
| १०३ | १९ | व | न |
| १०६ | २ | तमःपटीं | नभःपटीं |
| ११२ | ५ | रुजि | रुंजि |
| ११२ | १६ | गाड | गोड |

२१३६

शारदाप्रसादनमंडळ, पुणें.

# अभिनवकाव्यमाला

## भाग पांचवा

—×❀×—

## सौ० सत्यभामाबाई खरे.

जन्म—इ. स. १८९१.

बडोद्याचे एक भाजी न्यायाधीश कै० जनार्दन सखाराम गाडगीळ हे या कवयित्रींचे वडील होत. कवयित्रींचे पति श्रीयुत रा. रा. खरे हे वऱ्हाडांत दर्यापूर येथें वकील आहेत. 'अभिनवस्त्रीगीत' या नांवाचा एक पद्यग्रंथ कवयित्रींनीं दोन वर्षांपूर्वीं लिहून प्रसिद्ध केला. त्याशिवाय त्यांची आणखी कांहीं कविता आहे. बिच्यां-तून दोन काव्यें खालीं उतरून घेतलीं आहेत. कवयित्रींची वाणी प्रौढ व प्रेमळ आहे. आलीकडे स्त्रियांची प्रवृत्ति पदें रचण्याकडे फार आहे. प्रस्तुत कवयित्रींनीं खालील कविता संस्कृत व मराठी वृत्तांत रचल्या आहेत ही विशेष गोष्ट आहे.

### १. श्रीरामजन्मकथा.

( मालिनी )

प्रथम तुजसि, देवा ! जानकीशा ! नमीतें,
तव चरित वदाया दे मती कन्यकेतें.
जड मति बहु माझी दाखवी त्वत्कृपेतें,
मग न कधिं शिवे या मंदता मन्मतीतें.

( वसंततिलक )

रामा स्वरूप तव हें अति रम्य आहे,
हातीं तुझ्या धनु सुसज्ज विराजताहे.
आलें तुला शरण मी, धरितें पदांला,
दे शक्ति शीघ्र भवसिंधु तरावयाला.

( भुजंगप्रयात )

जया एक जाया तशी एक वाणी, प्रजारंजन श्रेष्ठ जो धर्म मानी;
खलां ताडिलें तारिलें सज्जनाला जयें, त्याचिया वर्णितें दिव्यलीला.

( गीति )

कोसलदेशिं अयोध्यानामें नगरी समृद्ध सुंदर ती;
तेथें अजसुत दशरथ राज्य करी अनुसरोनियां नीति.

( शिखरिणी )

असे दाता लोकीं दशरथ हरिश्चंद्र दुसरा;
प्रजा पाळी प्रेमें जनक गमतो तीपति खरा.
तया पाहोनीयां रिपुगण झुरे अंतरिं सदा;
नयें वर्ते त्यातें नचि करि कधीं स्पर्श विपदा.

( इंद्रवज्रा )

तैसे सुमंतादि अमात्य त्याचे, कीं वाटती ते कर राजयाचे.
राज्या तयांच्या सह तो करीतां घे धन्यवादा, सुख दे समस्तां.

( पृथ्वी )

असें करि नृपाळ तो सुचिर राज्य; एके दिनीं
स्वरूप अपुलें बघे स्वकरिं दर्पणा घेउनी.
बघे धवल केश तैं, मनिं ह्मणे, ‘ जरा पातली,
मदीय शिरिं ही ध्वज धवल मृत्युनें रोविली ! ’

( दिंडी )

म्हणे स्वमनीं, “ मीं काय सांठविलें ?
राज्यहव्यासा बहू वाढविलें.

सौख्यसेवनिं हा काल वृथा गेला !
ईशसेवनिं ना क्षणहि वेंचियेला "

( साकी )

" मनोनिग्रहा करुनि आप्तजनहित ऐशा समयाला
करणें योग्य असे, जों इंद्रियगण धरितो दृढतेला. "
पाचारोनी प्रधानगण तो नृपती वदे तयासी,
" वानप्रस्था स्वीकारावें वाटे ऐसें मतिसी.
" आत्मोद्धारास्तव सेविन मी प्रभुच्या पदकमलांसी
राज्यपद्धती नीट ठेवणें, ठेविलि अजवरि जैसी
करुनि विचाराला, द्यावी संमति ही मजला. "

( चामर )

ऐकुनी वचा अशा उदास होति ते मनीं
नृपाप्रती वदे सुमंत नम्र पायिं होउनी—
" राज्य सोडणें कसें प्रशस्त वाटलें मनीं ?
संततीविणें न धन्य भूप कोणि या जनीं.
" दानधर्म ज्यापरी जगीं बहू करोनियां
धन्यवाद घेतला सुकीर्तिला वरूनियां;
त्याग त्यापरी करा धरूनि पुत्रकामना
मान्यही करा कृपा करूनि दासयाचना."

( मंदाक्रांता )

बोले राजा, " मजसि गमतें पुत्र हा दैविं नाहीं.
आयू केवीं फुकट गमवूं ? योग्य मातें न तेंही.
घेऊनीयां नरतनुसि जो सेविना ईश्वराला,
देई अंतीं बहुत विपदा सूर्यसूनू तयाला. "

( वंशस्थ )

सुमंत बोले फिरुनी तयाप्रती, " वरप्रसादें मिळताल संतती.
विभांडकाचा सुत आणवा जया, तपःप्रभावें बहु शक्ति; राजया !

( अनुष्टुभ् )

ऐसी ऐकोनि हे वाणी आशा उपजली मनीं,
ससैन्य जाउनी भूपें संमानें प्रार्थिला मुनी—
" आपुल्या चरणस्पर्शें धन्य मन्नगरी करा
रविवंश सदा राहो, हे विनंति; दयाकरा ! "

( शा. वि. )

ऐकोनी विनती अशी नृपतिची शृंगर्षि तोषोनियां
जाई त्या नगरीस, हर्ष बहु हो लोकां बघोनी तया.
पाहोनी सुमुहूर्त मंडप रची भूपाळ गंगातटीं
अर्पी त्या निजकन्यकेसि, गमली भूमाजि जी गोमटी.
पाचारी नृपती तदा ऋषि बहू वेदज्ञसे पाहुनी
आरंभी मग याग शीघ्र सुदिना पाहोनीयां तो मुनी.
सांगे तो नृपतीस, " भाग जरि हा जाईल सिद्धीप्रती,
चौघे पुत्र बलिष्ठ पावशिल तूं, भाग्या नसे रे मिती ! "

( स्वागता )

श्यामकर्ण मग तो मिळवीला, हिंडवोनि धरणीवरि त्याला,
आणुनी नृपतिनें मख केला, तोष देइ बहु विप्रगणाला.

( स्रग्धरा )

या यागाची समाप्ती करुनि मुनि म्हणे, " यामुळें पाप सारें
गेलें, राया ! लयाला करि झडकरिं तूं यज्ञ आतां दुजा रे !
अंतीं तो पूर्ण होतां मुररिपु भगवान् जन्म या लोकिं घेई
पुत्रप्राप्ती तुला, बा ! समज नृपवरा ! सौख्यदा तूर्ण होई "

( द्रु. वि. )

बहुत अद्भुत मंत्रबलाप्रती, सहज दावि मुनी करुनी कृती.
सकल तै सुर भागहि घ्यावया, त्वरित येति सदा सुख हो तवा.

( हरिणी )

पशुपतिवरें लंकेशानें अनर्थचि मांडिला
करुनि पुढतीं लोकेशाला बुधीं हरि शंसिला—
" महिवरि करी ऐसा झाला अरी म्हणि तूं हरी
हरि बनुनियां संहारी त्या दया करि सत्वरीं. "

( उमा )

मापति त्या अमरांप्रति सांगत, ' घेइन जन्म धरेवरतीं
वानर होउनि साह्य करा मज, आस मला तुमची पुरती.
सूर्यकुलीं नृपती सुतहीन दयानिधि त्यापरि तो सुमती.
येइन त्या-उदरीं मग आपण सर्वहि संहरुं तो कुमती.'

[ ललित ]

पूर्ण—आहुती-समय पातला, देइ तो बळी नृपति अग्निला.
त्याक्षणीं पहा नवल वर्तलें, दिव्य तेज हो प्रकट जाहलें !

[ साकी ]

विद्युत्तेजा पाहुनि दिपती नयन जनांचे जैसे,
प्रजापती देवता बघोनी दिपले जनाक्षि तैसे.
प्रभाव नृप म्हणतो, तपोनिधीचा हा गमतो.

[ शालिनी ]

नेसोनीयां कृष्णवस्त्रासि आली, मेघारूढा देवता त्या सुकाळीं.
एके हातीं हेमपात्रा धरीते, जें स्वर्धेनूपायसें पूर्ण होतें.

[ द्रु. वि. ]

द्विवदना कथिते मुनिला असें, ' तप तुझें मजला सुख देवसे,
समज पायस भक्षिल जी तिला तनय होउनि रक्षिल भूमिला.

[ शिखरिणी ]

जशी विद्युल्लेखा क्षण चमकुनी जाय निधुनी
तशी ती हो ऐसें वच वदुनियां गुप्त जननी.
नृपा अर्पोनीयां त्वरित मुनि तो पायस, तया
वदे मोदें देई सकल महिषींना अपुलिया.

[ विबुधप्रिया ]

अर्पि तो नृप अन्न तोषुनि सर्वही महिषीजना
कैकयीप्रति भाग देउनि दोन, तोषवि तन्मना.
सर्वही ललनांहुनी प्रिय कैकयी नृपतीप्रती
मीन तो करि बद्ध टाकुनि रूपजाल तयाप्रती.

[ भुजंगप्रयात ]

करोनी यथासांग यागादिकांसी, निघे ऋष्यशृंग त्वरें अंगदेशीं;
दिलीं योग्य मानें नृपानें सुदानें मुनीलागि सप्रेम अत्यादरानें.

[ पंचचामर ]

नृपालकामिनी सुदिव्य पायसासि भक्षिती,
हळू हळू सुगर्भतेज तें चढे तयांप्रती.
दिनें दिनें निशापतीस तेज आगळें जसें,
नरेंद्रभामिनींसही क्रमें क्रमें चढे तसें.

[ मंदाक्रांता ]

डोहाळे ते बहुतपरिचे वाटती त्या तिघींना,
कौसल्येच्या मनिं गमतसे, 'तोषवावें मुनींना,
दंडोनीयां असुरकुलजां शासुनीयां खलांतें
भूमातेला सुखि करुनियां तोषवावें जनांतें.'

[ गीति ]

नक्षत्र ते पुनर्वसु असतांना चैत्रशुद्धनवमीला
श्रीराम जन्म घेती दशरथकुलिं, मोद नृपतिला झाला.

सवित्याचें तेज बघुनि दिसतो खद्योत मलिन अति जेवीं,
प्रभुच्या तेजापुढतीं रविहि दिसे हीन कांतिनें तेवीं.
ते नागर जन होती हर्षित शुभ वर्तमान परिसोनी;
शृंगारिती पुरातें ध्वजा पताका त्वरें उभारोनी
दुंदुभि वाजविती सुर, आकाशांतूनि वर्षती सुमनें.
विप्रां दान नृपति दे त्यांप्रति पूजीतसे, पहा ! सुमनें.
प्रसवे पुत्र सुमित्रा लक्ष्मण हें देति नांव त्या तनया.
कैकेयी सुतयुगला प्रसवे शत्रुघ्न भरत वदाति तयां.
बालक बघुनी चौघे नृपातिमनीं हर्ष तो बहू दाटे.
होउनि कृपाळु ईशें सौख्यनिधी हे दिले तया वाटे.
प्रभुजन्मकथा येथें रुचिर यथाबुद्धि वर्णिली विमला,
वदवो तो सकल चरित, नमितें प्रेमें तदीय पदकमलां.

---

## २. संक्रांतीचा तिळगूळ.

( दिंडी )

मकरसंक्रांती दिवस हा उदेला,
सकल भगिनीसमुदाय जमा झाला.
बहू कौशल्यें करुनि तिळगुळाला,
प्रेम मूर्तचि जणुं ! देति घेति त्याला.
बहु प्रेमें हे तीळ जतन केले,
मृदू हस्तें मग तया वाढवीलें.
विमल पाका चढवुनी मधुर केलें,
अलंकारीं गुंफण्या योग्य झाले.
ध्येय वनितांनीं हें मनीं धरावें,
तीळ तेवीं निज बाळ वाढवावे.
ज्ञानपाकामधिं तयां घोळवावें,

स्वदेशाचीं भूषणें त्यां करावें.
करी हलवा बोध हा आपणांसी,
बालसंगोपनिं वरा कुशलतेसी.
योग्य शिक्षण ज्या देति संततीशी,
आर्यमाता शोभतें नांव त्यांसी.
सकल भगिनीनों! एक मत करूं या;
दृढ प्रेमानें कार्य हें कराया.
'कुशल गृहिणी' या थोरपदा न्याया,
करूं विनती ही सतत ईशपायां.

---

## सौ. राधाबाई आपटे.

जन्म इ. स. १८९९.

पुण्यांतील सुप्रसिद्ध रहिवासी श्री. भास्करराव ओंकार हे प्रस्तुत कवयित्रींचे वडील होत. कवयित्रींचें शिक्षण म्याट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंत झालें आहे. शिवाय ड्रॉइंग सेकंड ग्रेड व मिडवाइफ्री या परीक्षाही त्यांनीं दिल्या आहेत. श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनीं कवयित्रींस त्यांच्या सुंदर काव्यरचनाशक्तीबद्दल 'काव्यचंद्रिका' ही पदवी दिली आहे. या उत्तम कीर्तन करितात. यासंबंधानें यांची प्रसिद्धि आहे. 'कीर्तनसुधा' या नांवाचें पुस्तक यांनीं लिहिलें आहे. त्याची लोकमान्य टिळकांसारख्यानीं तारीफ केली आहे. याशिवाय त्यांच्या स्फुट कविता अनेक आहेत. त्यांतून कांहीं खालीं दिल्या आहेत. कवयित्रींचे पति रा. पांडुरंगराव आपटे नासिक जिल्ह्यांत येवलें येथें शिक्षक आहेत. 'काव्यकल्पलता' श्रीमती सारजाबाई बापट या कवयित्रींच्या मावशी आहेत. कवयित्रींची कविता सरळ, प्रेमळ व गोड आहे.

## १. गेलें तें गेलें !

कवयित्रींची एक आवडती वस्तु एकाएकी कायमची हरवली तेव्हां त्यांना सुचलेले विचार त्यांनीं खालील पदांत ग्रथित केले आहेत.

( चाल—जो जो जो जो रे० )

गेलें तें गेलें, माघारें, येइल कैसें बा रे, गेलें तें गेलें ॥धृ०॥

सुंदर वनपुष्पा, जन्मोनी, गेलासी तूं रानीं
वाळुनिया सखया, पुन्हां जनीं, येशिल कां परतोनी ॥
वाटे गोड बहू, स्वप्न जरी, जागें झाल्यावरि जरि,
निजलों त्याच कुशीं, वरी वरी, येइल कां माघारी ॥
कविच्या स्फूर्ति मना, अलि आली, दुर्दैवें ती गेली ।
केला यत्न बहू, नच आली, पूर्ण निराशा झाली ॥
गेले बाळपणीं, दिवस किती, सर्व सुखाचे होती ।
केला यत्न जरी, नचि येती, दुःख मात्र ते देती ॥
केलें प्रेम अहा, किती किती, प्रिय गणुनी ज्यांवरती ।
जातां त्यागुनि ते, दुःख अती, परतुनि ते नच येती ॥
गेलें तें गेलें, हेचि अतां, शेवट झाल्यावरता ।
येईना कोणा, परतवितां, प्राणहि दिधले असतां ! ॥

---

## २. मृत बालकास !

कवयित्रींचें बालक अक्कलकोट येथें निवर्तलें. हें गांव सोडण्याच्या पूर्वदिवशीं खालील उद्गार कवयित्रींनीं त्याला उद्देशून काढिले.

( चाल—उद्धवा शांतवन कर जा० )

मृत बाळा, देह तुझा मीं, ठेवियला या भूभागीं ॥
या स्थलीं प्राण तुजपाशीं, जरि देह कोणत्या जागीं ॥
सोडुनिया जातें तुजला, मी खरोखरी हतभागी ॥

मी अखेर जातां जातां,
पातलें इथें तुजकरितां,
धरुनियां प्राण हा कंठीं,
ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥धृ०॥

मृत्तिका, शिला, या स्थलिंची, गमतसे प्राणही साचा ॥
भावना थोर ती येथें, प्राण अंश मम बाळाचा ॥
बावरलें चित्त कळेना, हा वियोग साहूं कैचा ॥

ये धांवत येई बाळा,
प्राण हा नकोसा झाला,
देहभार कोणासाठीं,

ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥
बालका ऐक सुकुमारा, मातेच्या प्रेमळ गीता ॥
प्रेमगीत कैचें आतां, दुःखाची केवळ सरिता ॥
नयनांतिल अश्रुजळांनीं, न्हाणितें तुला मी आतां ॥

तुज कोण गीत प्रेमानें,
गाईल नित्य नेमानें,
ये धांवत पाठोपाठीं,

ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥
येइनासि अजुनी सखया, वाट तूं पाहसी कैची ॥
जा जाई निजधामातें, तृप्तता करुनि नयनाची ॥
एकदा धरुनि हृदयासी, मुक्तता करिन कायमची ॥

रुदनादिक शब्द खुणेचे,
गोड हेतु हे कर्णांचे,
ऐकणें बाल मधुगोष्टी,

ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥
काकुळती येउनि वदलें, यश नोहे वाटे खंत ॥

वेलीनों अळवा कोणी, यश तुम्हां देउं भगवन्त ॥
एकवार दावा बाला, पाहतां असा कां अंत ? ॥
हे हात तुम्हां पसरीले,
एकरूप मानस झालें,
झांकितें अतां ही दृष्टी,
ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥
वाटली कींव प्रभुराया, तरुहस्तें देई मातें ॥
एकाकीं वरुनी पडलें, सुमन ! तें बकुल नव होतें ॥
सुमनरूप घेउनि आलें, मज़साठीं बालक कां तें ! ॥
ठेवुं या सुमाला कोठें,
खल कोणी चोरिल वाटे,
ठेवियलें हृदयकपाटीं,
ये फुला मुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥

---

## ३. पूर्णविराम !

पूर्णविरामाच्या महत्त्वाचें हें विनोदपर वर्णन कवयित्रींनीं स्वानुभवावरून केलें आहे !

( गीति. )

बंधु मला दिससी तूं, पूर्णविरामा ! सदैव विश्रामा !
शुद्ध प्रेमा दावुनि आम्हां देसी अमूप आरामा !
" पुस्तक काढा, वाचा, " शिक्षक जेव्हां अम्हां वदे वाचे,
रक्षण करण्या तुजसम कामा ये कां प्रभुत्व देवाचें !
भिस्त तुझ्यावरि ठेवुनि धुंडाया सतत काळजी वाहीं,
लवही विलंब येण्या होतां ये छडिच ! काळ जीवा ही !
कंप सुटे पायाला, जिह्वा तैसीच आर्द्रता सांडी,
घामहि अंगा येई वाटूं लागे निघेल तासाडी !
चिंता क्षणांत उपजे; गुरुजी देतील दक्षिणा कांहीं,

गाल जपाया विनवी वामकरा ! जणुं हरीस कृष्णा ही.
केविलवाणी ऐसी गति होतां, पाडसा जशी गाय,
दर्शन देई तैसा, कैसा मग मोद मानसीं माय ?
केव्हां केव्हां कपटा आचरुनी पाहसी कसोनि अम्हां,
भक्ती लटकी आहे किंवा तुजवरि खरीच निष्कामा !
स्वल्पविरामा किंवा अर्धविरामा उगीच धाडून
पाहसि अंत कसा रे ! हृष्ट मनानें हळूचि आडून ।
कधिं न कुणा अडवावें, धांव्यासरसें तुवां पुढें यावें,
जैसें वत्सलभावें पावन केलें ध्रुवासि त्या देवें.

---

## श्रीमती सावित्रीबाई दाते.

जन्म इ. स. १८८९; मृत्यु इ. स. १९२०.

कवयित्रींचें माहेरचें नांव 'सगुणा' होतें. कवयित्रींचे बंधु रा. भास्कर रामचंद्र खरे यांनीं आपल्या भगिनीला एका विशेष प्रसंगीं 'कमलिनी' हें नांव दिलें. कवयित्रींनीं या दोहोंपैकीं एकाचा आपल्या पद्यांत उपयोग केला आहे. कवयित्रींचा 'कमलिनीविकास' या नांवाचा पद्यात्मक ग्रंथ त्यांच्या चरित्रासह लवकरच प्रकाशित व्हावयाचा आहे. सदर ग्रंथांतून खालीं दिलेलीं प्रकरणें उतरून घेतलीं आहेत. यांवर वैराग्याची छटा असून हीं सुंदर व प्रसन्न आहेत.

### १. दुःख कुठें तें सांग !

(चाल—पांखरा येशिल कां परतून ?)

मानवा, दुःख कुठें तें सांग,
हरिचरणाचें ध्यान लागतां । दुःख कुठें तें सांग ।। ध्रु० ।।

बसल्याठायीं स्वर्गाचि गमतो । दूर नसे तो जाण ॥
येथें तेथें भेद न कांहीं । पूर्ण मनीं हें आण ॥
सर्वांठायीं व्यापुनि उरला । मनिं भरला तो राम ॥
निज देहाचें भान नुरे मग । अवघाचि श्रीराम ॥
अहा ! किती ही स्थिती मनोहर । नाहिंच कसालि गुमान ॥
चिन्मयरूपीं तन्मय होउनि । जावा मम हा प्राण ॥
सुखमय सारें जग हें बा रे ! होइल तुजशीं जाण ॥
खरें बोल हे वदे 'कमलिनी' । संशय मनिं नच आण ॥

---

## २. वासना.

( चाल—काधिं करिती लग्न माझें. )

जन्माला मानवाला, कारण ही वासना ॥ ध्रु० ॥
वासना, कर्म करविते, पुण्य हरविते, पहा फिरविते,
थोरथोरांना, कारण० ॥
ज्यावरी, जाय एकदा, फिरेना कदा, त्यांमध्यें सदा
भुलवि जीवांना, कारण० ॥
भ्रमरिचें, ध्यान अंतरीं, कीटकी करी, होय झडकरी,
स्वयें ती जाणा, कारण० ॥
नारदें, स्त्रीस इच्छितां, स्त्रीच तरवतां, होउनी स्वतां,
भोगि विषयांना, कारण० ॥
भरताही, हरिण-पाडसें, भुलविलें कसें, विदित हें असे,
जगीं सुज्ञांना, कारण० ॥
म्हणउनी, तीच हरिपदीं, लावुनी सुधी, चुकवि बा सपदि,
जन्ममरणांना कारण० ॥
सांगती, शुक महामती, तेंचि परिसुनी, स्मरत 'कमलिनी'
कृष्णचरणांना, कारण० ॥

---

## ३. कर्मयोग.

( चाल—ऊठ गोपालजी जाइ धेनूंकडे० )

ऊठ जीवा त्वरें, स्वहित साधी बरें,
विषयिं मन वावरे, आवरी त्या ।। ध्रु० ।।
हिंडलां बहुपरी, नरतनू तुज बरी
लाधली, यमपुरी चुकवि आतां ।।
सांग बा या मना, आठवी वामना,
व्यर्थ ही कल्पना दुःखदायी ।।
जोड सत्संगती, ना तरी दुर्गती,
जाशि तूं निश्चिती, जाण बापा ।।
सद्विवेका करी, काम सारी दुरी,
अंतिं जो संहरी मानवाला ।।
करिशि कांहीं जरी, कर्म तें तूं धरी,
अर्पि गा श्रीहरी–पादपद्मीं ।।
थोर कार्यें करी, सर्वदा भूवरी
परि न बा मनिं धरी गर्व त्याचा ।।
यापरी वागतां सहजची सिद्धता
अंगिं तव बाणतां मोक्ष जोडे ।।
ठेवुनी हें मनीं निशिदिनीं 'कमलिनी'
स्वात्मसद्दर्शनीं रमत राहे ।।

---

## ४. भूपाळी.

( चाल—घनश्यामसुंदरा श्रीधरा० )

ऊठि मना रे चाल सत्वरीं स्वयंशांतिच्या कडे ।। गड्या रे ।।
जिये संगतीं भ्रांतिपटल हें आपोआपचि उडे ।। ध्रु. ।।
उगिच कासया दमसी श्रमसी भ्रमसी मायेमधीं ।।गड्या रे।।

जिये संगतीं स्वानंदाचा लाभ न होई कधीं ॥
ऐहिक विषयीं लुब्ध न होई सौख्य वाटलें जरी ॥गड्या रे॥
करी तयाचें स्वागत जागृत राहुनि तूं अंतरीं ॥
देश काल हा पाहुनि वर्तन ठेवि योग्य तें सदा ॥
कदा न सोडी सत्य भाषणा येइ जरी आपदा ॥
विसरुं नको हा बोध कदा
सोडुनि देई लोभमदा
निजस्वरूपीं रमे सदा
सोऽहं सोऽहं मंत्र जपे हा निश्चल वृत्ति करी ॥गड्या रे॥
आत्मरूप मग होय 'कमलिनी' सबाह्य अभ्यंतरीं ॥

---

## ५. " अंमळ "

कवयित्रींच्या तोंडांत ' अंमळ ' हा शब्द फार येई. त्यावर एकानें टीका केली. त्याला कवयित्रीनीं खालील विनोदपर उत्तर पाठविलें. यांत आलेलीं नांवें कवयित्रींच्या बहीणभावंडांचीं आहेत.

( चाल—फटका )

देउनि आशीर्वाद तुम्हांला पत्र अतां हें लिहीतसें ।
दूर असोनी तुम्हां निरंतर जवळीं मी पाहात असें ॥
कोणी हंसतां, कोणी रुसतां, दिसतां फिरतां चहूंकडे ।
अति आनंदें कौतुक तुमचें दुरूनि आई पाहतसे ॥
' विष्णु-विनायक ' जोडि धाकुटी शाळेंतुनि ही येत असे ।
अल्लड ' काशी ' त्यांच्या मागुनि बोलत बोलत चालतसे ॥
'दिनकर' भोळा खरा बिचारा अभ्यासांतचि गर्क असे ।
काय करी तो कोठें जातो, भान तयाचें त्यास नसे ॥
पत्र पावलें, सर्व समजलें, मजकुरही जो त्वां लिहिला ।

उत्तर त्याचें देइन आर्धी पत्र पूर्ण मग लिहिन तुला ॥
'लबाड' म्हणत्यें राग न येवो, भागच पडलें तें मजला ।
मागें अक्षय किती लागसी काय म्हणावें तरि तुजला ! ॥
' अंमळ ' करि अभ्यासा, ' अंमळ ' सारुनि आळस बाजूला ।
' अंमळ ' माझा शब्द लाडका, ठेविशि नांवें कां त्याला ? ॥
' अंमळ ' माझें कमी न होई ' अंमळ ' त्याला काय करूं ।
शब्द कोणता घालूं येथें ? ' अंमळ ', ' अंमळ ' कमी करूं ?॥
तिनिसांजाची वेळ जाहली आतां ' अंमळ ' मी उठतें ।
' अंमळ ' थोडें काम करोनी पत्र पुरें हें मग करितें ! ! ॥

---

## ६. वेडी.

( चाल—श्रीमंत पतीची राणी. )

मायेची तोडुनि बेडी । जाहलें खरोखर वेडी ! ॥ धृ० ॥

अळसाचा आळस आला । राग हा रुसोनी गेला ।
मानी न स्वार्थहि मजला । गर्वही पूर्ण मज सोडी ॥
जें आजवरी मीं माझें । वाहिलें भ्रांतिचें ओझें ।
टाकिलें आजि तें सहजें । कामास लाविली काडी ॥
सुखदुःख कळेना मजला । प्रेमाचा पाझर फुटला ।
मानी न बोध तो कसला । पाषाणहृदय तरि फोडी ॥
जगीं सर्व सुखें जीं कांहीं । लोळती जयाच्या पायीं ।
' कमलिनी ' तया मनिं कोंडी । क्षणभरिहि न त्याला सोडी ॥
लागला तयाचा चटका । संसार दिसे हा लटका ।
तन्नामरसाचा घुटका । घेतांच लागली गोडी ॥

## ७. ‘ ये बैस हृदयिं तूं माझ्या ! ’

( चाल—उद्धवा शांतवन कर जा. )

तुजविणें सांग रघुराया । कैसी ही वागवुं काया ? ॥ घृ० ॥

तूं नसतां देहामाजी ।
हा देह येइना कार्जी ।
असतां तूं करिती ‘ जी, जी, ’ ।
येउनी लागती पायां ॥
मीपणें जरी करि कांहीं ।
तें कार्य न सिद्धिस जाई ।
ऐल ना पैलही पाहीं
लोंबतें मधेंची वायां
बा ऐक ऐक रघुराजा
ये बैस हृदयिं तूं माझ्या ।
मम वाणी लीला तुझिया ।
लागेल प्रेमें गाया ॥
ऐकुनी शब्द मम हंसली ।
पुरविण्या कोड जणुं उठली ।
मूर्तिही चतुर्भुज दिसला ।
रोमांचित झाली काया ॥
विसरुनि मग देहालागी ।
स्वानंदसौख्य तें भोगी ।
होवोनि पूर्ण अनुरागी ।
‘ कमलिनी ’ भजे रघुराया ॥

---

## ८. मुरली.

( चाल—माता दिसली समरीं विहरत. )

सुस्वर वेणू वनिं वाजवितो । पाहुं चला मनमोहन हरि तो ॥ घृ० ॥

सुहास्य वदनीं सुंदर मुरली
    ठेवुनिया कर चाळवितो ॥
नाना-छंदें गायन करितो
    मेळवुनीया सप्त स्वर तो ॥
मधुर रवें त्या मन्मन हरिलें
    जीव त्याकडे धांवचि घेतो ॥
सुचत न कांहीं मज गे सदनीं
    काम्, मुळिं, गडे ऐकुनि रव तो ॥
दावुनि लीला वेडचि मजला
    लावियलें, सखि पाहुं प्रभु तो ॥
दिसत सये मी संमुख तुजशी
    परि तनु येथें, जीव वनीं तो ॥
चल झणिं जाऊं मुक्तचि होऊं
    कुटुनि भेद मग सखये ! 'मी, तो '॥
श्रीहरि पाहुनि भाव तियेचा
    स्वरूप दावुनि सोडवि तिस तो ॥
त्या श्रीहरिच्या स्तुत पदकमला
    नमुनि ' कमलिनी ' तेथेंचि रतो ! ॥

---

## ९. बाळपणची एक आठवण !

( चाल—भूपती खरे ते० )

बहु खेळ खेळुनी व्यर्थ वेळ दवडीला ।
    नच लाभ उलट परि क्षीण शरीरा आला ॥ धृ० ॥

मी असतां निद्रित मांडीवर तव आई ।
    बहु दूर गलबला कर्णीं ऐकूं येई ॥
' हें काय वाजतें, ' म्हणूनि पुसिलें तूतें
    तैं तुवां कथियलें, ' खेळ असे गे तेथें. '

ऐकुनी नांव खेळाचें अंतरीं ।।
वाटलें आपणाहि जावें । झडकरीं ।।
मग विचारिलें मीं, 'जाऊं कां खेळाला ।
खेळोनि लवकरी येइन मी सदनाला.' ।।
त्वां हंसत मुखानें आज्ञा दिधली मजसी ।
'जा सगुणे बाळे! शुद्ध ठेव परि घरिंची.' ।।
मग धांवत धांवत गेलें मी त्या स्थानीं ।
बघुनियां खेळ तो गुंगचि झालें जननि ! ।।
आनंदें मीहि तेथें, । मिसळलें ।।
त्याक्षणीं तुजसिही माते ! । विसरलें ।।
बघुनियां नविन मज हर्ष गड्यांना झाला
कसुनिया खेळतां डाव रंगुनी गेला ।।
मी राज्य घेउनी सज्ज जाहलें जेव्हां ।
स्फुरण चढुनि बहु बोलतसें मी तेव्हां ।।
'कां करितां गमजा पळतां अवघे सारे ।
परि अतां धरिन मी वेळ न लागे क्षण रे' ।।
म्हणुनियां धांव मारिली । मी पुढें ।।
'थांब गे धरीतें आतां । तुज गडे' ।।
मग थाप मारुनी धरिलें मीं एकाला ।
देउनी डाव त्या खेळ पुरा मीं केला ।।
मग क्षणभर बसलें घेत विसांवा तेथें ।
तंव गडी बोलती, 'ऊठ, चोर हा येथें !' ।।
मग धरिल चोर तो म्हणवुनि घाई घाई ।
चालतां अधिकची दुःख मला तें होई ।।
धांवतां धांवतां गेलें । थकुनियां ।।
मारिली थाप जोरानें । तेधवां ।।
मग मटकन बसलें घेरी ये नयनांला ।।
तेधवां जाहली आइ ! आठवण मजला ! ।।

" परतुनी त्वरित ये. " मातेनें मज कथिलें ।
तें वचन मोडुनी उगाच येथें श्रमलें ॥
मग उठत बसत मीं तुझिय जवळीं आलें ।
" करि क्षमा " वदुनियां नमिलीं तव पदकमलें ॥
प्रेमळा बोधदुग्ध मज पाजी । माउली ॥
करितसे मजासि पदराची । साउली ॥
नच क्रुद्ध होतसे मांडीवर घे मजला ।
वारुनी भीति करि शांत निजा ' सगुणेला ! '

## १०. गंगावन्दन.

गंगे ! मी नमितें तुजसी । पतितां तूं पावन करिसी ॥
करिसि तूं मुक्त सकलांला । स्पर्श तुझा जरि त्यां झाला ॥
जाहला मुक्त ऋषि पाही । गोहत्या जरि त्या होई ॥
होई तो वंद्यचि जगता । प्रार्थुनी होय तुज अणिता ॥
आणितां या स्थळीं तुजला । बहु लाभ जनासी झाला ॥
जाहला हर्ष गे मजसी । भरलेली पाहुनी तुजसी ॥
तुजसि गे साधु मुनि भजती । तुजमधें स्नात सुर होती ॥
होति ते मुक्त लवलाही । कीर्ति ही जनीं तव पाही ॥
पाहिं मी तुजसिं जैं गंगे । आनंदें मन हें रंगे ॥
रंगे शिव शंभुहि तुजसीं । मस्तकीं तयाच्या बससी ॥
बससि तूं शिवाच्या डोई । एवढी थोर तूं बाई ! ॥
बाइ ! मी लागतें पायीं । नच अन्तर मजला देई ॥
देइ गे ठाव तव चरणीं । ' सगुणा ' ही जोडित पाणी ॥
पाणी तव निर्मल जैसें । मन्मनही होवो तैसें ! ॥

# सौ. पार्वतीबाई केतकर.

जन्म इ. स. १८८०

सौ० पार्वतीबाई या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची कन्या, व नासिक येथील वकील रा० विश्वनाथ गंगाधर केतकर यांच्या पत्नी, होत. लोकमान्यांचा अलौकिक पुत्र 'केसरी' व त्यांची लौकिक कन्या प्रस्तुत कवयित्री यांचा जन्म एकाच सालीं झाला! खालील कविता व दुसऱ्या कांहीं, कवयित्रींनीं अठरा वीस वर्षांमागें, तात्कालिक स्फूर्तीनें, रचिल्या. त्यानंतर त्यांस कविता करण्यास अवसरच मिळाला नाहीं. यांचें मराठीचें शिक्षण पुरें होऊन यांस इंग्रजीचाही थोडा संस्कार झाला. नासिक येथील 'महिलासहकारीसंस्था' व तिच्या शाखा यांच्या अध्यक्षत्वाखालीं व देख-रेखीखालीं चालल्या आहेत. पुढील पद्यांत कवयित्रींची आनुवंशिक तेजस्वी विचारसरणी दिसून येते.

---

## १. श्रीजिजाबाईचे डोहाळे.

(चाल—अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला० )

" श्री-अंबेनें भवानिनें वर दिधला
म्हणुनिया दिवस हा आला ।।
मज वाटतसे आजपासुनी अपुला ।
भाग्योदय खचित जहाला ।।
तव मुखचन्द्र, प्रिये! अशा समयाला ।
बहु खिन्न कशानें झाला ? ।।
तव मना काय आवडतें ?

तव चित्त कशावर जडतें ?
जरि असे फार अवघड तें
पुरवीन तरी; सांग मला तव चित्तीं
कोणते मनोरथ वसती " ॥
निज कांतेला डोहाळे अति-प्रीति
सरदार शहाजी पुसती ॥ ध्रु० ॥

वदली जाया जिजाइ, " स्वातंत्र्याची
आवड मज; नच दास्याची. ॥
ही हीन दशा झाली गोविप्रांची
तशिच ती देशधर्मांची ॥
उध्वस्त जनीं मंदिरें हिंदुलोकांचीं
यवनानीं केलीं साचीं ॥
हा धर्मच्छल बघवेना ।
हें पारतंत्र्य साहेना ।
मृत अन्न गोड लागेना ।
परदास्यानें मेळविली संपत्ति
मज वाटे केवळ माती ॥ २ ॥

गमतें मजला तलवार ढाल घेवोनी
निज वाजीवराते बसोनी ॥
शूर मराठे वीर सर्व घेवोनी
युद्धासि समरिं जाऊनी ॥
बहु शौर्यानें म्लेच्छ शत्रु मारोनी
घ्यावें निज राज्य जिणोनी ॥
या कामिं मरण जरि येई ।
आनंद मनाला होई ।
या वीण न इच्छा कांहीं " ।
परिसुनि वच हें समजला मनीं सरदार
शूर पुत्र अवतरणार.

# सौ. इंदिराबाई देवधर.

जन्मशक १८२३, जन्मसन इ. १९०१.

पुण्याच्या न्यू पूना कॉलेजांतील प्रोफेसर दिनकर बळवंत देवधर यांच्या प्रस्तुत कवयित्री पत्नी होत. त्याच कॉलेजांतील दुसरे प्रोफेसर रघुनाथ दामोदर करमरकर यांच्या ह्या भागिनी होत. सुसंस्कृत पति व बंधु यांच्या सहवासानें, उत्तेजनानें व प्रेरणेनें कवयित्रींस शिक्षणाचा लाभ होऊन त्यांस काव्यस्फूर्ति झाली आहे. या स्फूर्तीचा बाल्यावस्थेंतील विकास विलासही अभिनंदनीय आहे. खालीं दिलेल्या दोन लहान कवितांवरून कवयित्रींच्या भावी काव्यांचें उज्ज्वल स्वरूप लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

---

## १. सिंहगडाकडे पाहून.

( चाल—सबसे राम इ० )

तो हा दैवहीन किल्ला, वाली याला कुणि नुरला ! ॥
मर्द मावळे कितीक लढले जिंकायाला गड हाची ।
तानाजीनें प्राण अर्पुनी कमाल केली शौर्याची ॥
शत्रुपराभव करावयाच्या कामीं बहु जो साह्य करी ।
शिवरायाला, तोच आज कीं पडलासे परकीय करीं ! ॥
स्वातंत्र्याचा भगवा झेंडा त्यावरि ज्यांनीं फडकविला ।
वीर सर्व ते, दिवसहि, गेले ! काल अशुभसा हा आला ॥
गड आला पण सिंह हरपला ! हानि जाहली थोर खरी ।
आतां जाउनि लोक राहती चैनीखातर त्याजवरी ॥
दृष्टि देखतां अजुनि तयाला उर्मि येतसे शौर्याला ।
स्मरण देउनी तानाजीचें अश्रु आणि तो नयनांला ॥

---

## २. माझ्या बाळाचा वाढदिवस.

या कवितेतील विचार हिंद-देवीच्या मुखांत कवयित्रींनीं घातले आहेत.

( चाल—उद्धवा शांतवन कर जा. )

हें मन प्रमोदें भरलें शुभ दिन हा आजि उदेला ।
चौसष्ट जाहलीं वर्षें आज पुरीं माझ्या बाळा ।
थैमान अंतरीं घाली उल्लसित वृत्ति ही विमळा ।
कवणाला सांगू आतां ।
सुख मनिचें भरुनी उरतां ।
आनंद नावरे चित्ता ।
प्रेमनीर नयनीं आलें ।
हा जन्मदिवस बाळाचा, सुजनांनों पेढे घ्या हे ॥
गे स्वराज्यलेणें देई तूं आङ्ग्लभगिनि ! बाळाला ।
हीं नकलीं दुसरीं कसलीं टिकणारीं नसती त्याला ।
तन्निश्चय न दळे कोणा, बघ हट्ट घेउनी बसला ।
श्रमला हा किति त्यासाठीं ।
परि देसी नाणीं खोटीं ।
रुष्ट कां जाहालिस पोटीं ॥
विसरलीस नातें अपुलें । हा जन्मदिवस० ।
साहसीं उडी हा घाली पर्वा न जिवाची याला ।
काशि चढेल विभवा माता चिंता ही नित्य मनाला ।
कुणि रोष तयावरि करिती परि आवडतां सकळांला ॥
दुष्टांनीं बहुताचि छळिला ।
सुष्टांनीं हृदयीं धरिला ।
लागल दृष्ट बाळाला ।
नवसाचें पाडस माझें ॥ हा जन्मदिवस० ॥

वाटलें दीन मी झालें कैवारी नचि उरल्यानें ।
लागले कुटिल जन पाहूं मजकडे वक्र नयनानें ।
भूषणें हिरोनी नेलीं तनुवरचीं नीचपणानें ।
धावला बाळ मग माझा ।
गर्जला केसरी त्याचा ।
घालविला भेद जनांचा ।
जागला स्वकर्तव्यातें ॥ हा जन्मदिवस० ॥
एकेक शृंखला काढी, किति मजवरि प्रेम तयाचें ।
सन्मान रुचेना त्याला, पाहुनि क्लेश हे माझे ।
किति पुत्रशोक मज झाले, परि बुझवी दुःख तयांचें ।
क्षीण जरी झाली शक्ति ।
हिंडोनि अखिल भूवरता ।
पसरावेली माझी कीर्ति ।
किति सांगू गुण तुम्हां हे ॥ हा जन्मदिवस० ॥
सुप्रभात साक्ष ही देते, बाळाच्या कर्तृत्वाची ।
हा स्वराज्यरवि वरि येतां, समजेल थोरवी त्याची ।
सारुनी द्वेष बाजूला, एकदां नयन उघडाची ।
मग तुम्हां पूर्ण कळेल ।
अंतरिंचा भेद उडेल ।
बाळ हा असे बिनमोल ।
त्यागाल वाम मार्गातें ॥ हा जन्मदिवस० ॥
मागतें हिंददेवी मी, प्रभुराज ! एवढें पायीं ॥
जें कार्य धरिल करिं बाळ, करि त्यास त्यामध्यें विजयी ।
दास्याची तोडायाला, शृंखला आयु त्या देई ॥
नेलेसि किती पुत्रांतें ।
साधाया निज कार्यातें !
एवढा तरी लाभूं दे ।
ही विनती पदकमलातें ॥ हा जन्मदिवस० ॥

## 'सुशीला.'

—०—

या कवयित्री नासिक येथें आहेत. आपल्याविषयींची माहिती प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा नाहीं. म्हणून ती येथें देतां येत नाहीं! कवयित्रींच्या खालील कृतीचा रसिक वाचक आस्वाद घेतील व तिचें कौतुक करितील यांत शंका नाहीं.

### १. स्वर्गगमन.

जगाच्या अपूर्णतेला विटलेली व विश्वाची पूर्णता पहावयास उत्सुक असलेली कन्या स्वर्गास जाण्यासाठीं व तेथील दिव्य भोग भोगण्यासाठीं आपल्या मातेची अनुमति घेत आहे असें या काव्यांत वर्णिलें आहे.

( चाल—उद्यां बघ जातें० )

उद्यां बघ जातें, सोडुनी तुला स्वर्गातें ।। धृ० ।।
बिंब रवीचें उदया येई,
जलबिंदू जणुं मौक्तिक होई,
लता वर्षती सुमनें आई !
परि क्षय यातें, सोडुनी तुला स्वर्गातें ।।
उपवनिं खग ते गाउनि गीतें,
क्रीडति सेविति रसगंधातें,
मयूर मृग दे सुख दृष्टीतें,
परि न तें टिकतें, सोडुनी तुला स्वर्गातें ।।
कोमल पल्लव नव तेजानें,
डोलति निलांकुरही सानें,
रमाविति जनता आनंदानें,
नाश परि यातें, सोडुनी तुला स्वर्गातें ।।

रिझवि वायुचा रव श्रुतीला,
निर्झर बोलें दे स्फूर्तीला,
अल्प भास हा तृप्ति न मजला,
चित्त ना रमतें, सोडुनी तुला स्वर्गातें ॥
अपूर्णता ही मूर्तांचि गमते,
रम्य परि न हें शाश्वत दिसतें,
विश्व पूर्ण तें पहावयातें,
आइ मी जातें, सोडुनी तुला स्वर्गातें ॥
भय मृत्यूचें मला न भासे ।
भावि विभव तें पुढतीं विलसे ।
बोलवि मज तें सुंदर खासें ।
आदरें माते, सोडुनी तुला स्वर्गातें. ॥
सेविन तुजला नित्य मनानें ।
कृतज्ञता तव गाउनि गानें ।
अंतर भरलें सात्त्विकतेनें ।
पुण्य भुवनातें, सोडुनी तुला स्वर्गातें ॥
दिव्य भोग ते भोगायाते ।
जातें माते ! दे अनुमतितें ।
उत्सुक मम मन दिव्य रसातें ।
त्वरित चाखाया, सोडुनी तुला स्वर्गातें ॥

---

## २. मायेचें जाळें.

( चाल— भाव धरा रे० )

गूढ हें कोणी, उकलील जगीं का प्राणी ? ॥
पूर्ण गूढ या मायाजाला ।
गुणसंग्रह हा कोणीं केला ? ।

गुंठण केवीं ! विचित्र लीला ! ।
कोण निर्मीतो ? उकलुनी कां न दावी तो ? ॥
रूप कळेना, रंग दिसेना ।
आदी—अंतां स्थान मिळेना ।
सूत्र एक ते तंतू नाना ।
कळेना कांहीं, मति गुंग होउनी राही ॥
दृश्य ह्मणावें तरि ना दिसतें ।
अखिल विश्व परि व्यापुनि उरतें ।
वस्तुमात्र ना त्याविण हलते ।
अतर्क्यांचि बा रे ! मानवा कसें हें सारें ॥
सूत्रधार हा कवण असावा ? ।
नाचवि विश्वा तो नचि ठावा ।
अगम्य मनुजा कां तो व्हावा ? ।
थोर लघु पाहो, त्याविणें लगेना कांहीं ॥
जननी जनकांहि दुर्लभ मेवा ।
सुलभ बालका करुनी द्यावा ।
विमल कुणाचा हेतु असावा ।
गूढ कां माया ? सिद्ध जी जगा भुलवाया ॥
शिशुस्नेह जो अगम्य मतिला ।
जननीहृदयीं संचित केला ।
विश्वगोल हा झुलवी सगळा ।
सूत्र घे हातीं, काय ती अशी हे शक्ती ! ॥
निर्मितसे जग इच्छामात्रें ।
नाशहि करिते लीलामात्रें ।
कोठुनि संभव कां लय त्यातें ।
कशी जाणावी, कुशलता काय वानावी ? ॥
दमले ज्ञानी मुनि यति मागें ।
सांप्रतचा विद्वज्जनही भागे ।

" नेति नेति " वदलीं वेदांगें ।
परी कवणाला, नाकळे कशी गुणलीला ॥.
त्रैलोक्याला जी करिं ठेवी ।
जीवारि सृष्टी अवलंबावी ।
ती मूर्ति न कां दृष्टि पडावी ? ।
प्रार्थिते बाला, सोडवा प्रश्नमालेला.

---

## सौ० द्वारकाबाई जोशी.

जन्मसन १९०६ इसवी.

### १. मातृगीत.

( चाल—चंद्रकान्तराजाची कन्या० )

दिवस किती जाहले भेटुनी तुजलागीं, माते !
नको नको हा जन्म स्त्रियांचा वाटे चित्तातें ॥
नऊ मास तूं उदरी वाहुनि वाढविलें मजला,
सर्व तऱ्हेनें लाड पुरवुनी करुनि कौतुकाला ॥
आतां केवीं सोडुनि तुजला दुरिं राहूं माते !
काय करावें ! सुचे न कांहीं माझ्या चित्तातें ॥
जन्म व्यर्थ हा गमतो माझा पराधीन भारी
कधीं भेटसी तव कन्येला आई सांग तरी ॥
तुज भेटाया रात्रंदिन हें मन कीं तळमळतें
धीर किती मी देऊं आतां यापुढती त्यातें ॥
हे परमेशा ! दयासागरा ! तूंच धीर देई
दुःखित हृदया माझ्या; ऐसें विनवि ' द्वारका ' ही ॥

---

## २. चंद्रग्रहण.

( चाल—राजहंस माझा निजला० )

लागलें ग्रहण चंद्राला, अश्रु येति मम नयनांला.
प्राचीला सायंकाळीं, चांदवा उगवतां झाला.
प्रतिदिवशीं जैसा येई, तैसा तो वरतीं आला.
परि कळलें नाहीं त्याला जिंकाया शत्रू आला.
रजनिनाथ नभिं जों आला
तों त्यासि धराया टपला
तो राहू पुढती झाला
चंद्रावरि घालुनि घाला, निस्तेज करितसे त्याला !
मनिं राहु फार तो धाला, कीं करीं अरी सांपडला.
विधु संकटमग्नचि झाला, मग काय सुचे हो त्याला ?
राहुनें ग्रासिलें शशिला
जग घरी मनीं भीतीला
बहु खेद साधुच्या मतिला
हे देवा दीनदयाळा, सोडवी दीन चंद्राला.
लेख जो भाळिं लिहिलेला, तो पुसवे काय कुणाला ?
निरपराध विधु हा गमला, छळि राहु अकारण त्याला !
जरि मुक्त करिसि बा ! त्याला
मम मनिंच्या आनंदाला
मग पारावार न उरला !
प्रभुपदीं नम्र होवोनी "द्वारका" करी विनतीला.

# सौ० लक्ष्मीबाई लेले.

## १. मातेचा दुःखोद्गार.

( चाल—हे सीते कोमलगात्रि० )

गेला मम उडुनी रावा, येईल परतुनी केंव्हां ॥ धृ० ॥
बहु चपल हरिणसा होता राजस माझा ।
रमवी मज करुनी मौजा ॥
लागतां ग्रहण रोगांचें बालरवीला ।
त्यजि खेळ, बिछाना धरिला ॥
पूर्व पुण्य होतें कांहीं ।
ह्मणुनीच लाभला बाई ।
मी त्यातें योग्य न आई ।
जाणुनि कां परमेशानें प्राणविसावा ।
अर्पिला स्वर्गसुख ठेवा ॥ १ ॥
लागली झोंप बाळास या भ्रमीं होतें
तों वैद्य पातले तेथें ॥
देखतांचि चर्या त्याची म्लान मुख करिती,
'दुःखांतुनि सुटला' वदती ! ॥
ते कवण्या अर्थें वदले
तें मातें नाहीं कळलें !
परि मजसम मूढ न सगळे !
उचलिती पाडसा घोर स्मशानीं न्याया
माती दगडांची शय्या ! येईल० ॥ २ ॥
हरपलें रत्न मम हाय कुठें शोधावें ?
जीवित हें केविं कंठावें ।
कोठुनि ये भरती आतां सुखसिंधूला
हा चंद्र आजि मावळला !

हें फूल प्रेमवृक्षाचें ।
नक्षत्र गगन-सदनींचें ।
खेळणें अम्हां उभयांचें ।
नेलें त्या दुष्ट कृतांतें साधिला दावा,
किति क्रूर अससि तूं दैवा ! येईल० ॥ ३ ॥

---

## २. हिंदु स्त्रियांची स्थिति !

( चाल—मी नव बाळा० )

जन्म कठिण जगतीं अबलांचा, वदतां ये नचि असुनी वाचा ॥जन्म०॥
मूर्ख पती विद्वान कसाही, मान हवा राखाया त्याचा ! ॥ जन्म० ॥
अपुल्या आप्तस्वकीयांहूनी, श्वानहि मोठा श्वशुरगृहींचा ॥ जन्म० ॥
आवडनावड नाहीं स्त्रीला, गुलाम जणुं पतिच्या मर्जीचा ॥ जन्म० ॥
पुरुषार्थ नरा मोठा वाटे, मान खंडण्या अर्धांगीचा ॥ जन्म० ॥
ज्ञान जरि किती स्त्रीला असलें, किताब मिळतो मूर्खत्वाचा ॥ जन्म०॥
सोसुनि सारें मानिति नारी, अवतार पती श्रीविष्णूचा ॥ जन्म० ॥
सहनशीलता मूर्तिमती या, महिमा किति वर्णावा त्यांचा ! ॥ जन्म० ॥
जाणतील नर नकळे केव्हां, स्त्री हा अपुला मित्र जिवाचा ! ॥ जन्म० ॥

---

## ३. देवी सरस्वती.

( चाल—सुंदरी सीते जा भुवनीं० )

आसली आजवरी बसुनी । उभी तरुतलीं सुररमणी ॥ ध्रु० ॥

सुंदर चित्रें सरस्वतीचीं, रविवर्म्याच्या कुशलकरींचीं ॥
इतरहि दुसऱ्या पटकारांचीं ॥
देखियलीं जीं मीं नयनीं । बसलेली तेथें सुगुणी ॥ उभी० ।
मुकुट मस्तकीं हस्तीं वीणा, लज्जित मृगशिशु बघतो नयना,
मयुर हर्षले परिसुनि गाना ॥

नाद कोंदला तो गगनीं, द्वेवा विसरुनि डुलति फणी ।। उभी० ।।
चित्र मधुर हें सुचवी आह्मां, जागृति येवो झडकारिं तुह्मां ।
उठा हिंदुहो ! लागा कामा ।
झोंप नच पुरे कां अजुनी, आत्मोद्धारा घ्या करुनी ।। उभी० ।।
पुरुषोत्तमकृति नवी पाहिली, विचारसुमनें हृदयीं फुललीं ।
अभिनवमाला गुंफुनी असली ।।
अर्पण करितें तुज जननी ! नत ही अबला तव चरणीं.।।उभी०।।

---

## श्रीमती मनूताई केळकर.

जन्म—धुळें मृत्यु—वर्धा.

१२–८–१९०० १२–८–१९२०.

### १. ईशप्रार्थना.

( शिखरिणी )

अहा ! प्राणी घेती जनन तितुके मृत्यु वरिती,
वृथा या देहाचा क्षणिक जगतीं गर्व धरिती.
ह्मणे माझें माझें बहुत सगळें मी कवि खरा
धरोनीयां ताठा मनुज वदतो हा प्रभुवरा !
अगा देवा ! काढी मज भवनदींतूनि वरती.
बुडालें या डोहीं, मजसि नचि सन्मार्ग दिसती.
उडी घे रक्षाया बुडत असतां दीन अबला,
असें प्रार्थीं देवा ! करुणवचनीं आजि तुजला.
दयासिंधो ! बंधो ! अससि जननी तूंचि जनक
क्षुधा तृष्णा तूंची अससि सखया आणि कनक.

पद्य झाली देवा ! चरणिं नत ही अज्ञ दुहिता,
कृपेची ती भिक्षा सतत पदरीं घालि सुहिता.

---

## २. स्वतः

( शा. वि. )

लाभे मानवजन्म थोर मजला साधीयलें ना हिता;
कौसल्यातनयास एक पळही म्यां नाठवीलें स्वतां.
कर्तव्या भुललें, वृथा दवडिलें आयुष्य सारें जनीं;
जन्मा येउनिया फुका भ्रमतसें वाटे असें मन्मनीं.
गेले जन्म अहो कितीक मम हे, गेतील कांहीं पुढें;
मृत्यू जन्म जरा कधीं न चुकती फेऱ्यांत या मी पडें.
नाहीं मी मिळवावयास झटलें तें ज्ञानही उत्तम.
आला मानवजन्म, हाय ! सगळा झाला वृथा हा श्रम ।

---

## ३. श्रीरामाची प्रार्थना.

भक्तविश्रामा । कौसल्यासुतरामा ।
भज मना अभिरामा । सुखकर मेघश्यामा ।। धृ० ।।

जड देह पुनीत हा । होई रामा स्मरतां.
होतसें प्राप्त तें । अखंड सुख पदीं रमतां.
भवसिंधु तराया । साधन अन्य न कांहीं.
श्रीरामराज ही । गुटिका घे लवलाही.
त्याविणें मुक्ति नच आतां । जगतिं या
बहु द्रव्य आणि गृह वाडे । जगतिं या
जाशील सर्व सोडोनी । स्वालया
न च कोणी येई । अंतीं आपुल्या कामा.
हें सर्व सांडुनी । भज रे भज त्या रामा ।।

हा प्रपंच लटिका । कसें कळेना तुजसी ?
अज्ञान म्हणोनी । ममतेमाजी भ्रमसी.
ही माझी जाया । हा माझा सुत म्हणसी.
बहु बागबगीचे । त्यांतचि हर्षे रमसी.
हा स्नेही बंधु हा माझा । म्हणुनिया,
अनुकूल सर्वहि गोष्टी । म्हणुनिया,
न च चिंता मजसी कांहीं । म्हणुनिया,
कां वृथा लाविसी । काळ आपुल्या कामा ?
हें सर्व सांडुनी । भज तया सद्गुणारामा ॥
होउनी शिला ती । पडली गौतम-जाया,
पदधूलि लागतां । शापमुक्त तत्काया.
तारिली प्रभो ती । दर्शन देउनि तिजसी,
बहु भक्त तारिले । स्मरतां तव नामासी.
अपराध घालुनी पोटीं । प्रभुवरा !
निजभक्तसुतेसीं भेटे । रघुवरा !
द्या पदा दावुनीं अंतीं । उद्धरा,
नत चरणीं शंकर- । तनया सदया रामा !
दे ठाव मागते । चरणीं गुणगणधामा ! ३

---

## ४. लोकमान्यांचा वाढदिवस.

( चाल—आज अक्रुर हा० )

हे बलवंता हिंददेशिच्या बाला !
तव वाढदिवस हा आला ॥ ध्रु० ॥
त्वां वाढविलें महाराष्ट्रधर्माला ,
शोभसी पुत्र जननीला ॥
तुझिया कंठीं कीर्तिसुंदरी माला
घाली ती प्रियकर बाला ॥

अवतार असासि कृष्णाचा,
गमतोसि अम्हांला साचा,
म्हणुनियां तुला गीतेचा
तो कठिण महा--कर्मयोग कीं स्फुरला
तव वाढदिवस हा आला ! ॥
बैसुनि अंकीं बालक तो जननीच्या
करि गोष्टी सुखदुःखाच्या.
'कां बसलिस तूं खिन्न होउनी आई ?
कारण मज सांगे कांहीं.'
'मी बुडतें या परवशतेच्या डोहीं,
सुटका मज यांतुनि नाहीं !'
मातेची ऐकुनि वाणी
डोळ्यांला आलें पाणी,
श्वास एक मग सोडोनी
वदला हा बालवीर जननीला,
'सोडवीन माते ! तुजला.'
तूं राष्ट्राचा ताइत बहु मोलाचा
लाडका बहू जननीचा.
तूं शौर्याचा धैर्याचा पुतळा साचा
तूं तान्हा भारतभूचा.
देशामधली दुही त्वरित मोडाया
सजलासि प्राणाचि द्याया.
निज देशरक्षणासाठीं
अवतरसि जननिच्या पोटीं
सद्धर्म तुझ्या य पाठीं
'मनुबाला' ही विनवी जगदीशाला
दीर्घायु देइ बाळाला !

---

### ५. नुकतेंच लग्न झालेल्या धाकट्या वहिणीस.

( गीति. )

गृहिणी झालिस आतां भर्त्यांच्या अनुमतेंचि वागावें ।
वागत जा तूं विनयें, कीं त्यानें गे तुझ्या गुणां मार्पे ॥
श्वशुरा निज वडिलांसम मानुनि आज्ञा करीत जा मान्य ।
सद्वर्तन ठेवुनियां मिळवी कीर्ती करी तया धन्य ॥
सासूच्या आज्ञेला राही तत्पर सदैव पाळाया ।
तिळहि न जागा ठेवी दूषण देण्या कुणासि बोलाया ॥
क्रोधासी शमवाया शांतिसलिल सांठवी सदा चित्तीं ।
निर्मत्सर मदविरहित आनंदी ती असो तुझी वृत्ती ॥
देवी सावित्री ती पतिव्रता वागली जगांत जशी ।
आदर्श तिचा ठेवुनि पुढतीं तूंही सदैव वाग तशी ॥
सिद्धिविनायक--देवा ठेवीं चित्तीं स्मरोनि तन्नामा ।
शरणागत भक्तांच्या पुरवी प्रेमें सदैव तो कामा ॥
शयनीं पडतां घ्यावें नाम प्रभुचें सुखेपरी गोड ।
सत्कृत्य करुनि कांहीं वडिलांसम थोर पुण्य तूं जोड ॥
परमप्रिय भगिनी ! गे कथिल्या गोष्टी धरीं सदा चित्तीं ।
प्रार्थुनियां ईशपदा तुझिया सुखशांतिला सदा चित्तीं ॥

---

## श्रीमती सारजाबाई बापट.

जन्म—ता. ८, ऑगष्ट इ. स. १८९१.

यांचे वडील रा. श्रीधरपंत आठवले. हे रत्नागिरी जिल्ह्यांत सोमेश्वर-गांवचे राहाणारे. कवयित्रींचें आजोळ सोमेश्वर येथेंच सोहनी यांच्या घराण्यांत आहे. यांचा विवाह इ० स० १९०० सालीं पुणें येथें रा. गण-

यतराव बापट यांच्याबरोबर झाला. पण दुर्दैवानें लवकरच कवयित्रींवर वैधव्याचा प्रसंग आला ! यानंतर वडिलांच्या घरीं खाजगी शिक्षण मिळून त्या पोथ्यापुस्तकें वाचूं लागल्या. पुढें मोरोपंत, वामनपंडित वगैरे कवीं-चीं काव्यें वाचण्याची त्यांस गोडी लागली. नंतर हळू हळू स्वतां कविता रचण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली व त्या लवकरच लहान लहान काव्यें सहज करूं लागल्या. त्यांनीं केलेलीं काव्यें वेळोवेळीं मासिक—पुस्तकांतून व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीं आहेत. अगदीं थोडया वेळांत कोणत्या-ही विषयावर सारजाबाई सरळ व गोड कविता रचतात. या त्यांच्या गुणांचें अभिनंदन, श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनीं, त्यांस ‘ काव्यकल्पलता ’ ही बहुमानाची पदवी देऊन, मुंबईस जाहीर रीतीनें, केलें. मुंबई येथील कामाहॉस्पिटलामध्यें साडेतीन वर्षे राहून यांनीं नर्स व मिडवाइफचा अभ्या-सक्रम पुरा केला. सन १९१५ सालीं तेथील शेवटची परीक्षा देऊन त्या पुण्यास आल्या. नंतर त्यांची पुणें येथील मुलींच्या हायस्कुलामध्यें मेट्रन व नर्स म्हणून नेमणूक झाली. याच जागेवर हल्लीं त्या काम करीत आहेत. यांच्या कवितेंत सहजता व प्रेम असून ‘ संभाजीचा शेवट, ’ व ‘ माझें ध्येय ’ या प्रकरणांत त्यांच्या उदात्त भावना विशेष अभिव्यक्त झाल्या आहेत. ‘ बकुळमाला ’ या कवितेंतील फुलाचा व कवयित्रींचा संवाद मनोरंजक व बोधप्रद आहे. ‘ सीताशुद्धि ’ हें प्रकरण फार मधुर व हृद-यंगम आहे.

---

सारजाबाईंच्या ठळक ठळक काव्यांची यादी एणेप्रमाणें आहे:—

( मुद्रित )

( १ ) निराशा. ( २ ) तिळगूळ. ( ३ ) शिमगा. ( ४ ) भरतभेट. ( ५ ) आहेर. ( ६ ) मृतपुत्राच्या मातेस. ( ७ ) वेणुधमनीस्वप्न.

( ८ ) अविचाराचा परिणाम. ( ९ ) दोन मुलांचा संवाद. ( १० ) आम्रान्योक्ति. ( ११ ) मोगऱ्याची कळी पाहून. ( १२ ) मनास बोध. ( १३ ) शबरचारित्र. ( १४ ) सीतास्वयंवर. ( १५ ) नामपुष्पबंध. ( १६ ) कवितेस प्रोत्साहन. ( १७ ) शिमग्याची गाठी.

[ अमुद्रित ]

[ १ ] माझें पहिलें काव्य. [ २ ] धाकव्या बहिणीस पत्र. [ ३ ] विलक्षण पत्रास उत्तर. [ ४ ] पित्यास अर्ज. [ ५ ] निश्चय. [ ६ ] उपकारमाला [ ७ ] 'काव्यकल्पलता' कशी झालें! [ ८ ] निराशेचें जिणें. [ ९ ] दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति. [ १० ] गुलाबाच्या फुलास. [ ११ ] ओवाळणीची मागणी. [ १२ ] खिन्न भावास. [ १३ ] एक धडा. [ १४ ] तरीच! [ १५ ] देवाच्या घरची बेबंदशाही. [ १६ ] कर्तव्यमहती. [ १७ ] मृत्यूस उद्देशून. [ १८ ] 'कठिण समय येतां कोण कामासि येतो!' [ १९ ] नामपुष्पें. इ. इ.

---

## १. बकुलमाला.

( साक्या )

एके दिवशीं गेलें फिरतां फिरतां बकुळीखालीं,
  मधुर सुवासिक बघतां सुमनें मोदें गोळा केलीं.
केलीं त्यांची सुंदर माला प्रभुकंठीं घालाया.
  नवल भगिनिनों! कथितें ऐका. सुम लागे बोलाया.
केलीं गोळा सारीं तेव्हां होतें हें लपलेलें,
  पान उडोनी वरलें जातां मंजुळ वचनें बोले—

" ताई ! नेसी मम भावंडां सोडुनि मजला येथें
काय तुझ्या त्या मालेमध्यें माझी अडचण होते ! "
ऐकुनि त्याचें वचन घेतलें प्रेमें उचलुनि त्याला
गुंफुनि त्याला मालेमध्यें अर्पी प्रभुचरणांला.
निर्माल्यासम दुसरे दिवशीं माला काढित होतें,
उपहासानें चतुर चिमकुलें सुमन वदे मग मातें–
"ताई ! गेलें शुभ तेजहि मम सुकला जरि हा काय
सुवास माझा अचल असे त्या अंतरविसि प्रभुपाय !
" ताई ! स्वार्थी दृष्टि तुझी ती सौंदर्याच्या वरती
परिमल माधुर्यांहि न जाणसी अरसिक तूं गे पुरती ! "
तया मी वदें, " गडया फुला ! मी स्वार्थी हें मज ठावें;
परंतु अवघे जनही स्वार्थी हें ध्यानीं ठेवावें.
" निःस्वार्थी जगतांत कार्य वा भक्ति प्रेमहि नाहीं.
जिकडे तिकडे स्वार्थचि भरला विचार करुनी पाही.
" स्वार्थ भाषणीं स्व–अर्थ सोप्या शब्दें हा मोवदला
प्रेम कर्म वा भक्ति समानचि इच्छितसें कीं वदला.
"कार्य करी दुसऱ्याचें मानव इच्छितसे तरि कांहीं
केलें याचें, करील माझें कधिं कालानें हाही !
" बालावरती माता करिते निःस्वार्थीसे प्रेम.
निःस्वार्थाच्या नांवाखाली स्वार्थ असे कीं ठाम.
" बाळें माझीं सुखी असावीं, त्यांचें मीं हें केलें,
समाधान जें अपूर्व लाभे स्वार्थयुक्त ठरलेलें.
" भक्ति प्रभुची प्रेमें करुनी दया क्षमा वा शांति
इच्छी हा केवळ मानव नच, देवहि होय स्वार्थी !
" मुठिभरि पोहे घेउनि देई हेमपुरी कोणासी,
पान भाजिचें खाउनि पुरवी अन्नाच्या त्या राशी.
" थोडें घेउनि बहुत समर्पी, तोही आहे स्वार्थ,
. भक्तिमिषानें देव इच्छितो हाच त्यांतला अर्थ !

" परोपकारा म्हणती कोणी जन जे तेही स्वार्थी,
कर्तव्याचें समाधान ते इच्छित असती अर्थी.
" स्वार्थामध्यें पहा गड्या! या, येत दोन रे अर्थ.
एक उच्चतर कनिष्ठ दुसरा तो केवळ बा स्वार्थ.
" ऐक उच्चतर स्वार्थाची मी व्याख्या तुजला देतें.
बहुत समर्पुनि इच्छी थोडें या सदरीं ती येतें.
" दुसऱ्या स्वार्थी देणें नलगे, इच्छितसे तें फार.
स्वार्थ असा मनुजांत नसावा घातक तो जनिं थोर.
" टोंचुनि बोले सुमन यावरी, ' रीताचि ही जगताची,
बहिरंगाला भुलती करितां माती सद्धेतूंची !
सुमा वदें मी, " वचन अनुभवें सत्य तुझें हें पुरतें.
तूं सुविचारी म्हणुनि आदरें प्रश्न तुला मी करितें,
" उत्पत्ती लय या जगताला, नियम प्रभुनें केला.
जन्म जयाला मृत्यु तयाला अनुभव हा सकलांला.
" गेले जन्मुनि ज्ञाते गेले कवि मुनि पंडित गेले !
परी उच्चतम कीर्तिसुगंधें अमर जगीं या झाले.
"चुकतां बोधुनि मार्ग दाविती, देति शांति हृदयाला,
नमन आदरें जन करिताती अजुनि तयां थोरांला.
"कालिदास कवि, रामदास गुरु, मोरोपंतहि गेले,
ग्रंथ गंधयुत कितिक तयांचे जगतीं या दरवळले.
" गेलें सुमना ! तेज सर्व तव, झाली शुष्कहि काया;
तरी म्हणसि कीं, प्रभुपदिं राहिन ! हट्ट तुझा हा वायां.
" अर्पण केला देह प्रभुला, स्वत्व तुझें तें सरलें !
सांग, लाडक्या ! प्रभुचरणांविण भिन्न कायसें उरलें ? "
ऐकुनि माझें वचन विचारी सुमन जाहलें दूर.
दुःख परी मज होय ! वाहती नेत्रांतुनि जलपूर.
आत्मसमर्पण करुनी प्रभुपदिं सार्थक सुमनें केलें.
मम हृत्कमलीं सुगंध स्मृतिचें दृढपण बहुतचि ठेलें.

सुमा ! तुझ्यासम उरुनि सुगंधें देहिं विदेही व्हाया
इच्छीं, प्रभु तो प्रसन्न होवो मजला साह्य कराया !

---

## २. माझें ध्येय.

या कवितेंतील ‘ दादा ’ हे पुणें येथील रहिवासी श्री. रा. भास्करराव ओंकार हे होत.

( मंदाक्रांता )

चित्ता माझ्या कधिं न शिवली कल्पना दुष्ट, देवा !
सासू जावा श्वशुर मरुनी वारसा प्राप्त व्हावा !
दुर्दैवानें दिवस मजला दुष्ट जे प्राप्त झाले
धैर्यानें ते सकल विपदा साहुनी कंठियेले.
झाला माझा छल बहु जरी सासरीं, मी मनांत
बोलें, दैवा करुनि विधवा ठेविलें कां जनांत ?
मामाजींना कळुनि चुकलें पुत्र जाणार जेव्हां,
काढी काढी वदति मजला डागिने सर्व तेव्हां.
काढोनीयां सकल नग मीं ठेविले त्यांसमोर
जाई माझा तिलक ! मज कां भूषणें शोभणार !
होतें बाला, परि मम मना कल्पना पूर्ण आली,
पत्नीलागी पतिविण नसे लोकिं कोणीहि वाली !
केलें काळें हतबल मला जाहलें मी अनाथ;
वाटे चोरी खचित पुढती वावराया जनांत !
सासूबाई बघुनि विधवा सून संतप्त होती,
गेला त्यांचा सुत म्हणुनिया दोष माझ्याच माथीं !
“ बाई ! आली कशि अवदसा आमुच्या ही कपाळा !
कैसी देवा ! भुरळ पडली शाहण्या ज्योतिष्याला ! ”
वाक्यें ऐशीं परिसुनि मना दुःख अत्यंत होई,
केलें सारें सहन रडुनी उत्तरें त्यां न देई.

अबूसाठीं खचित गृहिं त्या राहुनी कष्ट केले,
ओझें त्यांना मम तनुचिया पोषणाचेंच झालें !
माहेरीं ते पुढति कथिले हाल मीं सर्व जेव्हां
राही येथें, म्हणति ममतायुक्त मत्तात तेव्हां.
कर्तव्याची मज न कळली थोरवी सान होतें,
माहेरीं मीं म्हणुनी बसुनी बाहिलें आपदातें.
" हत्ती पोसे परिहि मुलगी पोसणें त्रासदायी "
आहे ऐशी म्हण, खचित ती प्रत्ययालागि येई !
शोधूं जातां स्थितिंत असल्या शांतिचा मार्ग कांहीं
दैवें माझ्या सुचलि मजला कल्पना तोषदायी,
:खें कष्टें झुरत जन जे साह्य त्यांतें करावें
भोक्तृत्वाचे दिवस सुपथें चालुनी घालवावे.
वाटे मामा करितिल मला संकटीं साह्य कांहीं
त्यांच्या गेहीं अणुहि मजला जाहलें सौख्य नाहीं.
आलें धैर्या धरुनि हृदयीं तातसद्मा फिरोनी,
आपत्काळीं जगत फिरतें पाहणी ही करोनी !
बोलें, " ताता ! खचित मज द्या ज्ञान, सेवेकरी मीं,
होवोनीया झिजविन तनू सर्वदा त्याच कामीं."
साधे माझे वडिल रुचली कल्पना ही न त्यांना !
मानी सारें जगत, वदले, हीन सेवेकऱ्यांना.
" ताता ! मानो जगत परि हो काम तें पुण्यदायी
आज्ञा द्यावी मजासि नलगे अन्य भूलोकिं कांहीं. "
" जाई, बाळे !" वदति, शिकण्या देखुनी पूर्ण हेतु;
" सद्धर्मानें सुपथ मिळतो ठेवि चित्तांत हें तूं. "
ऐसी आज्ञा मिळवुनि पुढें ध्येयसिद्ध्यर्थ नाना
साहोनीया विविध विपदा काढिले हाल जाणा.
'दादा' माझे प्रमुख मजला लाधले साह्यकारी.
गेले सारे म्हणुनि दिन ते, संपली दुःखवारी !

केले त्यांनीं अनुपम असे कष्ट खर्चोनि वित्त,
 झाले माझे म्हणुनि पुरते हेतु, हो शांत चित्त.
वाटे मातें सतत मनुजें स्वावलंबी असावें,
 सन्मार्गानें श्रम करुनियां शांत चित्तें वसावें.

दैवें माझ्या अवचित मला वारसा प्राप्त झाला !
 आलें वाटे धन मजकडे हेतु साधावयाला !

घेतें मी ही शपथ, 'धन तें पीडितांच्याच कामीं
 लावोनीया खरचिन तनू होउनी सेविका मी. '

ध्येयाच्या या विसर न पडो, धैर्य चित्तांत राहो,
 प्रार्थी देवा ! " तडिस मनिंचा हेतु हा शीघ्र न्या हो ! "

## ३. पतिव्रतेचें हृदय !

सीतादेवीविषयीं लोकापवाद ऐकून श्रीरामाला फार वाईट वाटलें. त्यानें लोकांच्या समजुतीकरितां सीतेचा त्याग करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें आपला बंधु लक्ष्मण याजकडून तिला वाल्मीकीच्या आश्रमांत सोडून दिलें. तेथून लक्ष्मण परत येऊं लागला, तेव्हां जानकीनें रामाला सांगण्याकरितां त्याच्या बरोबर निरोप पाठविला, तो प्रस्तुत काव्याचा विषय आहे. वाल्मीकिरामायणांत व रघुवंशांत हा प्रसंग महाकवींनीं फार उदात्त रीतीनें वर्णिला आहे.

( मालिनी )

परिसुनि अपवादवृत्त राम प्रियेला
 त्यजि वनिं, निज दीरा बोलली राजबाला.
नमन करुनि भावें त्या रघू--नायकातें
 कथन करिं तुम्हांला वृत्त मी, आयका तें.

( व. ति. )

'माझा निरोप कळवा तुम्हि रामपायीं,
कठीन येथ विपिनीं दिन कष्टदायी.
राज्यीं सुमंगल सदा तुमच्या असो द्या,
कर्तव्य तें स्वहृदयीं नृपते ! वसो द्या.'
'त्यागार्थ योग्य गणुनी मम त्याग केला.
बाह्योपचार इतुका बहु योग्य झाला.
जें पूर्ण लग्नसमयीं हृदयैक्य होय
तें शक्य दूर करणें विधिला न होय.'
'जा लक्ष्मणा ! विसर ही वहिनी अभागी,
कर्मानुसार अपुल्या सुखदुःख भोगी
मानी मला भुवन हें जरि पूर्ण दोषी
साहीन धैर्य धरुनी करण्या कसोशी.'

( मालिनी )

रुदन करित बोले तैं सुमित्रा–सुपुत्र,
'प्रभुसि न कळतें कां जानकी ही पवित्र ?
वहिनि ! नमन; येतों. आपुल्या सान भावा-
सम समजुनि मातें लोभ चित्तीं धरावा.

( व. ति. )

सौमित्र जाय मग सोडुनियां सतीला,
शोकाकुला विलपली मग राजबाला.
बोले, 'प्रभो ! अजूनिही हृदयीं कुशंका !
तें अग्निदिव्य गमलें अपुरें तुला कां ?'
'सौख्यार्थ नाथ ! तुमच्या वनवासही तो
साहीन; मात्र अपवादचि ताप देतो !

शय्या उदार अवनीच, शिला उशाला,
आकाश पांघरुण तें दुसरें कशाला ? '
' त्वन्मूर्तिवास हृदयीं असतां सदाची
राहील भीति कुठली मज श्वापदांची ?
भक्षीन कंद सुफलें तरुचीं क्षुधेसी,
प्राशीन निर्मल नदीजल तें तृषेसी ' !
' कांटे सुतीक्ष्ण तरि ते खुपती न मातें,
वाग्बाण खोल रुतती हृदयीं परी ते !
मध्याह्निंही रवि गमे बहु शीतदायी
शंका त्वदीय मनिंची परि ताप देई ! '

( पंचचामर )

' जनांत आर्यबालिका पतिव्रतेस मानिती,
त्रिलोकिं सर्वही तसे बहू तियेस वानिती;
त्यागिली जरी तिला उगाचि दोष ठेवुनी
पतिव्रतेस-योग्य तेंच आचरीन या जनीं ! '
' व्यर्थ, हाय ! हें जिणें तुझ्याविणें गमे मला.
साहिं तें परी मनीं धरोनि दिव्य हेतुला;
आत्मघात पाप ! त्यांत गर्भिणा असोनियां
बालघातही दुजा नको शिरीं चढावया ! '
' नाथ ! मी न बालिका बघोनि हाल आपदा,
साहिं सर्व आदरें स्मरोनि आपुल्या पदां '
थोर सौख्य एक त्यांत, सत्य शांति दे मना.
गोड नाम आपुलें करील दग्ध यातना ! '

( मालिनी )

' प्रभु ! खचित परी हें दुःख वाटे मनातें
विरह मम घडे तो साहणें आपणांतें !

स्मरण मम तुम्हांला दुःख देईल खास
विसर तरि पडावा प्रार्थितें ईश्वरास ! '
वचन मज सतींचें होय आदर्शरूप;
खचित खचित दावी वर्तनीं सत्स्वरूप !
म्हणुनि चरित काव्यीं गुंफिलें आजि मीं तें.
स्थल समुचित द्यावें काव्यमालेंत त्यातें.

———

## ४. धर्माभिमानी वीराचा बच्चा !

संभाजीराजे औरंगजेबाच्या हातीं सांपडले, तेव्हां, मुसलमानी धर्म स्वीकारशील तर तुला जीवदान देतों, असें बादशाहानें त्यांस म्हटलें; त्यामुळें स्वधर्माभिमानी वीरवृत्ति संभाजीमहाराजांना अत्यंत संताप येऊन त्यांनीं बादशाहाची व त्याच्या धर्माची त्याच्या तोंडावर निर्भर्त्सना केली ! तेव्हां त्या कडव्या बादशाहाचा कोप अनावर होऊन त्यानें संभाजीमहाराजांस अत्यंत क्रूरपणानें हाल हाल करून मारविलें ! अशा प्रकारचा मृत्युही संभाजी महाराजांनीं पतकरला; पण धर्मांतराची कल्पना त्यांच्या मनाला बिलकुल सहन झाली नाहीं ! हा प्रसंग खालील पद्यांत वर्णिला आहे. हा ऐतिहासिक आहे व त्याच दृष्टीनें आज वाचावयाचा आहे. हल्लीं हिंदु व मुसलमान बंधुत्वानें वागत असून ईशकृपेनें त्यांचें हें प्रेम कायम राहील असा भरंवसा आहे.

( उपजाति )

संभाजी—' घे प्राण राया, करि भग्न काया,
मा जाहलों सिद्ध सुखें मराया.
छावा असे हा बघ त्या शिवाचा
दावील कां मोह तुला जिवाचा ? '

‘ हा सिंह सौख्यें मरणास वाही,
तो हार, मूर्खा ! तुज येत नाहीं.
साहीन मी हाल सुखेंचि सारे,
न भ्रष्ट होईन कदापि बा रे ! ’
‘ कां दाविसी मोह निरर्थ मातें ?
हा सिंह भक्षी तृण काय बा, तें !
वेड्या ! तुला अक्कल खास नाहीं,
त्वां लाविली व्यर्थचि वल्गना ही. ’
बोलोनि संभाजि उगाचि ठेला,
गर्वेंचि दिल्लीप वदे तयाला,
**औरंगजेब**—‘ देईन मी दक्षिण राज्य सारें !
इस्लाम धर्मा वरितांच बा रे ! ’

( शा. वि. )

हांसे तो रणधीर शब्द असले ऐकोनियां तेधवां,
‘दर्पोक्ती वदतो अशी मजसि हा ? जाळीन याच्या जिवा !’
धिक्कारा करुनी अशा वदतसे, ‘ कन्या मला दे तुझी,
निका लावि तिच्यासवें तरिच मी, मूर्खा ! स्वधर्म त्यजीं ! ’

( उपजाति )

हें वाक्य वर्मीं भिनलें नृपाला,
बोले, ‘ करा दग्ध पळांत याला !
छे ! मृत्युशिक्षा अपुरीच यास,
हा वांछिताहे मम कन्यकेस ! ’
‘ फाडोनि डोळे करुनीच खाचा,
घ्या प्राण वेगें मग काफराचा !
जिव्हा चिरा जी वच दुष्ट बोले.
खावोत काया मग गीध कोल्हे !

संभाजी:—' फोडोनि डोळे कर दोन त्याचा
सोडी न धर्मा परि वीर साचा!
जिव्हा तशी सोलुनि काढ सारी
सर्वेंद्रियांहूनहि धर्म भारी.'
' हें तत्त्व मूर्खा! तुज काय ठावें?
कापव्य भ्याडासम तूं करावें.
भ्यालासि शौर्यें रणसंगराला,
साधोनि कावा धारेंशी अरीला!'
' तूं सोड मातें, करिं शस्त्र देई,
झुंजावयातें मग सिद्ध होई.
दावीन तेव्हां मम धर्म कैसा,
कां पिंजरीं ताडिसि व्याघ्र—ऐसा?'

( व. ति. )

' रे नोडग्या! अधिक तूं करशील काय?
अग्निमधें करावेशील सुदग्ध काय.
धर्मार्थ धूप तनुचा सजला कराया
तो हार जाइल तुला शिवबाल? राया!'

( शा. वि. )

गेला बादशहा चिडून, वदला तैं, ' गप्प रे काफरा!
'न्या याला इथुनी त्वरें' म्हणुनिया आज्ञा करी नोकरां.
' काढोनी झणिं पाट तीन मिरवा या गर्दभाच्या वरी,
सांगा, जो अवमानितो मज, तया शिक्षा अशी मी करीं.'

( स्रग्धरा )

नेला त्या कोतवालें नगरिंत अवघ्या काढिली धिंड त्याची,
मोठ्या थाटें निघाली मिरवतचि तदा स्वारि दिल्लीपतीची.

देखा तो सिंहछावा अवचित उलट्या काळचक्रांत आला !
गेला तो शत्रुहस्तीं, हरहर ! जगतीं चित्र तो दैवलीला !

( शा. वि. )

औरंग०—

' धर्मासी अवमानुनी मज करी हा उत्तरें उर्मट,
कन्येसी मम मागतो चिडवुनी माझ्या मना उद्धट.
जाऊं हाल पहावयासि सगळेची, सूड घ्याया पुरा
येतों, व्हा पुढतीं तुम्ही, अमिर हो ! दर्बार हा आवरा ! '

( उ. जा. )

संतप्त चित्तीं नृप फार झाला.
विश्रांति घ्याया क्षण आंत गेला.
कल्लोळ त्याच्या हृदयीं उडाला
सक्रोध दुःखार्णविं तो बुडाला !

( पृथ्वी )

तदा यवनकन्यका सभय जाय ताताकडे,
धरोनि पदपंकजा विकलमानसें ती रडे.
वदे वच न बालिका, अडवि थोर लज्जा तिला,
खुला करुनिया परी निजासि मार्ग प्रेम दिला.

( मंदाक्रांता )

पोटाशीं तो उचलुनि वरी बादशाहा तियेला
प्राणा—ऐसी प्रिय समजुनी वाढवीलें जियेला.
" बाळे ! दुःखें रुदन कारिशी, जाहलें काय ? बोलें,
कोण्या दुष्टें तुज दुखविलें सांग गे काय झालें. "
बोले, ताता ! शिरिं तव कृपाछत्र जीच्या विराजे,
धाकें ज्याच्या सभय हृदयीं जाहले सर्व राजे.

कन्या त्याची म्हणुनि गमतें जाहलें मी कृतार्थ
दुःखा द्याया तिजसि भुवनीं कोण आहे समर्थ !'

( पृथ्वी )

वदे, 'तुजसि घालितों खचित आण मी आपुली.
कसें दुखविलें तुला मजसि हें कळेना, मुली !
समग्र मज सांग कीं करुनि मोकळें त्वन्मना
बघोन रडतां तुला मजसि वाटती यातना.'

( मंदाक्रांता )

मुलगी:—

" ताता ! द्यावें अभय तुमचा थोर अन्याय केला
चित्तामाजीं तव रिपुसुना देह हा वाहियेला.
वीराला त्या बघुनि नृवरा जाहलें पूर्ण वेडी,
द्यावें त्यालें अभय चरणां तोंवरी मी न सोडीं."
ऐकोनी हें वच पळभरी जाहला स्तब्ध राजा
झाली बुद्धी विकळ बहु जी सोडवी राजकाजा.
मोठ्या धैर्यें करि समरिं जो शत्रुशीं चार हात
त्याच्या मर्मावरिच पडला हा जणों वज्रघात !

( इंद्रवज्रा )

भानावरी येउनि मोह सोडी
बोले तिला, 'झालिस काय वेडी ?
घेणार मी प्राण असाच यवना
तूंतें न कावा कळला तयाचा !
' संतप्त केलें मज काफरानें
मागोनिया गे तुजला तयानें
बुद्धी तुझी कां परि नष्ट व्हावी ?
गे राजनीती तुज काय ठावी, !

... ग्रंथालय ...
२९३६
ग्रं. क्र.

मुलगी:—

‘ ताता ! परी योग्य न हें तुह्मांला,
घालोनि बंदीं वधणें अरीला. ’
कोपें दुरी लोटुनि कन्यकेला
घ्यावा पिता सूड म्हणोनि गेला !

( शार्दूलविक्रीडित )

गेलें संपुनि, हाय ! पुण्य अवघें, अस्तासि जातां रवी,
झाला बादशहा मदांध म्हणुनी हीं उत्तरें ऐकवी.
होता गर्जत दक्षिणेस विजयें जो डोंगरींचा छुवा
वांछी तत्सुत मृत्यु ! काल फिरतां धिक्कारुनी वैभवा,

( स्रग्धरा )

नेलें तैं कोतवालें मिरवित नगरीं पेठबाजारिं त्यानें,
डांगोरा दुष्ट शब्दें पिटवुनि सकलां बोलवी पाहण्यातें.
बोले, ‘शिक्षा अशी दे, करि अवमत जो बादशाहा, तयाला,
मूर्खा ! शुद्धीवरी ये शरण मजसि, जों वेळ नाहींच गेला.’

( शार्दूलविक्रीडित )

झाला क्षुब्ध मनीं शिवात्मज अशीं ऐकोनिया भाषणें,
‘ भुंके हा कुतरा कशास असल्या संगें उगा बोलणें ! ’
मानीं चित्तिं असें, तदा चिडवि तो दिल्लीपती त्याजला !
तैं, संभाजि वदे, ‘ मला तव सुता इच्छीतसे पामरा ! ’

औरंगजेब:—

‘काढा नेत्र, कसा विलंब करितां ? इंगा तया दाखवा,
जिव्हा छेदुनि द्या तया मग सुळीं तत्प्राण तो मालवा.’
आज्ञा ही सुटतांक्षणींच नयनां भाजावया धावले,
पोटार्थी कुतरे कितीक उठले त्यांना बरें फावलें !

( इंद्रवज्रा )

भाजोनि डोळा मग कोतवाल
तो क्रूर बोले बहु त्यास बोल—
'घे भूपकन्या सळई तुला ही,
प्रेमें तियेतें निरखूनि पाहीं!'

( शा. वि. )

'माफी बादशहा करील चल ये इस्लाम-धर्मामधीं,
केला त्वां उपमर्द काय सुचली बुद्धी तुला ` कुधी!
एकाक्षा! वजिरी खुशाल कर जा दक्षीणदेशावर,
ठेवीं बादशहापदावरि तुझें अत्यादरानें शिर.'
क्रोधें बादशहा तयासि वदला, 'का बोधिशी काफरा,
डोळा फोड दुजा करी झडकरी रे अंध त्यासी पुरा.'
गर्जोनी नरकेसरी वदतसे त्या कोतवालाप्रती,
'घाई बादशहा करीत, कुतऱ्या! तूं वेळ केला किती!'
'बंदा नोकर तूं धन्यास इतुका कां शीण द्यावा बरें?
फोडी नेत्र दुजा धन्यास सुखवी मानोनि आज्ञा त्वरें.'
विंधी नेत्र दुजा क्षणांत मग तो, जिव्हा चिरायास ये,
तों स्वार्थी कलुषा दया कर, ह्मणे, येवोनि तेथें स्वयें.
संभाजी खवळे कृतांतसम तो ऐकोनि त्याचा ध्वनी,
बोले, 'घात करील हा नर तुझा रे टाकि या छेदुनी.
याचें लेशहि ऐकुनी करुं नको हाळांत माझ्या कमी.
याच्या शिष्टपणें सुभाग्य नलगे, मृत्यूस हा सिद्ध मी.'
बोले बादशहा, 'अवश्य बवुनी देतों तुझ्या संगतीं,
वंची एक धनी! कृतघ्न मजला येईल कामा किती!
छाटा यासहि कोतवाल जळदी निर्लज्ज पाजी नरा!
धाडावा पुढतीं करील नरकीं हा साह्य त्या काफरा.'
तेव्हां प्राणभयें नृपासि कलुषा याच्या दयेची करी.
झाली ततनु छिन्न त्याच समयीं त्या कोतवालाकरीं;

घाई तो चवताळुनी पुनरपी ताडावया त्याजला,
  जिव्हाही मग डागुनी बनविला लोला तियेचा पुरा !
अंतीं बादशहा वदे, 'समजला कां धर्म हा काफरा ?
  "उंहू !" मान करोनियां सुचविलें मद्धर्म माने खरा !
गेला प्राण निघूनि ! भग्न तनुला भूमीवरी तो त्यजी.
  स्वर्गीं ढाळित आसवें शिव म्हणे, 'शाबास बाळा तुझी !'
'दुष्कृत्यें समळीं करोनि मजला लज्जा तुवां आणिलीं
  माझी उज्ज्वल कीर्तिही तुजमुळें बा म्लानता पावली.
धर्म श्रेष्ठ गणोनि त्याजकरितां प्राणांसि तूं अर्पिलें !
  तेणें त्वां तुझिया पित्यासि समजे, रे ! आजि संतर्पिलें !

---

## ५. सीताशुद्धि.

( शा. वि. )

मारोनी दशकंधरास विजयी श्रीराम झाल्यावरी
  स्नानें मंगल घालुनी, जनकजा आणा, म्हणे सत्वरीं,
आज्ञा ही प्रभुची प्रमाण म्हणुनी संगें कपी घेउनी
  लंकाधीश नवा बिभीषण निघे सानंदचित्त वनीं.
वंदोनी जनकात्मजेस कळवी लंकाधिपा मारिलें
  श्रीरामें, वहिनी ! चला झडकरीं तुम्हांसि पाचारिलें;
वार्ता मंगळ ऐकतां स्वपतिची प्रेमाश्रु ये लोचनीं
  भेटाया रघुनंदनाप्रति सती सोत्कंठ झाली मनीं.

( इंद्रवज्रा )

आली सती नाथसमीप जेव्हां
  पाही न तीतें रघुराज तेव्हां;
बोले तिशीं घालुनि मान खालीं
  'सीते ! तुला मीं अजि मुक्त केली !

कर्तव्य केलें, मन शांत झालें
हृत्ताप माझे सगळे निवाले,
नेलें अरीनें मम अंगनेतें
हें शल्य तापप्रद फार होतें.
शत्रुगृहीं वास घडे जियेचा
इच्छीं न मी संग पुढें तियेचा,
आल्या मना तूं वस मातृगेहीं
नाहीं तरी मुक्त दहा दिशाही ! '

( शा. वि. )

ऐकोनी पतिच्या वचास हृदयीं साध्वी बहु क्षोभली,
होश्रेना अतिखिन्न भूमितनया नाथा वदूं लागली—
' ठेवोनी तव पादपद्म हृदयीं शत्रुगृहीं राहिलें,
सर्वज्ञा ! हृदयावरी मम तुवा कां पाप हें वाचिलें ?
वाचावें जगतीं कशास नकळे हा दोष येतां शिरीं.
ऐकाया वच हें कशासि जगलें, दुर्दैविनी मी खरी,
झालें विह्वल चित्त अश्रुजलही गालांवरी पातलें.
यापूर्वी मज धाडिलेंच न कधीं संदेश कां यांतले ?
होतें सज्ज तयाक्षणींच तनु ही मृत्यूसि अर्पावया.
येती कीर्ति कलंकिनी तुजपुढें कां दुःख सोसावया ?
राहो बोल; कशास फार पुढती ? येतें कृपासागरा !
मानी राजसुता अनाथ अपुणा, मृत्यूहि लेखी बरा.'
झाली सर्व सभा तटस्थ असला संवाद ऐकोनियां,
होई निष्ठुर राम कां नच कळे सोडोनि सारी दया;
'भावोजी ! कसला विचार करितां ? अग्नि त्वरें पेटवा.
कंठू केविं दिन स्वनाथरहिता ? मृत्यू मला भेटवा. '
सीतानिश्चय पाहुनी व्यथित तो सौमित्रि झाला मनीं
बोलेना वच, ढाळि अश्रु नुसते रामाकडे पाहुनी.

बोले राम, 'कशा विलंब करितां अग्नी तिला द्यावया ?
  शुद्धी अग्निमधें करील तरि मी हा सिद्ध ती घ्यावया.'
अग्नी पेटविला, समस्तहि परी उद्विग्न झाले मनीं.
  शुद्धी ही भलती ! सती जनकजा वांचेल कां यांतुनी ?
माता प्रेमळ भेटणार पुढती नाहीं तयां वाटलें
  झाले सद्गद कंठ, अश्रुजलही नेत्रांतुनी चाललें !
होतां सिद्ध चिता महासुचरिता वंदी पतीच्या पदा.
  बोले, 'राज्य करा सुखें, अशुभ तें बाधो न तुम्हां कदा.'
केल्या तीन प्रदक्षिणा नमुनिया, अग्नीपुढें पातली,
  'सत्याचा जय हो,' म्हण, मग उडी वैश्वानरीं घातली !
रामें व्यर्थ निजात्मजेसि छळिलें ऐकोनि भू कांपली,
  बोले, 'अग्नि ! सुतेसि दग्ध न करी,' मीं आण रे घातली.
स्वर्गी जाय, वदे सुरांस मग ती 'हा राम दोषी ठरे,
  कैसें होइल दुःख दूर मम हो सांगा तयाच्या करें ?'
दिव्याचें परिसूनि वृत्त अमरीं प्रेमाश्रु तें ढाळिले.
  अग्नी शांतविण्यास वारि जणुं तें नेत्रांतुनी ओतिलें !
अग्नीला करितां विनंति, पतिशीं होवो सती संगता.
  'रामा ! भूमिसुता विशुद्ध !' वदली आकाशवाणी स्वतां. !

( व. ति. )

अग्नींतुनी प्रगटली मग राजबाळा,
  श्रीराम पाहुनि तिला अतितुष्ट झाला.
अंकीं तियेसि बसवी बहु आदरानें
  तद्बाष्पबिंदु पुसि तो अपुल्या करानें.
पाहे स्वनाथमुख मात्र न शब्द बोले.
  दृष्टींत भाव सगळे परि एक झाले !
ही सारजा शुभकथा असमर्थ गाया
  वंदीतसे सविनय प्रभुरामपायां.

---

# सौ० शांताबाई फणसे.

जन्म—शके १८०१, माघ, कृ. १२
सन १८८०, मार्च, ८

क० रा. ब. दामोदरपंत घारपुरे, सबजज्ज, पुणें, हे कवयित्रींचे वडील होत. मध्यप्रांतांतील सुप्रसिद्ध मराठी कवि रा. केशव विश्वास फणसे हे यांचे पति. कवयित्रींचें मराठी व थोडें इंग्रजी शिक्षण पुणें येथें मुलींच्या हायस्कुलांत झालें. संस्कृत व उच्च मराठी शिक्षण त्यांनीं घरांतच संपादन केलें. सौ. शांताबाईंच्या सर्व कुटुंबीयांवर कवितादेवीचा प्रसाद आहे ही मोठया संतोषाची गोष्ट आहे. यांची कन्या सौ. उमाबाई खरे यांची कविता याच पुस्तकांत यापुढें दिली आहे. कवयित्री मध्यप्रांतांत सिहोरा-जबलपूर येथें राहतात. यांचीं बहुतेक काव्यें विविधज्ञान-विस्तारांत प्रसिद्ध झालीं आहेत. यांची कविता सरळ, शुद्ध व मधुर आहे.

( कवयित्रींच्या काव्यांचें टिपण. )

| नांव. | रचनाकाल व रचनास्थल. | |
|---|---|---|
| १ शिवाजी ... ... ... | इ. स. १८९६ | |
| २ विरहपत्रिका ... ... | १९।१०।१८९६<br>११।१८९७ | नाशिक |
| ३ चैत्रोत्सव ... ... | एप्रिल १८९९ जबलपुर | |
| ४ आईस पत्र ... ... | एप्रिल १८९९ व २९।११।९९ | |
| ५ पतीस विनवणी ... ... | अक्टोबर १८९९ जबलपूर | |
| ६ धांवा ... ... ... | आगस्ट १९०१ धुळें | |
| ७ पुत्रस्मरण... ... ... | ६,७।१९०२ धुळें व जबलपूर | |
| ८ मैत्रिणीस पत्र ... ... | ५।६।१९०२ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | खेदोद्गार ... ... | २३।१।१९०३ | |
| १० | कन्येस उद्देशून ... ... | १०।७।१९०४ | |
| ११ | मार्गप्रतीक्षा ... ... | २५।४।१९०५ | |
| १२ | शस्त्रक्रियेपूर्वी ईशप्रार्थना. | आगस्ट १९०५ | मिरज |
| १३ | शस्त्रक्रियेनंतर डॉ. वानलेस यांचें पद्यात्मक अभिनंदन | ” | ” |
| १४ | मुग्ध मुलीस ... ... | ५।७।१९२१ | सिहोरा–जबलपूर |


---

## १. चैत्रोत्सव.

( साक्या )

तृतीयेस मधुमासीं देवी मातुःगृहास येई ।
बहु दिवसांनी भेटे म्हणुनी हर्ष अह्मांला होई ॥
सकलहि मिळुनी आनंदानें स्वागत तिचें कराया ।
दृढभक्ति मनिं धरोनियां करुं सार्थक जन्माचें या ॥
प्रातःकाळीं केर काढुनी सडा अंगणीं घालूं ।
विविध कणे गे ! रांगोळीचे रंगासह ते काढूं ॥
पुष्पगुच्छ बहु तयार करुनी हार फुलांचे गुंफूं ।
जळें भरोनी घेउनि कलशा फुलझाडांतें शिंपूं ॥
उष्मा फार दुपारीं म्हणुनी खिडकी दरवाज्यातें ।
वाळ्याच्या हो बांधुनि ताट्या शिंपूं वर पाण्यातें ॥
लागे बाहेर उष्ण वायू, परि ये शीतळ आंत ।
सुगंध चंदन लाउनि अंगा घालूं हार गळ्यांत ॥
बहु आवडिनें कुंड्यांमधूनी आह्मीं शेतें लाऊं ।
शुभ दिन बघुनी अगास करुनी हळदीकुंकूं देऊं ॥
उटी लाउनी दो हस्तां मग, खिरापती बहु ओपूं ।
अत्तर लाउनि ओट्या भरुनी गुलाबपाणी शिंपूं ॥

वृद्ध तरुणही सुवासिनी त्या शेले शाली वेती ।
नानापरिचे अलंकारही घालुनि सजुनी येती ॥
संध्याकाळीं जिकडे तिकडे गडबड नगरीं दिसते ।
सर्व मैत्रिणी भेटति बोलति, वाढविती प्रेमातें ॥
बागबगीचा चौका कोणी रस्त्यांवर पाण्यातें ।
शिंपिति, पलंग टाकुनि तेथें सांगति मग गोष्टींतें ॥
समवय कोणी स्नेही अपुले संगें घेउनि त्यांतें ।
फिरावयाला जाती, कोणी कंदुक खेळायातें ॥
बागेमधुनी कोकिलरव तो सुस्वर ऐकत बसती ।
आपणही मग लागति गाया प्रियासवें एकांतीं ॥
कोमल पालवि फुटोनि ज्यांवर पक्षी क्रीडा करिती ।
त्या वृक्षांची शोभा मी हो वर्णावी किति तरि ती ॥

---

## २. विरहपत्रिका.

( मालिनी )

अतिमधुर असें हो ! आपुलें पत्र आलें ।
बघुनि नयन त्यातें गार माझे जहाले ॥
खचित मजसि तेव्हां हर्ष भारी जहाला ।
दिनभर स्मरलें मी आपुल्या हो ! पदांला ॥
बघुनि खचित सांगें आपुल्या पत्रिकेला ।
करयुगिं धरिं चित्तीं हर्षुनी घट्ट तीला ॥
भगिनिच मज वाटे सांगते गोड वृत्ता ।
परिसुनि मज होतो फार आनंद चित्ता ॥
प्रिय मज शनिवारीं पत्रिका ती मिळाली ।
मजसि मम पित्यानें प्रीतिनें अर्पियेली ॥
अतिशय क्षुधिताला पंचपक्वान्नथाली ।
अवचितचि मिळावी, मत्स्थिती तेविं झाली ॥

खचित बहुत झाला मानसीं हर्ष बाई !
नच मज कळलें ती बोलते काय आई ॥
स्मरण मजसि झालें आपुलें सर्व कार्मी ।
भरुनि नयन आले अश्रुंनीं अंध हो मी ॥
अतिशय मज लागे आपुला ध्यास जेव्हां ।
करि कठिन मनातें, आठवीं बोध, तेव्हां ॥
परि हृदयिं उमाळा येउनी ताप होतो ।
क्षणभर कवितांनीं होय कांहीं कमी तो ॥
' अजुनि न मम वेणी घालशी तूं कशी गे ' ।
भ्रमसि बघुनि पत्रा ' यापरी फार रागें—॥
भरुनि मजसि बोले आइ, तैं फार भ्याले ।
समजुतिस तिच्या मीं नम्रतेनेंचि केलें ॥
अवचित जशि निद्रा भंगुनी होय जागें— ।
मनुज, जणुं जहालें तेविं मी सत्य सांगें. ॥
खचित बहुत झाला हर्ष वाचून पत्रा ! ।
क्षणभर मज वाटे भेटलों सर्व गात्रां. ॥
कधिं मजसि तुम्ही हो ! भेटिचा लाभ द्याल ।
कधिं तरि मज संगें फार गोष्टी कराल ॥
कधिं मज हृदयीं हो घट्ट भारी धराल ।
कधि मम कृशताही सर्वथा घालवाल ॥
कशि तरि मज सांगा रात्र ही संपवीतां ? ।
दिवस तरि कसा तो आपुला घालवीतां ? ॥
प्रियहि असुनि वस्तू दृष्टिच्या आड होतां, ।
विसरति जन, तैसें आपुल्या हो न चित्ता ॥
तळमळ करि जैसा जीवनावीण मीन ।
स्थिति मम तशि होते आपणांवीण दीन ॥
जरि बहु अपुलें हो शीघ्र येणें कराल. ।
खचित मम मनाला हर्ष तेणें घडेल ॥

पुसति मज सख्या कीं काय होतें तुम्हांला ।
खचित उघड सांगा सर्व कांहीं अम्हांला ॥
अति फिकट तुम्ही कां ? रोड कीं हो ! जहाला ।
अशि बहु तुमच्या ती कोण चिंता मनाला ॥
सतत तिकडचा तो ध्यास किंवा असावा ।
वरिवरि पुसतें मी राग याचा नसावा ॥
मजसि गमत भारी बोल हे गोड त्यांचे ।
तिळहिन लटकें मी सांगतें सर्व साचें ॥
बहु मज तुमचा हो ध्यास हा लागलेला ।
करमत मज नाहीं दुःख वाटे मनाला ॥
कितिक दिवस आहे भेटिचा योग पाहीं ।
घडिघडि गणुनीयां लागलें वेड बाई ! ॥

( इंद्रवज्रा )

जों जों मना बंधन घालण्याच्या । यत्ना करीं तों उसळावयाच्या ॥
वेगांत येई, मज नावरे तें । ऐशाप्रकारें बहु बावरें तें ॥

( हरिणी )

जवळ तुमच्या होतें तेव्हां सुखी बहु आपण ।
क्षण न पडतां दृष्टीला मी न चैन तुम्हां पण ॥
करमत कसें आतां तेथें तुम्हां मजवांचुन ? ।
नवल मजला वाटे बाई ! कह्यांत कसें मन ! ॥

( वसंततिलक )

एके दिनीं सहज मी बसलें निवांत ।
झालें तदा बहुन दंगचि कल्पनांत ॥
होऊनि पक्षि उडुनी गगनांत जावें ।
पाहोनि मूर्ति सुख या नयनांस द्यावें ॥

( भुजंगप्रयात )

जशी चातकी वाट पाहे घनाची । तशी आपली वाट मी नेत्रिं साची ।।
घना देखतां होय आनंद तीतें । तसा आपणां पाहुनी होय हीतें ।।

[ गीति ]

होईल फार मम मनिं हर्ष जरी याल हो ! दिवाळींत ।
नाशावें त्यासि असे जो मम हृदयास नित्य जाळात ।।

---

### ३. आईस.

[ मालिनी ]

अवचित बघुनीयां गोडशा पत्रिकेला ।
अतिशय मम चित्तीं सांगतें हर्ष झाला ।।
अशिच वरि वरी गे, धाड तूं पत्रिकांतें ।
करुनि सदुपदेशा हर्षवीं मानसातें ।।
स्मृति मज तव जेव्हां होतसे फार आई !
सतत बहुन माझा कंठ दाटून येई ।।
सुचत मजसि नाहीं कामधंदा कसा तो ।
भजनिं सकळ माझा यापरी वेळ जातो ।।
दिनभर मजसाठीं कष्ट तूं भोगुनीया ।
रजनिहि न मिळाली झोंप निर्विघ्न ध्याया ।।
परि कधिं नच आई ! मानिला त्रास त्वां गे !
मनिं सततचि वाटे प्रीतिचा ओघ वागे ।।
'श्रमलिस बहु बाळे ! काम माझें करोनी' ।
म्हणुनि फिरवितांना हस्त गालांवरोनी–।।
तइं नच इतका गे ! वाढला हर्ष चित्ता ।
स्मरण परि तयाचें होतसे फार आतां ।।

( शालिनी )

कंठीं माझ्या बाळुनी दोन्हि बाहू । प्रेमें तारा* लागते गीत गाऊं ॥
ऐकोनी ते बोबडे बोल गोड । वाटे तेव्हां मानसीं फार कोड ॥

( मालिनी )

बघुनि मजकडे ती पाहते वक्रदृष्टी ।
मधुरतर अशा गे ! सांगते फार गोष्टी ॥
अतिशय तिजला कीं गाडिचा छंद लागे ।
अवचित मजपाशीं येउनी चेंडु मागे ॥
लहर मधुनि येते बाहुली खेळण्याची ।
गडबड मग होते बोबड्या बोलण्याची ॥
दिवस सकळ जातो ह्या परी खेळतांना ।
रजनि बहुत जाई चांदणें पाहतांना ॥

( साक्या )

रात्रींचा तो मंद, सुगंधहि वाहे वायू गार ।
गमे आणिला सुधाकरानें मधुरपणा ज्या फार ॥
प्रतिदिन रम्या वृद्धि कलांची ऐशा त्या चंद्राला ।
शिशुसम लघु नादकांत बघुनी आनंद तिला झाला ॥
सर्वांना ती ' चांद मामा ' ऐसें सांगे नाम ।
कौतुक करुनी पाहति सारे सोडुनि अपुलें काम ॥
इतुक्यांमध्यें नकळेचि तिजला कोणी मारी रागें ।
रडतांचे तेव्हां आतेजवळी नांव तयाचें सांगें ॥

( मालिनी )

मधुरतर वचातें ऐकुनी बोलतांना ।
हळु हळु धरुनीयां भिंतितें चालतांना ॥

* कवयित्रींच्या मुलीचें नांव. ही ता. १२।३।१९७ रोजीं नासिक येथें जन्मली.

कवतुक सकळांना वाटतें पाहुनीयां ।
घडिघडि तिज घेती, चुंबिती हर्षुनीयां ॥
सकळ मिळुनि नादीं लागती कीं तिच्या गे !
म्हणति तिज कुणी—‘ हें मारिलें कोणिं, सांगें ’ ॥
बहुविध करिताती यापरी प्रश्न तीतें ।
हसुनि हळुच देई गोड ती उत्तरांतें ॥
निजकरिं बहु घेई बाहुली आवडीनें ।
मधुर तिजशि बोले, खेळवी, गाय गाणें. ॥
सुगुण वधनि आई ! मानसीं हर्ष होतो ।
अधिक नच मला गे ! याहुनी वर्णवे तो ॥

---

## ४. पतीस विनवणी.

( मालिनी )

बहुत दिवस झाले भेटिला नाहिं आलां ।
म्हणुनि मजासि वाटे क्रोध हो ! काय आला ॥
अठवत मज नाहीं काय अन्याय झाला ।
प्रिय बहु असतांना कां धरीला अबोला ॥
न कळत बहु वेळां पूर्वि अन्याय झाले ।
करुनि सदुपदेशा बोलुनी दाखवीले ॥
मनिं धरुनि अढी कीं ना दिलें दर्शनाला ।
परि खचित नसावी खोड ही आपणांला ॥
‘ किति तरि शिकवूं मी ’—वाटुनी मानसातें ।
म्हणुनि मजसि वाटे टाळितां भेटण्यातें ॥
दिनभर करमेना, सांगतें सत्य आतां—।
कठिण मजसि वाटे रात्र ही घालवीतां ॥
पळभर करमेना आपणांविण जीतें ।
तिजसि अठवडा हा लाविला कंठण्यातें ॥

परि आजि विनवीते ही प्रिया आपणातें ।
अजि बहु अपराधी मागतें मी क्षमेतें ॥

( शार्दूलविक्रीडित )

पूर्वीं जी मजला सुरम्य सुखदा खोली बहू वाटली !
येणें होय न आपुलें म्हणुनियां ओसाड ती जाहली ॥
कर्णीं या कधिं गोड बोधकर त्या ऐकेन वाक्या गडे !
वाटे हो मज पादपद्म अपुलें दृष्टीस केव्हां पडे ! ॥
रात्रीं आजि गडे ! सुहास्य—वदना स्वप्नीं असें पाहिलें ।
प्रेमानें मजला धरोनि हृदयीं येवोनि आलिंगिलें ॥
माझें सांत्वन तें करोनि सुवचें मन्नेत्रही पूशिले ।
मूर्ती या नयनीं बघेन कधिं हो ऐसें मला जाहलें ॥

( गीति )

निद्रावश मी असतां, जागृत करुनी सुदुःख हो मजला ।
ऐसें म्हणोनि करितां, मनिं वाटे द्रव नसेचि अपुल्याला ॥
छे ! छे ! क्षणहि नसावा वास तुझा ह्या मनांत शंके गे ! ।
खाचित सदा मजविषयीं मनिं त्यांच्या प्रेम फार तें वागे ॥

—o—

## ५. धांवा.

( स्वागता. )

धांव शीघ्र करुणाघन ! पाव । ठेविला तुजवरी दृढ भाव ।
येतसें शरण बा ! चरणांला । त्रासलें बहुत मी दुखण्याला ॥
व्याधिताप सुकवी तनु भारी । त्यास वर्षुनि कृपाजल वारीं ।
तारिता तुजविणें मज नाहीं । लीन होत चरणीं तव बा ! ही ॥
धांव घे मजकडे लवलाहीं । दुःखपंकिं पडली अबला ही ।
त्यांतुनी मज विभो ! अजि काढीं । भक्ततारक ! नवें यश जोडीं ।
तारिलें अजवरी बहुतांला । त्रासलासि गमतें नियमाला ॥

त्वद्विना कशि तरूं भवसिंधू । दुःखपर्वत विभो ! कशि विंधूं ? ।
दुःख पूर्ण बघुनी जगतांत । धैर्यलेश न वसे हृदयांत ॥
लोक निंदिति, कटू वचनांतें । ऐकतां हृदय भंगुनि जातें ।
गर्भसंकट नको प्रभुराया ! प्रार्थना करितसें तव पाया ।
दीनभाषणिं किती विनवूं रे ! होति कां विफल हे श्रम सारे ।

( रथोद्धता )

प्रार्थना कशि न ऐकिली असे । कीं कृपा मजवरी तुझी नसे ।
धांवसी ह्मणति भक्तसंकटीं । झांकिसी मज न कां कृपापटीं ? ॥

( मालिनी )

अजवरि बहु झालीं औषधें पुष्कळांचीं ।
हयगय नच केली कोणत्याही प्रतीची ॥
बहुत करुनि पथ्यें काय गेला झिजून ।
परि नच गुण आला लेश त्यांचा अजून ॥

[ मंदाक्रांता ]

भक्तांच्या तूं कठिण समयीं लागसी धांव घ्याया ।
वाचीं ग्रंथीं ह्मणुनि तुजला लागलें आळवाया ॥
आधिव्याधी मम सकलही जाणसी देवराया ।
आतां कां रे ! उशिर करिशी दीन ही उद्धराया ॥
ज्या ज्या लीला करुनि भजकां सोडवीलें तुवां रे !
त्या त्या सत्या समजुनि विभो ! संत गाताति सारे ।
आहे ऐसें विमल यश हें भूवरी देवराया !
कंटाळोनी मजवरिच तें पाहसी घालवाया ॥
झंझावातें जशिं कदलिचीं मोडुनी जाति अंगें ।
गात्रें तैशीं शिथिल मम हीं जाहलीं व्याधियोगें ॥
दुःखाश्रूंला वमुनि वमुनी त्रासले नेत्र पाहीं ।
' धांवें, पावें ' ह्मणुनि ह्मणुनी शुष्क झाला घसाही ॥

## ६. पुत्रस्मरण.

[ वसंततिलक ]

‘ आनंद ’ हेंचि तव नाम सुता ! असावें ।
आनंदि सर्व बघुनी मनिं फार यावें ॥
आला न योग परि तो विधिनें घडोनी ।
दुःखांत मात्र पडलों अवघे बुडोनी ॥
होतें मनांत तुज शिक्षण योग्य द्यावें ।
चित्तें तुझ्या सतत काव्यरसीं बुडावें ॥
‘ विद्वान् रसज्ञ कविभूषण हा जहाला ’ ।
ऐकेन मी कधिं असें म्हणतां जनांला ॥
काळा ! तुवां हरुनियां मम बालकातें ।
झाला असा कवण तो जगिं लाभ तूतें ॥
मीं काय रे ! वद तुझा अपराध केला ।
रागावुनी मजवरी मम बाळ नेला ॥

[ भुजंगप्रयात ]

गुलाबापरी अंगकांती जयाची । मला ही गमे कल्पना तुच्छ साची ।
जगीं एकही वस्तु ना तत्समान । जया पाहतां हर्षती थोरसान ॥
हरोनी अशा कोमला बालकाला । तुवां दुष्टता दाखविली जनाला ।
यदीयोदयें मागचे कष्ट सारे । स्मृतींतून गेले अकस्मात कीं रे ! ॥
दुधाचा नसे लेश ज्या प्राप्त झाला। दिला जन्म ज्या कष्ट कीं भोगण्याला
हंसें वा रडेंही न लाभे तयाचें । दुधा निर्मुनी नाशिसी बाळ कैचें ?

---

## ७. शस्त्रक्रियेपूर्वी प्रभुप्रार्थना.

कवयित्री अजारी असतां त्यांनीं मिरज येथें तेथील सुप्रसिद्ध डॉक्टर वानलेस यांच्याकडून शस्त्रक्रिया करविली. ती करविण्यापूर्वी कवयित्रींनीं

केलेली ही प्रार्थना आहे. शस्त्रक्रियेनंतर त्यांनीं डॉ० वानलेस यांचें पद्यात्मक अभिनंदन केलें तें प्रस्तुत कवितेच्या पुढें खालीं दिलें आहे.

( दिंडी )

दिवस सरला हा प्रभो ! प्रार्थनेंत । तरी वाटे जाहलें उणें तींत ।
असें होतां रात्रही निघुनि गेली । परी नाहीं मानसा शांति आली ।
दोन माझे ऐकून बोल घेई । डाक्तरातें तूं साह्य अजी होई ।
शिरुनि त्याच्या शस्त्रांत वा करांत । जगद्‌व्यापी तव नाम करीं सार्थ ।।

---

## ८. शस्त्रक्रियेनंतर डॉ० वान्लेस यांस.

( दिंड्या )

कीर्ति तव बा ! ऐकून इथें आलों । भव्य मूर्ती पाहून मनीं धालों ।
ईशभक्ती औदार्य तुझे ठायीं । शस्त्रकर्मीं निपुणता लीनताही ।।
प्रेम दिसतें सर्वांस तुझ्या ठायीं । सान मोठा हा भेद तुला नाहीं ।
निपुण होसी सर्वही वैद्यकांत । कळुन आलें पाहतां दाखल्यांत ।।
औषधालय हें रोगपीडितांहीं । भरुनि गेलें तिळमात्र रितें नाहीं ।
परी नाहीं मानसीं त्रास तूज । करिशि अपुलें वेळच्यावेळिं काज ।।
दूर करिशी आपत्ति थोर माझी । जीवदाता तूं गमशि मला आजी ।
सर्व रोगी तुज धन्यवाद देती । जगीं पसरो ही तुझी विपुल कीर्ति ।।

( हरिणी )

तव सहचरी प्रेमें तूतें सहाय करीतसे ।
विकल मनुजा वाद्यानें ती सदा रिझवीतसे ।।
कथुनि अपुल्या सद्धर्मातें अह्मां वळवीतसे ।
खचित अमुचीं दुःखें सारीं लया तइं नेतसे ।।

---

## ९. मुग्ध मुलीस.

( साक्या )

मुली ! मुग्ध तूं अससी, कां गे ! पत्रोत्तर तव नाहीं ? ।
काय अडचणी तुजला आल्या ? कळे न मजला कांहीं ॥
अशक्त नाजुक रोड फार तूं, तुजला कांहीं झालें ।
मुलें तुझीं कीं किरकिर करुनी शिणविति तुजला बाले ! ॥
गडी माणसें नसल्याने वा कामें तुजवर पडतीं ! ।
शंका येउनि अनेक परिच्या विह्वळ होतें चित्तीं ॥
किंवा रागावलीस मजवर काय ? खरें सांगावें ।
छे ! छे ! प्रेमळ, गरिब सुता, नच मातेवर रागावे ॥
अनुपम सुख मज लाभे तनये ! तव सहवासीं असतां ।
तुजविण शोभा शून्य गृहीं मज रुचे न कांहीं आतां ॥
मुलें तुझीं गे ! गोड किती तरि सुमनांसम तीं गमतीं ।
मुके मधुर ते घ्यावे प्रेमें, नसे तयांची गणती ॥
तव सहवासीं अनेक दिन ते एक पळापरि गेले ।
कंठूं आतां काळ कसा हा, व्याकुळ चित्त जहालें ॥
मुली-नातवंडांत रमुनि मी कुठें न जाइं बसाया ।
पांहुनि ऐसें भगिनी आप्तहि लागति दूषण द्याया ॥
म्हणोत जें ज्यां गमे, न त्यांना ठाउक मत्स्थिति कांहीं ।
मुलें तयांचीं निकट सदोदित, माझीं दूर सदाही ॥
तव सहवासीं पुत्रविरह मी विसरुनि गेलें होतें ।
मुलें-मुली ह्या समान असती प्रेमाला, मज गमतें ॥
मुलांपरिस मज मुलीच गमती प्रेमळपणांत भारी ।
दूर राहुनी परवश परि ती काय करील बिचारी ॥
भाग्यवंत तूं आणि बहिण तव सुखी तुम्हां प्रभु ठेवो ।
देवो आयु उदंड मुलां, मज भेटहि वरिचेवरि घडवो ॥
पुत्र नसे मज, दुःख न मजला, एकचि  :ख मला हो !
तुमच्या सहवासाचा मिळतो अल्प फार मज लाहो ॥

आवश्यक तीं कामें करण्या मोठ्या यत्नें जातें ।
तुम्हां आठवुनि, तन्मय होउनि, अपूर्ण सगळें होतें ॥
तुम्हां–वांचुनी वेडी झाल्यें हंसोत मातें कोणी ।
' जावें त्याच्या वंशा ' तेव्हां समजावें हें त्यांनीं ॥
कामांमध्यें चित्त न लागे, वाचन करण्या कांहीं ।
ग्रंथमंदिरीं म्हणूनि गेलें आनंदें मी बाई ! ।
कोण बरें हे ? आगरकर कां ? निबंध यांचे असती–।
देशोद्धारक, परि कालातें नसे तयांची महती ॥
काय रानडे ? नकोत आतां त्यांचीं तीं व्याख्यानें ।
धार्मिक, भाविक, भोळसराचे जन सत्य आचरूं जाणे ॥
गद्य नको, तें पद्य बघूं या रमेल मानस तेथें ।
मयूर कवि हा, अमित तयाचीं काव्यें असतीं येथें ॥
नको परंतू नको मनाला कविता बाई ! याची ।
वाचिलि पूर्वीं, वाटे आतां भीती त्या यमकांची ॥
अभिनव कवि हे, 'गुच्छ' तयांचे 'तरंग', 'लहरी' असती ।
आइ-मुलांचे, मधुबाल्याचे चुटके ह्यांमधिं दिसती ॥
प्रेम काय हें ! काय माधुरी ! काव्याची मज गमली ! ।
प्रेमरसाचे चुटके घेतां मन्मति थोडी रमली ॥
हाय ! संपले चुटके आतां, पाहूं पुढतीं काई ? ।
तात्त्विक शास्त्रग्रंथ ? नको मज उरस्फोड ती बाई ! ॥
लठ्ठ कोणतें पुस्तक हें कीं 'गीतारहस्य' दिसतें ।
'माय-लेकिचें रहस्य' असतें, वाचीलें तरि असतें ॥
ईशाचिंतनीं मन रमवावें, येइल शांती त्यानें ।
साधक बाधक विचार तात्त्विक, गोंधळ होतो यानें ॥
अशा प्रकारें निकाल लागे वाचनादि कामांचा ।
काय करावें, कोठें जावें, होई विरस मनाचा ॥
पत्रें येतीं तुमचीं तरि हो भेटीपरि सुख मातें ।
म्हणुनी धाडीं वरचेवर तूं कुशलान्वित पत्रांतें ॥

---

# सौ० उषाबाई खरे.

जन्म—[ जबलपूर ] २।९।१८९९ इ.

या सौ० शांताबाई फणसे यांची कन्या होत. कै० दाजीसाहेब खरे हे यांचे श्वशुर. यांचे पति रा. रा. प्रभाकर दाजी खरे हे केंब्रिजचे ग्राजुएट असून मुंबई येथें बॅरिस्टर आहेत. यांचें शिक्षण पुणे येथील मुलींच्या हायस्कुलांत झालें.

## १. अपुरें ज्ञान.

[ साक्या ]

होतें जेव्हां कोशामाजी, हेंचि असे जग वाटे ।
दृढ कवचीचें केलेलें हें. वसे एकली तेथें ।।
परी जेधवां कोशांतुनि मी आलें गे ! बाहेरीं ।
गमे तेधवां जग हेंचि खरें, होतें मी अंध जरी ।।
माझें हें नव गवताचें जग, अतिशय मार्दव ह्यांत ।
प्रेमळ माता माझी, मीही राहतसूं सौख्यांत ।।
उडुनि एकदां आईसह मी आलें जइं बाहेरीं ।
झाडावरती बसुनि पाहिली शोभा नव ती सारी ।।
वाटे तेव्हां किति अज्ञानी होतें मी घरट्यांत ।
जग हें केलें ईशें जपुनी ठेवियलें पानांत ।।
परी जेधवां आईसम मी गेलें बहु दूरवरी ।
नील नभ वरी पाहुनि खालीं जलसंचय थोर गिरी ।।
वाटे आतां नसे कोश तो अथवा तें घरटेंही ।
रान न हें जग कळे न आतां मजला तेंही कांहीं ।
मजसि कळेना जगत् केवढें. कळतें कां कोणाला ? !
'कळे न कोणा-' म्हणे कवि-' भजा समर्थ त्या ईशाला '।।

जशी स्थिती त्या पक्ष्याची गे ! तशिच आपुली पाहीं ।
ज्ञान आपुलें सदैव अपुरें, गर्व नसावा कांहीं ।।

---

## सौ० आनंदीबाई बिवलकर ( आसूद )

या कवयित्री अलीबाग येथील सुप्रसिद्ध, कुलीन व थोर बिवलकर—घराण्यांतल्या आहेत. यांनीं मराठी धार्मिक ग्रंथ व काव्यें वाचून घरींच शिक्षण संपादिलें आहे. या शांताश्रम, वेशवी, अलीबाग, येथें राहातात. यांनीं पुष्कळ कवनें केलीं आहेत. तीं बहुतेक पौराणिक व भक्तिरसात्मक आहेत. कवयित्रींची रचना साधी, सरळ, सुबोध व गोड आहे. ध्रुवाख्यान, गौरीशंकराची आरती, भगवंताची समवृत्ति, लोकमान्य टिळक, सती अहल्या, भगवंताचा दशावतारी खेळ इत्यादि स्फुट प्रकरणें कवयित्रींनीं रचिलेलीं आहेत.

### १. सती अनसूया.

( चाल—उद्धवा शांतवन कर० )

भूलोकिं धन्य मुनिजाया, साध्वी ती श्रुत अनसूया ।। ध्रु० ।।
एकदा नारदस्वारी, वैकुंठालागुनि गेली,
तइं उमा रमा सावित्री, झोंपाळ्यावरति बसोनी
प्रेमानें श्रीहरिलीला
गाति. तैं देखती मुनिला.
आसन त्या देती त्याला,
वदति त्या " नवल सांगा या ! " भूलोकिं धन्य मुनिजाया ।।
मुनि वदे, ' एकदा धामीं, अत्रिच्या सहज गेलों मी.
ऋष्याश्रमधर्म बघोनी, स्वर्ग तुच्छ गमला मजसी.

अनसूया धन्य सती ती,
पतिसेवनिं धरुनी प्रीती
तोषवी नित्य ती अतिथी.
अति शुद्ध तिची दिनचर्या ' भूलोकिं धन्य मुनिजाया ॥
कीर्ति अशी श्रवणीं पडतां, ये विषम तयांच्या चित्ता.
' साध्वी श्रुत आम्ही जगता, ही कोण ? काय ही वार्ता ! '
धिक्कारुनि त्यासी वदती,
" भ्रम झाला तुमच्या चित्ता.
स्तुति तिची आमुच्या पुढतीं
लागलां तुम्ही कां गाया ? " भूलोक धन्य मुनिजाया ॥
जाउनी गृहातें अपुल्या, रुसुनिय तिघी त्या बसल्या.
मग पतिनीं प्रश्न त्यां केला ' कारण तें काय रागाला ? '
जाहला म्हणति अपमान,
आम्हां गाणि नारद सान,
अनसुयेसि दे बहुमान,
आतांच जाय सांगुनियां, भूलोकिं धन्य मुनिजाया ॥
पति पुसती, ' काय करावें, आम्हीं ! ' त्या वदता भावें,
आश्रमां तिघांनीं जावें, अनसूयासत्त्व हरावें. '
पति जाति मुनीच्या सदनीं,
बोलती सतीलागोनी
' दे अन्न नग्न होऊनी ! '
क्षणभरि स्तिमित अनसूया; भूलोकिं धन्य मुनिजाया ॥
चिंतुनि स्वपतिचरणांतें, त्यांवरी तीर्थ शिंपी ते.
मनिं म्हणे, ' बालकें माझा त्यास मी विवस्त्राच पाजीं ! "
खरि होय सतीची वाणी,
रांगती बालकें तीन्हीं !
पाहती अत्रि येऊनी.
करि तृप्त बालकां जाया ! भूलोकिं धन्य मुनिजाया ॥

कैलासा नारद गेले, अंबेनें त्यांसी पुसलें,
'पति अमुचे कोठें गेले, विरहें मन व्याकुळ झालें.'
मुनि वदे, ' बाल होवोनी
तुमचे पति मुनिच्या सदनीं !
अनसूया-स्तन-रसपानीं
रमले ! जा त्यां इथें परत आणाया. ' भूलोकिं धन्य मुनिजाया० ।।
मग तिकडे त्या तिघीजणीही जाती, पति पाळण्यांत पाहाती !
अनसूयेच्या चरणांलागी नमिती, ' दे पती ' असें विनवीती.
मनिं व्यर्थ असूया धरिली,
पाहिजे क्षमा त्वां केली,
मुनितनयमूर्ति अवतरली,
' आनन्दी ' वंदि दत्ता या, भूलोकिं धन्य मुनिजाया ।।

---

## २. श्रीकृष्णाचा हट्ट.

( चाल—बाळा ! तूं कोठें जासी० )

गोकुळीं वसे कंसारी, करि लीला शिशुतनुधारी ! ।।
गोरस प्रिय तया भारी, प्रीतीनें भक्षि मुरारी ।
रामकृष्ण खेळती प्रीती ।
बहु तोषति माता चित्तीं ।
हट्ट बहु करिति, हट्ट बहु करिती ।
न मिळती वस्तु दे म्हणती ! ।। १ ।।
बोलली माय बाळासी, काय देउं खेळायासी ।
तव इच्छा सांगे मजसी, मागसि तें देइन तुजसी ।
श्रीरंग म्हणे गे माते ।
सूर्यबिंब देई मज तें ।
अवड मज फार, अवड मज फार ।
त्रिभुवनीं तेज बहु थोर ।। २ ।।

नंदराणि वदली हरितें, काय असें मागासि भलतें ?
कांहिं दुजें मागासि जरि तें, पुरवीन तुझ्या बोलातें ।
गोपाळ वदे गे जननी, बहु शीतळ दिसतो गगनीं ।
चंद्र तो देइ, चंद्र तो देई ।
अति रम्यचि दिसतो पाही. ॥ ३ ॥

माउली म्हणे गोपाळा ! घेतोसि अशा कां आळा ?
कांहिं दुजें माग वेल्हाळा ! कौतुक तें पाहिन डोळां.
वासुदेव तिजसी बोले,
नयनिंची बाहुली हाले,
असे ती सान, असे ती सान,
मी घरी तिजासिं खेळेन ॥ ४ ॥

नंदाची वदली राणी, हट्ट अहो ! पुरवा कोणी ।
अशि युक्ती सांग रोहिणी, कीं जाय हरी तोषोनी ।
प्रद्युम्न म्हणे गे आई ! यशोदे ! रोहिणीमाई !
मजासि हें देइ, मजसि हें देई ।
फिरत्याची साउलि पाहीं ॥ ५ ॥

माय म्हणे त्यजि या छंदा, नाहीं तर कळविन नंदा ।
स्वल्प वस्तु वद गोविंदा ! भलत्याचि सोडुनी नादा ।
मागणी बहुविधा केली, पुरवितां नसे ती आली ।
मागुं मी काइ, मागुं मी काई ?
लागली भूक ! दूध मज देई ॥ ६ ॥

बाळासि अंकिं घेऊनी, मुख पाहे कुरवाळोनी ।
तइं विश्व देखिलें वदनीं, तनुभान जाइ विसरोनी ।
प्रभुलीला मनिं आठवुनी ' आनंदी ' जाय रमोनी ॥ ७ ॥

## ३. मीठ.

( चाल—वसन किती हें शोभविते या सुंदर तव तनुला )

वसे एकदां चक्रपाणी रुक्मिणिच्या सदनीं ।
तिथें नायिका अष्ट, बायका जमल्या सगळ्याजणी ।।
तदा रुक्मिणी पट्टराणी बैसे सिंहासनीं ।
असें पाहतां विषम वाटलें सर्वां-लागोनी ।
मग सत्राजिततनया बोले, कां वरिलें आम्हां ? ।
कळे आजची आवड अमुची मुळिंच नसे तुम्हां ॥
माधव बोले, तुम्हां आणिलें करोनिया विक्रमा ।
प्रेमाची मम खूण सांगतों, एके तरि भामा ! ।।
तूं साकर, ती पेढा रुचकर, ही मधु सीताफळ ।
एक अंजिराचि, दुसरी जांभुळ, तिजी आम्रवत्—फल ।
परोपरीची आवड माझी तुम्हांवरी असतां ।
सांगा तुह्मी कां गे रुसतां, दोष मजसि देतां ।
तदा भामिनी आनंदोनी पुसते कृष्णासी ।
तुम्हां भीमकी कसी आवडे सांगा आम्हांसी ।
रुक्मिणीवरी मिठासारखी असे मम प्रीति ।
हरिचे भाषण कर्णीं पडतां सर्वजणी हंसती ।
रागावुनिया तदा भीमकी हरीकडे पाही ।
देव बोलला क्षुधा लागली पाक झणीं करवी ।
सोळा सहस्र घेउनि युवती मधें उभा यदुपती ।
करी रुक्मिणी सर्व सिद्धता वाढितसे पंक्ती ॥
बहु पक्वान्नें अनेक शाका बहु कोशिंबीरी ।
सुग्रासान्नें पात्रिं पाहुनी आनन्दति नारी ।
जेवित असतां टकमक बघती परस्परां ललना ।
लवणावीणे रुची न कांहीं साऱ्या पक्वान्नां ।
म्हणति, रुक्मिणी ! मीठचि वाढी, चव अन्ना नाहीं ।
तईं भीमकी हर्षभरानें हरिवदना पाही ।।

आवड तूझी मिठासारखी वदतां लक्ष्मीपती ।
सान्या तेव्हां कां गे हंसला ? वदा कशा रीती ।
त्यांच्या हृदया सुबोव ठसला हरिच्या बोलाचा ।
लीन होउनी पायीं, वदती मत्सर नच अमुचा ।
धन्य रुक्मिणी नमितों चरणीं क्षमा करीं आम्हां ।
' आनंदी ' ही लीला गाउनि वाढवि हरिप्रेमा ।

---

### ४. चिंधी.

( चाल— श्रीमंत पतीची राणी० )

देवर्षि म्हणे यदुराया ! द्रौपदीवरिच कां माया ? ॥ धृ० ॥
सुभद्रा बहिण पाठीची, देवकिची तनया साची ।
ती सून पांडुराजाची, सद्गुर्णा, कीर्ति बहु जीची ॥
अभिमन्यु सुपुत्रहि पोटीं,
तूं बंधु असिसि जगजेठी,
पति धन्वी थोर किरीटी,
नच उणें जिच्या रूपाला, नवलाचि हें वाटे मजला ॥ देवर्षि० १ ॥
मुनिवचालागि ऐकोनी, माधव तो हांसे स्वमनीं ।
दर्भानें बोट चिरोनी, कासाविस दावि होवोनी ।
नारदा म्हणे कंसारी
जाउनी सुभद्रागारीं
चिंधि आणावी सत्वरी
कांपलें बोट बांधाया, करि अतां त्वरा मुनिराया ! ॥ देवर्षि० २ ॥
लगबगी निघाली स्वारी, ये मुनी सुभद्रागारीं,
सांगोनि वृत्त तिस वदला, दे चिंधि झडकरी कुमरी !
ती वदे, शालु हा थोर
या लुगड्यावरती मोर
या वसनिं हंस सुंदर
दिसतें न यांत फाडाया, देखतां तुम्ही मुनिराया ! ॥ देवर्षि० ३ ॥

मग मुनी द्रौपदीसदनीं, वृत्तान्त कळवि जाऊनी ।
ऋषीचे बोल परिसोनी, घाबरे मनीं नृपरमणी ।
पार्थानें बहुमोलाचें
आणिलें वसन हौसेचें
ते दिवसीं प्रथमचि नेसे.
झाली न पदर फाडाया, जा वदे चिंधि घेउनियां ! ॥ देवर्षि० ॥

---

## ५. द्रौपदीगर्वहरण.

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या० )

एके दिवशीं इंद्रप्रस्था आले वनमाळी ।
धर्मार्जुन हे भक्त तयाचे, स्नेहचि परि पाळी ॥
भीमासह ते पांडव सारे, तशीच पांचाळी ।
होतीं तेथें विनोद करि हरि, सर्वांच्या जवळीं ॥
कृष्ण बोलला, मनांत येतें, वनभोजन व्हावें ।
विपिनश्रीची मौज पहाया सर्वांनीं जावें. ॥
करी द्रौपदी सर्व सिद्धता अरण्यांत जाती ।
पशु पक्षीही तसेंचि तरुही, सर्व तऱ्हा बघती ॥
तेथें दैवें एक देखिलें, जांभुळ पडलेलें ।
म्हणे तयांसी, ' मुनि—आज्ञेविण, पानहि नच हाले ॥
कैशी मजसी बुद्धि जाहली, येथें येण्याची ।
थोर तामसी तपोनिधी तो, शापिल सर्वांसी ॥
काय करावें कांहिं सुचेना, वाटे भय आतां ।
मुनिच्या कोपा कैसा वारूं ? थोर मला चिंता ' ॥
धर्म घाबरे, बोले, ' देवा ! काय करूं दिव्य ? ।
तुझिया पायां अम्हीं अर्पितों अगा स्वार्थ सर्व ' ॥
अच्युत बोले, ' एकचि सुचते युक्ती मजलागीं ।
निज पुण्यातें उच्चारावें, सर्वांनीं वेगीं ' ॥

धर्म बोलला, ‘ प्रिये ! बंधुहो ! सत्य सत्य बोला !
अम्हांकारणें होति कष्ट हे, कैसे देवाला ! ’ ॥
अजातरिपु तो वदे, ‘ माधवा ! मी तुज सत्य वदें ।
असत्य भाषण कधीं न केलें, आण तुझिच बाधे ’ ॥
ज्येष्ठ बंधु तो ऐसें वदतां, काय नवल झालें ।
फळ पडलेलें भूमीपासुनि अधांतरीं गेलें ! ॥
भीम म्हणे तैं, ‘ ऐक केशवा ! बल माझें पाही ।
सत्कारणिं मी सदा लावितों, त्रास कुणां नाहीं ’ ॥
अर्जुन बोले, ‘ ऐक श्रीधरा ! धनुविद्या माझी ।
गोविप्रांचें पालन करण्या लावितसें आजी’ ॥
पांचाहि पांडव ऐसें वदतां वदे हृषीकेशी ।
‘ माझें सत्य व्रत मी कथितों, तुम्हां सर्वांसी ॥
सोळा सहस्र असतां नारी, असें ब्रह्मचारी ।
असेल माझें वचन सत्य तरि जाइल हें फळ वरी ’ ॥
माधव ऐसें वदतां चढलें फळ थोडें वरतीं ।
तरि थोडेसें अंतर राही विचार करि चित्तीं ॥
बोले मग तो भगिनीलागीं, ‘ तव दे पुण्याई ।
ऋषिकोपांतुनि सुटून जाऊं द्रौपदि ! लवलाही ’ ॥
वदे सती, ‘पतिंविषयीं सगळ्या सम प्रीति गमली ’।
तोंचि वर्तलें थोर नवल कीं, फळ आलें खालीं ! ॥
ऐसें होतां द्रौपदीकडे आश्चर्यें बघती ।
म्हणति, आमुच्या वचनें चढलें, तव आलें खालीं ॥
माधव बोले, ‘ऐक द्रौपदी, असत्य गे वदसी ।
पतिप्रेमांतचि कसर जाहली, वाटे गे मजसी ’ ॥
स्तंभापरि ती उभी राहिली द्रुपदाची बाळा ।
वदे ‘ अहाहा ! कैसा केला, दैवें घोंटाळा ॥
पती सहावा कर्ण असावा ऐसें मनिं आलें ’ ।
वदतां ऐसें अकस्मात फळ, देठाशीं गेलें ! ॥

खिन्न होउनी पांडवजाया सर्वांच्या पायां ।
धरुनी बोले, 'क्षमा करावी, आतां यदुराया' ! ॥
गर्व घालवुनि सुमार्ग दावुनि, पांचाळिस बोधी ।
तो लक्ष्मीपति 'आनंदी'–तें देवो सद्बुद्धी ! ॥

## श्रीमती अंबुबाई.

या कवयित्री इंदूर येथें असतात. यापलीकडे त्यांची कांहींच माहिती मिळाली नाहीं.

### १. आशा.

साष्टांग प्रणिपात तुला, आशालतिके ! सुनिर्मला,
मायावी मधुकलिकेला, निर्मुनि कथिसी मनुजाला,
अशाच येतिल उद्यानीं, संसाराच्या सत्य गणी.
करिशि मशागत जर झटुनी, सुगंध कोंदेलचि भुवनीं.
असें सांगुनी
लाविसि प्राणी
कामा निशिदिनिं
कलिका परि नाचि त्या मिळती, हताश होउनि ते रडती ॥ १ ॥
\+ + × ×
सुखद लालसा द्रव्याची, उपजवुनी जनमनिं साची.
खोट्या हुरुपा वाढवुनी, नाचविशी त्याला भुवनीं.
"घोक्या कर तूं निरंतर, होइ परीक्षा मग सुकर.
इष्ट सुखाला
पुत्र–प्रीतिला
वाण न तुजला"
सांगुनि अपयश देशि तया, काय म्हणावें या न्याया ! ॥ २ ॥

समरस होसी आत्म्यासीं, यत्न सुखातें करवीसी.
पोटासाठीं जे खपती, स्वप्नसुखें त्यां दाखविसी.
येइल, म्हणसी
खास तुम्हांसी
वेळ सुखाची
काळ लोटतो किती तरी, वेळ न येई कधीं परी ! ॥ ३ ॥

—o—

## २. निमीलित पद्मास.

उघडिं उघडिं नयन तुझे मृदुल रुचिर पद्मा ! ।
पूर्वा अरुणित झाली,
प्रकृतिदेवि पट बदली,
प्रेमें ही तुज हलवी,
तारे हे लपती ॥ १ ॥
ही नलिनी मुदित होत,
प्रिय समीर सुरभि नेत,
वनराजी भा वितरत,
अलि गुं गुं करिती ॥ २ ॥
नूतन जीवनसंचार,
ऐक्यभावनाविस्तार,
सुखमय हा संसार,
शांत वसुधा दिसे ! ॥ ३ ॥

—————

## श्रीमती शांताबाई भिडे.

जन्म—इ० स० १९०३.

### १. कौमुदीविहार.

( चाल—रे कुमुदबांधवा ! नवल वाटतें. )

हो सुधाकराची धवल चंद्रिका पसरे ।
हे अगणित चमकति नीलाकाशीं तारे ॥
आकाशमंडपचि रत्नखचित जणुं केला ।
हा रविस्वागता पूर्वदिशेनें रचिला ॥
कीं कल्पतरूचीं सुमें गळोनी पडलीं ।
कीं देववधूंनीं रंगवल्लि ही भरिली ॥
पीयूषकुम्भ हे सुधा वर्षिती खालीं ।
वसुमती समस्तहि अमृतमयी ही झाली ॥
विकसलीं कुवलयें गंधयुक्त कासारीं ।
उडुगणां स्पर्धिती नीलजलाशयिं सारीं ॥
प्रतिबिंब इंदुचें सोर्मिजलावरि उसळे ।
रोहिणी पतीसह जललीला कीं खेळे ॥
कुमुदिनीदलें हीं आनंदानें डुलती ।
मृदु शीत परिमलें अष्टदिशा दरवळती ॥
आनंददायिनी सुरम्य दिसते धरणी ।
किति अगाध लीला प्रभु तव सुंदर करणी ॥
साम्राज्य पसरलें शांतिदविचें रुचिर ।
तो प्रभुप्रसादें सुखवो जनता सुचिर ॥

---

## २. उषा.

आरक्त दीप्ति ही बालरवीची पसरे ।
हे मंजु रुचिर रव करिति विहंगम सारे ॥
प्रार्थिते प्रभूला भूपाळ्या कीं म्हणुनी ।
सामर्थ्य दे अम्हां कार्या तम आवरुनी ॥
विकसले सुगंधित कुसुमगुच्छ तरुवरती ।
हीं विकासित पद्में कासारामधिं डुलती ॥
गुंजारव मधुकर मधुसेवनरत करिती ।
हे मंद गंधवह पुष्पपरिमला हरिती ॥
पीतवर्ण दिसते भानुकरांनीं अवनी ।
जणुं बद्ध असे ही हेमतंतुजालांनीं ॥
कांचनी मार्जनी निशातमा संकरिती ।
रविकुंभांतुनि कां सुवर्णधारा स्त्रवती ॥
कीं निशासमयिंचें कृष्णवस्त्र टाकोनी ।
हा पीतवर्णयुत विरल शालु नेसोनी ॥
ही सृष्टिसुंदरी सुवर्ण–अभिषेकांतीं ।
जणुं नट्टुनि सजुनियां पाहतसे सुमती ॥
प्रतिबिंबित जलनिधिमुकुरतलावरि रमणी ।
लावुनिया भाला कुंकुमतिलकाचि तरणी ! ॥

---

## श्रीमती शांताबाई कयाळ.

जन्म इ. स. १८९३.

या कवयित्री झांशी येथें आपल्या वडिलांच्या घरीं जन्मल्या. यांच्या वडिलांचें नांव रा० रा० नारायण पुरुषोत्तम लवाटे. यांचें प्राथमिक शिक्षण लहानपणींच झालें. यांचे पति झांशीचे कै० रा० रा० नारायणराव ऊर्फ

भाऊसाहेब कयाळ. यांचें १९११ सालीं निधन झाल्यानंतर शांताबाईनीं आपले वडील बंधु, अलाहाबाद येथील प्रख्यात हायकोर्ट वकील, रा० रा० कृष्णराव नारायणराव लघाटे, बी. ए. एल एल बी., यांजपाशीं इंग्रजीचा अभ्यास सुरू केला व तो पुढें कांहीं काळपर्यंत शाळेतही चालूं ठेविला. अजून यांचा अभ्यास घरीं चालूच आहे. सध्यां या अलाहाबाद येथें असतात. यांची स्फुट कविता बरीच असून ती सर्वच अप्रसिद्ध आहे. खालीं दिलेल्या दोन कवितांवरून यांची काव्यरचनाशक्ति चांगली आहे असें सहज दिसून येतें. यांची वाणी मधुर व रसाळ आहे.

## १. त्रिवेणी-संगम.

गंगा यमुना या दोवींचा संगम हा पाहुनी
वाटतें ऐसें माझ्या मनीं:—.
दोन मैत्रिणी परस्परांना आलिंगुनि राहती,
हर्षुनि प्रेमें कुरवाळिती.
प्रेम निरंतर पाहुनि त्यांचे वाटे मज निश्चिती
मानवी प्रेम क्षणिक हें किती !
स्वार्थ-परायण मनुज प्राणी स्वार्थी रत होउनी,
झुगारुनि देती प्रेमा झणीं.
परि गंगा यमुना स्वार्थ—रहित मैत्रिणी,
अति—शुद्ध प्रीती वसते त्यांच्या मनीं,
स्वहितासाठीं नच करिती धडपड जनीं,
म्हणुनि तयांचें प्रेम निरंतर अढळ असे अंतरीं,
भंग त्या नाहीं कालांतरीं ! ॥ १ ॥
किंवा गंगा यमुना दोघी भगिनी या सुंदर
शोभती वाटे धरणीवर.
गौरवर्ण ती गंगा विलसे, यमुना ती श्यामल,
शोभते जोडी ही निर्मल.
सुर—सरितेचा प्रवाह कैसा शांत मंद हा दिसे !

चिन्ह हें वयस्कतेचें असे !
परि सूर्य–कन्यका दुडुदुडु ही धांवते,
निज–चांचल्यानें बालिशता दाविते,
झणिं बाळपणींचें चिन्ह असे स्पष्ट तें.
भिन्नवृत्ति या पूर्ण, तरी तत्प्रेम अकृत्रिम असें,
यांतलें मर्म कळावें कसें ? ।। २ ।।
सरस्वतीही लाजत मुरडत चाले दोघींमधीं,
त्यामुळें स्पष्ट दिसे ना कधीं !
मर्यादा ती सलज्जता ती तिची अशी पाहुनी
गमे ही मज सासुरवासिनी !
गंगा यमुना दोघी नणंदा निर्भय त्या चालती,
सभय ही जाई त्यांसंगतीं !
झणिं तिघी मिळुनियां आनंदें चालल्या;
रवि-किरणांचे सित शालू या नेसल्या;
मत्स्य–कच्छादि या अलंकार लेइल्या;
रम्य अशा या जल–देवींना करितें मी वंदन,
जाहलें तन्मय माझें मन ! ।। ३ ।।

---

## २. कृष्ण–प्रबोधन.

( चाल—आर्या तीच असे पदाची दासी. )

प्रभात झाली, चंद्र पळाला, अरुणोदय गगनोदरीं !
म्हणे यशोदा उशीर झाला, ऊठ झडकरी तूं हरी ।। धृ० ।।
किलबिल किलबिल पक्षी करिती, पवन वाहतो गारसा,
दर्शनोत्सुका होउनि गाई बघति वाट तव राजसा !
काढुं न देती धारा, लाथा मारिति त्या निजपाडसां,
बघती चाऱ्याकडे न मुळिं त्या; ऊठ तरी रे सत्वरीं ।। १ ।।
मग्न जाहले आह्निक–कर्मीं विप्र सरित्तटिं जाउनी,
होई पूजारंभ मंदिरीं; ये घंटा–रव तेथुनी;

जन गोकुळिंचे येउं लागले गाऱ्हाणीं तव घेउनी,
गोपींचा तर मेळा भरला; ऊठ तरी रे सत्वरीं ॥ २ ॥
मधु मुरलीच्या मंजु–रवा तव ऐकाया बहु उत्सुक
झाले सगळे; करिं घेउनि निज राम पातला भाविक;
राधिकाहि ही शोधित आली बघ अपुला उद्धारक;
ऊठ झडकरी वाजविं अपुली मुरली तिजसाठीं तरी ! ॥ ३ ॥
ऐकुनि झणिं हें सत्वर उठला; मुरली घेउनिया करीं
सकलपरिजना घेउनि संगें धेनू ने यमुनेतिरीं;
सप्त–स्वरिं झणिं वाजवुनी निज आनंदित सकलां करी:
प्रसंग आणुनि मनिं तो '× ×' धन्य जाहली अंतरीं ॥ ४ ॥

---

## श्रीमती सावित्रीबाई जोशी.

जन्म—शके १८१२; सन १८९० इ.

या कवयित्री नासिक येथें असतात. यांनीं केलेला पदसंग्रह बराच मोठा आहे. यांचें 'दत्तस्तवनावली' या नांवाचें पद्यात्मक पुस्तक प्रसिद्ध झालेलें आहे. यांची कविता सामाजिक, धार्मिक व पौराणिक विषयांवर आहे. 'स्त्रियांची थोरवी' व 'विधवांची दुःस्थिति' या विषयांवरील कवितांत कवयित्रीचें अन्तःकरण कळवळलेलें दिसून येतें. 'स्त्रियांच्या थोरवीं'–त तर कल्पनांचीही मौज आहे.

### १. सरस्वतीस्तवन.

( चाल—हे प्रभो विभो ! अगाध किति० )

हे सरस्वति ! त्वदीय पदिं मन रमवी ॥ ध्रु० ॥

तव कृपें ज्ञान हें होई,
जिव्हाग्रिं सदा तूं राही,

निज भक्तां आश्रय देई,
वासना अणुहि नुरवी ।। हे सरस्वति ! ।।
करि भरी बालकां वेगें,
निज हिता माउली सांगे,
अंतरीं प्रेम हें रंगे,
वासना सकल पुरवी. ।। हे सरस्वति ! ।।
स्थापिलें तुला या सदनीं,
आदरें सकल वनितांनीं,
यश वैभव वाढुत दोन्हीं
भ्रमर या मनाला बनवी ।। ` सरस्वति ! ।।

---

## २. विधवांची दुःस्थिति !

( चाल—त्याजि भक्तासाठीं लाज० )

भगिनिनों ! स्मरा प्रभुपायां, उन्नती आपुली व्हाया ।। धृ० ।।

ही रूढि मना जाचीते,
अवनती तयानें होते,
सत्वरीं धैर्य खचवीते,
परतंत्र सदा बनवीते,
हा जन्म जातसे वायां, भगिनिनों ! स्मरा प्रभुपायां ।।
नसतांचि पतीचें छत्र,
दिर जावा सासू श्वशुर,
किति शब्द बोलती क्रूर,
या परीच तें माहेर,
यइ ना कुणाला माया, भगिनिनों ! स्मरा प्रभुपायां ।।
बहु हाल होति विधवांचे,
ते किती वदावे वाचे !
ती नको नको आठवण,

करि नित्य मनाला खिन्न.
कां गुलाम बनलां वायां, भागिनिनों ! स्मरा प्रभुपायां ॥
उपकार प्रभुचे असतां
दुःस्थितीमाजिं कां फसतां ?
जग प्रपंच माना अपुला,
व्हा पात्र सदा सुयशाला.
नच भार कुणा घालूं या, भागिनिनों ! स्मरा प्रभुपायां ॥
ही विद्यामाउलि खासी,
करितसे सबल अबलांसी,
सेवावें तच्चरणांसी,
मग काय उणें सौख्यासी ?
निजहिता झटूं प्रेमें या, भागिनिनों ! स्मरा प्रभुपायां ॥
या उदरासाठीं देवा !
नच घडो कुणाचा हेवा.
आजन्म जगाची सेवा
समजुनी सुखाचा ठेवा
तनु, मना, धना अर्पूं या, भागिनिनों ! स्मरा प्रभुपायां ॥
जोडितें हस्त मी भावें,
नीतिनें अलंकृत व्हावें,
धर्माचा न घडो ऱ्हास,
ही असे मनीं मम आस.
अभिमान जाउं तो विलया, भागिनिनों ! स्मरा प्रभुपायां ॥

---

## ३. स्त्रियांची थोरवी.

### पद.

जगिं श्रेष्ठ स्त्रिया या सकलांहुनिही प्रबळा ।
ठरविल्या कुणीं या काय म्हणुनियां अबला ॥ ध्रु० ॥

तच्छ्रेष्ठपणा तो दिसतो ठायीं ठायीं ।
मानिती जनीं कां हीन तयांना, बाई ! ।।
ही रात्र झाकिते निजवसनें जगताला ।
त्यामुळें चारुता येत असे चंद्राला ।।
अति शांत असे ही वसुंधरा हिजवरती ।
गिरि बहू कालवरि आनंदें मिरवीती ।।
खेळवी पहा ! ही मायाची पुरुषाला ।
त्या निर्गुणासिही सगुण इयेनें केला ! ।।
कल्पना देइ देवपण पाषाणासीं ।
आनंद गमेना शांति न जरि हृदयासी ।।
अरि मित्र, मित्र अरि व्हाया वाणी सखि ! ही
ज्ञानबोध वार्या ग्रहणशक्ति ज्यांना नाहीं. ।।
तनु भिन्न असुनिया एकरूप व्हायासी ।
ही कारण गमते प्रीति देवता त्यासी ।।
इह भोग सकळही साधुसंत सोडीती ।
परि कष्ट सोसुनी मुक्तिलागि ते वरिती ।।
कुणि शौर्यवंत अणि ज्ञानवंत अभिमानी ।
या सकलां लोळविती रमणी निजचरणीं ।।
कुणि तद्व्रत हरण्या जातां जिवाला मुकती ।
निज नाथरक्षणीं प्राणहि त्या अर्पिती ।।
बुधवृंद कसे हे उपेक्षिती या बालां ?
गुणवती असुनियां नवल गमे मतिला. ।।
भेदुनी तमोवन ज्ञानसूर्य वरि आला ।
जाहल्या प्रकाशित श्रेष्ठ जगीं अबला ! ।।

# सौ० मनोरमाबाई रानडे, बी. ए.

जन्म

पौष कृ. ३० शके १८१७

१४ जानेवारी इ. स. १८९६

यांचें शिक्षण पुणें येथें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शाळांत व कॉलेजांत झालें. यांच्या कविता मासिक-मनोरंजन, उद्यान, इत्यादि मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. महाराष्ट्र कवि रा. श्रीधर बाळकृष्ण रानडे यांच्या या पत्नी होत. सौ० मनोरमाबाईच्या कांहीं कविता 'कुमारी द्वारकाबाई हिवरगांवकर' व 'गोपिकातनया' या नांवांनींही प्रसिद्ध झाल्या आहेत. यांची रचना प्रौढ व सुसंस्कृत, कल्पना आल्हादक व वाणी मधुर आहे.

## १. रम्य भुवन.

( वसंततिलक. )

पुष्पें अनंत फुलतात वनप्रदेशीं,
    नीलांबरीं विलसती उडुरत्नमाला;
सायंतनी सुरुचिरा शरदभ्रशोभा,
    नेत्रोत्सवाब्धिसुषमाहि तरंगलीला.
ज्योत्स्ना नितांतसुखदा सकलेंद्रियांस,
    आल्हाददायक वनीं मृदु गंधवाह.
सौंदर्यसारहि तसेंच सुरेंद्रचाप,
    डोले लतातरुतती नवनर्तनांत.
बालारुणद्युति उषःसमयीं विराजे,
    प्रेमें करी विहगवृंद सुमंजु गान.

साजे दवांबु कमलीं, कमलें तडागीं.
सारेंच रम्य खचलें भुवनांत भासे.

---

## २. संक्रांत.

( चाल—भूपती खरे ते० )

वर मधुर स्वरांचीं गोड पुटें चढवावीं,
नव वस्त्र लेउनी हास्यमुखें अर्पावीं;
परि दुसऱ्या दिनिं जन मार्ग आक्रमी पाहिला,
धात्वर्थ असो ! परि अर्थ न आतां उरला !
शर्करा खूप पेरावी वरिवरी,
निजवैररूप दडवावें अंतरीं,
ही लटकी नटवी प्रीती जगभरी,
रसनेस बोंचती शल्यें व्याजोक्तींचीं,
कुचकामी चंचल संक्रांत असे नित्याची.
क्षण मान मुरडुनी पाहिल जिकडे धरणीं
हिमखंड वितळुनी दृश्य खुले कुसुमांनीं,
कटु शिशिर संपुनी वसंत मधु नांदेल,
परि वैर आमची पाठ कधिं न सोडील.
संक्रांत रूप सृष्टीचें बदालिते,
प्रतिवत्सर पुनरपि दावी कृत्य तें,
स्थित्यंतर चिरकालाचें कुठुनि तें,
परि तेंहि असूं दे ! आपण सृष्टीमागें !
हें ढोंग पुरे ! व्हा अज्ञानांतुनि जागे !
जगिं अज्ञानाची रात्र कमी होवोनी
रवि शिक्षणकर—संजीवन दे सिंचोनी.
निःस्वार्थ मातृकर सुनीतिशिक्षापटलें
शिशुमनांत चढवी, ( ध्येयाचीं वर शल्यें. )

देईल स्फुरण हा हलवा उद्यमीं,
स्फुरवील बाहु वीराचे रक्षणीं,
भूषवील पूर्वज सारे भूषणीं,
ये पुरुषा पौरुष, स्त्रीत्व खरें महिलांत
त्या दिवशीं भारत सजीव,ती संक्रांत !

---

### ३. '—' स.

( शार्दूलविक्रीडित )

आहे येथ ' सुधा ' सुषुप्तिवश ही, निद्रिस्त सारे जन,
व्योमीं तेथ सुधाकर स्त्रवतसे धारा सुधेच्या मृदु;
कासारीं उठती तरंग मृदुल,—स्वांतीं समाधानता;
राही कां चिकटोनि खोल परि मच्चित्तीं उदासीनता !
जातें गुंतुनियां दिनीं मन जरी हें कामकाजामधें,
येतां रात्र परी उजाड सगळें ओसाड भासे जग !
सौख्याचे क्षण आठवून अपुले मागील कालांतले.
होतें आतुर दर्शनास अपुल्या, संमूढ चित्त भ्रमे !
नांवा पुस्तक घेउनी कशितरी वाचावया लागतें,
नेत्रें वाचित तेंच तेंच फिरुनी, भावार्थ ध्यानीं न ये;
जों निद्रामिष आणुनी पहुडतें पोटीं सुधे घेउनी,
तों ' नाना ' वदुनी मला बिलगली झोंपेंत ही बालिका !
आहे दुःसह हा वियोग सहणें !—साहीन कैशी तरी ! !
मुग्धाव्याज सुधेस कां परि अशी द्यावी मनोवंचना ! !

---

### ४. उत्कंठितेचें गाणें.

( चाल—घुमव घुमव एकदां० )

प्रभातकालीं मैना गीतें भारुनि वन टाकी,
गतसौख्यस्मृतिवीचि हृदयसरिं आवेगें उठती;

सांग ! कसा उत्साह धरूं मग ! दिनकर्में कसलीं ?
नाहीं जोंवर भेटणार तूं कर्तव्यें कसलीं ?
तुजविणें नको तें गायन ऐकावया । गायका ।
बघ नयनहि मिटतें रम्य नको पाहण्या । सुंदरा ।
हें विश्व बुडूं दे ! होवो भू जलमयी । जीवना ।
प्राणहीन तनु निःश्वसितांच्या संगें हीं उडुं दे ।
निकटिं पातली तव उडतां तर भरेल जग नादें.

हिरवा चांफा सुगंधवेष्टित घुमतो उद्यानीं,
नको ग बाई जाणें तिकडे, श्रवणेंही कानीं !
सुगंध फसविल भासच होइल मम हृदयेशाचा,
उत्कंठेला अंत न राहिल, पूर निराशेचा !
ये पुष्परथावर स्वारी करुनी त्वरें । शोभना ।
तूं राजा सकलहि सुमनांचा प्रभुकृपें । मृदुमना ।
उन्मत्त वायुला वश्य करी निजकरें । मोहना ।
अंधाराची फळी फोडुनी मनकवड्या सखया,
भेट लवकरी ! वाट बघूं किति कृष्ण कुटिल जगिं या !

जातिलतेवर पतंग पिंवळा प्रेमास्तव झुरतो,
बहुकाळानें वदन उघडिलें कळिकेनें, रमतो !
सदैव प्रेमें परस्परांशीं हितगुज करितांना
बघूं कशी मी शुष्कजीवना ! झुरते ही दीना !
नयनांतिल मूर्ती अश्रुबिंदूंसवें । रे सख्या ।
हृदयावर पडुं दे गाळिन तरि आंसवें । रे सख्या ।
परि मूर्तिहि हरसी तस्कर हृदयासवें । रे सख्या ।
अश्रु कोंदले, शोक दाटला, मार्ग बंद झाले,
तव भेटीनें मौक्तिक तरि कर अश्रूंचे सगळे !

इंदु झुगारी प्रसन्न शीतल रविकर नभिं सगळे,
हृदयीं शांती उचंबळोनी, प्रेमाब्धी डोले.
क्षण न लोटला, ग्रहण विधूला लागे; दुर्दैवा !
ज्योत्स्ना शीतल लोपुनि विरला तिमिरीं देखावा !
दशदिशा जाहल्या धुंद प्रलयवात हा वाहतो
हा जलधर झांकुनि नभतल भीषणरवें गर्जतो !
हा अश्रुधाराप्रपात हृदयावरी अदळतो !
सान्निध्याचे सुखकर कर तव भास्कर ! फेकोनी
अश्रुबिंदुवरि हास्य–इंद्रधनु झळकूं दे गगनीं !

---

## ५. गातच आलें मृत्यूचें गीत !

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या० )

वहात होता मंद समीरण सायंतन मधुर,
परिमल पसरी नंदनवनिंचा अवनीवर सकल.
पर्णाचें अवगुंठन सारुनि कलिका तरुवरुनी,
लज्जाकम्पित डोलत होती अनिला पाहोनी.
सृष्टीच्या इतिहासिं सुवर्णाक्षरीं लिहुनि ठेवी,
प्रेमदृश्य रवि,–कवींस रुचतें, इतरां नच बाई !
रक्तपात रणिं राज्यक्रांती महत्त्व यां येई,
सृष्टीचें मधु बोल मात्र तें विलयाला जाई !
कधीं न मानवसृष्टी--संगम जनतेला रुचला !
सृष्टिदेवि ! हा काय म्हणोनी पक्षपात घडला !
हृदयंगम वच, दिव्य प्रीती जिनें मनीं ठसती,
त्या तुज स्तवुनी कवी गातसे, रुचे हीच रीती !
असो ! कवी तो लिहीत होता कलिकावृत्तांत,
गायन कुणिसें गातहि होतें सतेज गगनांत;

त्या गानाचा सूर घुंनला कविच्या चित्तासी,
   कलिकेचें पावित्र्य गावया तार चढे मनसीं.
इतुक्यामध्यें रक्तबिंब पश्चिमदिग्भालींच,
   हाय ! नष्टलें, शोकें झालें कपोळ निष्प्रभसे !
उष्णशीत अश्रूंची युगपद्वृष्टि कमलांत,
   प्रणयगान तें गातच आलें मृत्यूचें गीत !

—०—

## ६. रूपमोहना.

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या० )

निघे जिंकण्या जग तोऱ्यानें कटाक्षपातानें,
   ध्वज पल्लव तो फडफड करितो विजयोन्मादानें.
विशाळ चंचळ निळया लोचनीं लाजविल्या हरिणी,
   कुंदकळया मनिं झुरूं लागल्या रदनां देखोनी.
गुलाब झाले अति हिरमुसले बघुनि कपोलांस,
   मिटल्या ओष्ठां बघुनि कोप ये गुलाबकलिकेस.
सौंदर्याचें क्रीडाप्रांगण रम्य निटिलभाग,
   स्नेहहीन केशांत अडविलें युवजन—अनुराग.
चांपेकळिला रडत बसविलें सरळ नासिकेनें,
   चंद्रकोर दडि देउनि बसली त्या भ्रूभंगानें.

× × × ×

रूपमोहने ! पसरुनि अद्भुत जादू नयनांची
   कोमलचित्तें बांधुनि आणिसि चरणीं तरुणांचीं.
ओंवाळुनि टाकिती किती हे जीव तुझ्यावरुन !
   आशा इच्छा अर्पिति तुजला देवी समजून !
उन्मन कवि ते रचुनी करुन साहित्यें पुजिती,
   सहवासेच्छू मनांत कोणी विरहानें झुरती.

तुझी अनन्या रती लाधण्या कितीक तरि झटती
मग्नहृदय परि करुनी अंतकपथ दाविसि अंतीं.
जनदृष्टीला दिससि मनोरम काम्यरूपमाया !
असा कोण परि जगीं असे जो जाणी तव हृदया ?
रंगीं नटते जनमन हरते नटी अभिनयांनीं !
अशीच व्हावी कीर्ति तुझी कां वद लाजिरवाणी !

---

## ७. अनुताप.

जेधवां करिसि तूं मजसह वादविवाद
मम वृत्ति वळतसे करण्या तव अनुवाद.
मीपणा लोपतो, दुर्बलता मन वरतें;
तुज विरोध करण्या मनांतही नच येतें !
मृदु भाषणौघिं वाहोनी जातसें,
स्वत्वास विसरुनी मागें येतसें,
बोलशील त्याला माना तुकवितें !
जादूचें जाळें पसरुनि माझ्यावरती
कां असा गाजविसि प्रभाव अबलेवरती !
अनुताप देतसे स्मृति आतां तेव्हांची !
का धनीण नव्हतें तेव्हां मम हृदयाची ?
मम चित्तवृत्तिचीं रम्य फुलें जीं फुलती
कां मींच टाकिलीं चुरगाळुनि तव हातीं ! !
आतां न होउं देणार मी असें,
निर्धार मनीं फिरफिरुनी करितसें
जिवास कष्ट परि फार होतसे !
डोळ्यांनीं देखिल बोलुं नको माझ्याशीं
मज विचार करुं दे स्वतंत्र मम हृदयाशीं !

---

## ८. पदसेवा.

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या० )

वसति ठायिं तव गुण परिसाचे लोहचुंबकाचे,
हर्ष पावती तुझ्या संगतीं जन ते भाग्याचे.
नकली नाणें असे न तरि कां आकर्षित होतें ?
लोह म्हणू तरि कांचन कां नच संस्पर्शें बनतें ?
पदरीं पडलें पवित्र झालें कटाक्षजलसेकें,
तार मार वा हृदय तुझें हें मागतसें इतुकें !
कुठची दानत ! कोण कशी मी कसच्या मोलाची ?
कां न च केली पुरी चौकशी अजाण बुद्धीची !
तरी अशीला अंगिकारिली सदय प्रेमानें,
गाऊं कुठवर महिमा वदनें ! मनीं मूक गाणें !
उपमातीता ! उपमाभूषण तुजला उपमर्द !
मनःपूजनीं एक मागणें ' ठेव सुसौहार्द ! '
तव हृदयाची राणी होणें कशास बहुमान !
क्षुद्रभावनावश दासीला लाभो तव चरण !
गुलामगिरि ही गोड सुखाची करण्या पदसेवा,
पतकरण्याची हिला मुभा दे, स्वर्ग निकट यावा !
प्रीतीच्या राज्यांत कायदे कसे कुठें न कळे,
होय गुन्हा तरि पदच्युता करुं नको तया वेळे !
पदसंवाहनिं मुखरविवीक्षणिं साहस जर घडलें,
बालरविभ्रम सौम्य हो गडे मजप्रत त्यावेळे !

———

## कुमारी चिंगुताई लिमये

### १. वनमाळी.

( चाल—अभिनव–मधु–लोलुप० )

वनमाळीदर्शनासि जाउं चल गडे ॥ धृ० ॥
जळतिल मग पापराशि, पुण्य बहु घडे ॥
सुंदर किति मूर्ति दिसे । मुखकमलीं स्मित विलसे ।
प्रेमभरें पाहतसे । संवगड्यांकडे ॥ १ ॥
मुरलीवरि घेत तान । सकलांचें हरित मान ।
गोवत्सें त्यजुनि पान । बघति हरिकडे ॥ २ ॥
खेळगडी घेउनियां । नानापरि खेळुनियां ।
गोधनासि चारुनियां । ये गृहाकडे ॥ ३ ॥
हरि आला भागुनियां । कुरवाळी म्हणुनि तया ।
जननी मुख चुंबुनियां । घेतसे कडे । ४ ॥
गोपींचें चित्त हरित । झाल्या त्या मानरहित ।
गृहकृत्या त्यजुनि बघत । कान्हयाकडे ॥ ५ ॥
आलें मी तुजसि शरण । चुकवी हरि जन्ममरण
उघडुनियां कमलनयन । पाहिं मजकडे ॥ ६ ॥

## श्रीमती कृष्णाबाई पाटील.

जन्म—इ. स. १८८५, मृत्यु—इ. स. १९२१.

कवयित्रींच्या वडिलांचें नांव रा. माधवराव ठाकरे. कृष्णाबाईचें शिक्षण मराठी तिसऱ्या इयत्तेपर्यंत झालें. यांना लहानपणापासून साधुसंतांचे

ग्रंथ वाचण्याची व कथा-कीर्तनें ऐकण्याची आवड होती. वयाच्या पंधराव्या वर्षांपासून या कविता करूं लागल्या. आष्टी येथील रा० रा० परशुराम नरहर पाटील यांजबरोबर यांचा विवाह झाला. इ. स. १९०० सालीं यांच्यावर वैधव्याचा प्रसंग ओढवला! त्यानंतर त्या आपल्या वडिलांकडे राहूं लागल्या. त्यांनीं आपली सर्व कविता वडिलांच्या घरीं असतांना रचिली. 'स्त्रियांकरितां पदें' हें त्यांनीं रचिलेलें पुस्तक लवकरच प्रसिद्ध होणार आहे असें समजतें. या गेल्या आक्टोबरांत निवर्तल्या. यांची कविता प्रसन्न व मधुर आहे. ही गोष्ट खालीं दिलेल्या त्यांच्या पदांवरून रसिक वाचकांच्या लक्षांत येईल.

## १. चहाची चहा.

(चाल—उद्धवा शांतवन कर जा०)

मोहिलें चहाच्या पायीं, मन वेडें झालें बाई ! ॥ धृ० ॥
निद्रेंतुनि जागृत होतां, चित्तांत चहा ये प्रथम ।
करचरण चहाविण कांहीं उठति ना कराया काम ।
रसनेसी प्रिय बहु झालें, हें दोन-अक्षरी नाम ।
चित्तास करी संतुष्ट,
देहाचे हरि तो कष्ट,
भूलोकीं अमृत श्रेष्ठ,
या वरिष्ठ दुसरें काई ? मोहिलें० ॥ १ ॥
कवणाचे आले व्याही, कवणाचे आले स्नेही ।
प्रथम या चहाची घाई, कुशलोत्तर पुसणें नाहीं ।
जरि नको म्हणे रसना ही, परि मोह सुटेना कांहीं ।
तो एक चहाचा पेला,
दृढ करितो मित्रत्वाला,
अनुभव हा बहुतेकांला,
लटिकें मी न वदें कांहीं, । मोहिलें० ॥ १ ॥

मैत्रिणी बसाया येती, जरि चहा न केला पुढती,
घरिं जाऊनि बडबडती, स्नेहादर लटिका गणिती,
'अशि साकर किनिशी सरती, रीति तिला न कळे,' वदती,
मी केवळ वदलें स्पष्ट,
जरि कोणी होतिल रुष्ट
मी त्यांसि कराया तुष्ट
हा घोंट चहाचा देई ! ॥ मोहिलें० ॥ ३ ॥

---

## २. मैनावतीचा उपदेश.

( चाल—तूं टाक चिरुनि ही मान० )

नरतनु व्यर्थ जाणार, काळ खाणार, रे मुला,
सांग तूं मला, आपुलें स्वहित कधीं करणार ?
चाऱ्याशि लक्ष हे फेरे, फिरतां श्रम झाले बा रे ! आतां तरि सावध हो रे
गुरुराय करुनि घे साह्य, तयाविण सोय कोण करणार ?
सुंदर ही मानवकाया, स्टेशन बघ आलें सखया, श्रद्धेचें धन घेउनियां,
हरिभक्त टिकिट घे त्वरित पहा हे सहा चोर अनिवार !
बहुपरिच्या देखुनि सोई, रमशील जरी या ठायीं, वेड्या मग होइल घाई,
दंडील शिपाई काळ तुला ती वेळ कठिण येणार !
सद्गुरुकृपेची गाडी, सत्स्वरूपिं नेउनि सोडी, घे सर्व सुकृत गांठोडी,
हे भोग त्यजुनि घे जोग असा नच योग पुन्हां येणार,
गुरु कोण मज दावी, जो जन्ममरण हें चुकवी, श्रीजालंदर गोसावी,
धरि चरण, जाय त्या शरण, तयाविण मरण, कसें चुकणार ?

---

## ३. कथेचें वेड.

( चाल—असा धरि छंद० )

लागलें वेड, परिसोनि हरिकथा गोड ॥ धृ० ॥

सात वाजले हें ऐकोनी काम न धंदा दिसतो नयनीं,
कैचें भोजन रुचतें सदनीं, लागली ओढ ।।
रुचती न दुज्या कांहीं गोष्टी, काढाया न सुचे उष्टीं,
कीर्तन दिसूं लागलें दृष्टी, काय करूं तोड ? ।।
कोणी किति केला उपहास, नच येई तो ऐकायास,
काय करावें या चित्तास, धरीना मीड ।।
ऐसा नाद लागला जीवा, म्हणतिल वाइट किंवा बरवा ।
चित्तवृत्ति ही धरिना पर्वा, परि पुरे कोड ।।
परिस विनंती हें प्रभुराया, जोंवरि आहे मानवकाया
देइ तंवरि तव गुण ऐकाया, दुजि नको जोड ।।

--०--

क्र. क्र. 2936

## ४. खानदेशाचा विठोबा.

( चाल—लोभ हरीचा लटका० )

पांडुरंग मज दिसला, गे बाई ! पांडुरंग मज दिसला ! ।। ध्रु० ।।

राइरखुमाई घेउनि संगें, अंजानिच्या तटिं बसला, गे बाई ।।
पंढरपुरच्या भक्तजनांवरि, काय म्हणवुनी रुसला ? ।। गे बाई ! ।।
दहिं दुध लोणी विपुळचि येथें, ऐकुनि व्यर्थचि फसला ! ।। गे बाई ।।
नैवेद्याचा थाट विलोकुनि, मौन धरुनि मनिं हंसला ।। गे बाई ! ।।
भक्त कधीं मज नेतिल म्हणुनी, वाट बघत जणुं बसला ! ।।गे बाई!।।
सुमनहार जर नित्य मिळेना, मुक्तहार मग कसला ।। गे बाई ! ।।
बहुप्रयत्नें नयनिं दिसेना, प्रेमभाव जरि नसला ।। गे बाई ! ।।
मुकुटकुंडलारहित प्रभु हा, ‘ कृष्णे ’ च्या मनिं ठसला ! ।।गे बाई !।।

---

## ५. द्रौपदीचा धांवा.

( चाल— खरें बाणलें० झंपा. )

मला पाव गा ! केशवा ! केशिहनना !
द्वारकावासि आनंदसदना ! ॥ धृ० ॥ मला० ॥

धर्मनृपती खरा, कपट नेणे जरा,
नाडियेला पुरा दुर्जनांनीं ॥
द्यूत आरंभिलें, राज्यही हरविलें,
लाविलें पाणि भल्या बांधवांना ॥ मला० ॥
मी जरी ऋतुमती अंधसुत दुर्मती
ओढुनी मजप्रती नेइ बापा ! ॥
केश धरिले खळें, मज सभे आणिलें,
मौनची मानलें गुरुजनाला ॥ मला० ॥
कुरुकुलाधम जरी ओढि माझी निरी ।
नेणसी, अंतरीं सांग कैसें ?
कुरुसभे-भीतरीं लाज गेली जरी ।
तुजसि कैसी हरी दावुं वदना ? ॥ मला० ॥
नंदकुलनंदना, गोपिकारंजना,
शत्रुमदभंजना, धांव आतां ॥
श्रीपते माउली, बहिण तव गांजली,
नीज कां आलि तुज शेषशयना ! ॥ मला० ॥
येइ गा ! यादवा, येइ गा माधवा !
येइ गा करुणार्णवा, देवराया !
भक्तवर रक्षिले, गजवरा तारिलें,
ब्रीद जव गाजलें, दैत्यकदना !
यदुपते, प्रभुवरा, मावरा, मुरहरा,
शार्ङ्गपाणे, परा, बंधुराया ।

राधिकाप्रियकरा, धांव सर्वेश्वरा !
    श्यामला सुंदरा कुंदरदना !
गहिवरे द्रौपदी, वाट पाहूं किती
    धांव कमलापती, कमलनेत्रा ।
विनति ऐशापरी, परिसुनी अंतरीं ।
    प्रगटुनी श्रीहरी पुरवि वसनां. ॥

## सौ० राधाबाई फाटक.

या कवयित्री हल्लीं अहमदनगर जिल्ह्यांत नेवासें येथें आहेत. त्यांचे पति रा. सा. बाळकृष्ण गोविंद फाटक हे तेथें मुनसफ आहेत. सौ० राधाबाईची कविता परमार्थपर आहे. रचना सहज, सरळ, सुगम व गोड आहे.

### १. ब्रह्मपदाचा ध्यास.

( चाल—राम स्मरावा राम सदोदित )

ब्रह्मपदाचा ध्यास. धरि मना ब्रह्मपदाचा ध्यास ॥ ध्रु० ॥
माया ममता मिथ्या जाणुनि, सोडि भवाची आस ॥ धरि० ॥
काममदादिक षड्रिपु वैरी गांजितील देहास,
    तुझ्या ते, गांजितील देहास;
घडि पळ जातें आयुष्यहि तें उघडि अतां नेत्रांस ॥ धरि० ॥
पुत्र कलत्राहि मित्रहि लटके व पुसे कोणि कुणास !
    अंतिं रे ! न पुसे कोणि कुणास
सावध होई त्वरिताचि कंठीं पडे यमाचा पाश ॥ धरि० ॥
माया मोहें भुलुनी जाशी पोशिसील सर्वांस,

मना रे ! पोशिसील सर्वांस.
परि नच होई सार्थक, करिशी आत्महिताचा नाश ॥ धरि० ॥
नियम पाळणें कठिणचि मोठें, नच बघणें शास्त्रास,
नच बघणें शास्त्रास;
अखिल सृष्टिचा विचार करितां भूल पडे चित्तास ॥ धरि० ॥
या कलिमार्जी यमदरबारीं रितें स्थल न कोणास,
रितें स्थळ न कोणास,
ओसचि पडलें ब्रह्म सदन तें जाउनि पाहि तयास ॥ धरि० ॥

---

## २. तारूं.

( चाल–श्रीमंत पतीची राणी )

पोंचवीं पैलतीराला, राधिका वदे सद्गुरुला ॥ धृ० ॥

भवसागर भरला पाहीं, तारुं मीं सोडिलें डोहीं ।
चौफेर नीर हें वाही, शांतता मनाला नाहीं ।
तव नाम नाव ही मातें, मन शीड जोडिलें त्यातें ।
आवरी तया शीडाला, प्रार्थितें सदा मी तुजला ॥ पोंचवी० ॥

हा मोह भयंकर मोठा, षड्रिपू उसळती लाटा ।
जाचितो मनाचा कांटा, हा मार्ग बिकट बहु खोटा ।
तळमळे जेविं कीं मीन, वरिवरी येति मत्प्राण ।
झणिं धांवत येइ दयाळा ! देइ हस्त तव कन्येला ॥ पोंचवी० ॥
बा धांव धांव गुरुनाथा, नच अंत पाहणें ताता ।
हें तारूं बुडतें आतां, तुजविणें अन्य न त्राता ।
बाहतें निशिदनीं तुजसी, कथियलें सर्व दुःखांसी ।
अनसूया-साध्वी-बाला ! ये बघुनि भक्त-प्रेमाला ॥ पोंचवी० ॥

---

### ३. सद्गुरूचा धांवा.

( चाल—वंदुनी तिला भजा कामधेनुला० )

येइ लवकरी, प्रभो, येइ लवकरी,
गति नसे बरी, प्रभो, येइ लवकरी ॥ ध्रु० ॥

संसारामधिं चित्त नसे, संतसाधुची-भेट नसे ।
मजसी मायाभूत कसें, ओढितें तरी ॥ प्रभो० ॥
ती यमनगरी दूर नसे, सर्व या देहांत वसे,
नरकभीतरीं पचत असे, वीट ना तरी ॥ प्रभो० ॥
धांवा मी करित असें, त्याचें तुजसी कांहिं नसे ।
निद्रा कैसी लागलिसे, तुजासि रे हरी ! ॥ प्रभो० ॥
तुझे प्रिय जनीं अनेक भक्त, मोकलिशी मजलागी फक्त ।
सांगतसें करुनि व्यक्त, भीड ना धरीं ॥ प्रभो० ॥
तूंचि पिता तूंचि माय । मोकलुनी करिसि काय ।
कधिं न सोडिं तव हे पाय, ताडिसी जरी ॥ प्रभो० ॥
करुणासागर तुजला वदती, यास्तव येई काकुळती.
निजहृदयीं ' राधे '—प्रती, ठाव दे तरी ॥ प्रभो० ॥

---

## श्रीमती वेणुबाई दाणी.

### १. सुखाची कल्पना.

जन्म कशाला हो मजला
ईशें न कळे हा दिधला;
तारा जरि मी नाभिं होतें
जग तेथुनियां तरि बघतें;

चमू चमू करुनी तमःपटीं
स्थिर मनुजांच्या मनःपटीं,
जन्म सुखाचा, तो गमतीचा, त्या तान्यांचा,
येतां जरि तें मला किती
होतें सुख त्या नसे मिती !
जन्म सुमांचा जरि येता
सुख होतें उद्यानीं फुलतां;
स्थान प्रीतिचें मनुजांच्या
होतें मग मी सुजनांच्या,
प्रभुचरणांवरि मी जातें,
रमणीकचपाशीं बसतें;
चिन्ह प्रीतिचें, मी गमतीचें, युवयुवतींचें,
होउनि वसतें या भुवनीं
मौज सुमांची किती जनीं.
निर्झर जरि झालें असतें
म्हटलीं असतीं मधुगीतें;
धांवत हांसत गाऊनी
उड्या किती तरि घेऊनी
जन—नयनांला सुखवीतें
काव्यीं गुंफुनि मी वसतें.
झुळू झुळू तो, वाहत जातो, जनां सुखवितो,
निर्झर जगतीं सुखी असे,
उपमा त्यातें कुठें नसे.
तरू जरी झालें असतें
आश्रय कितिकांना होतें;
छाया श्रांत जनांस तरी
होती माझी किती बरी;
फळां—फुलांनीं मोदभरें

स्वागत त्यांचें करितें रे !
विहंगमांनीं, आनंदानीं, म्हटलीं गाणीं,
तरूवरी त्या बैसुनियां
सार्थक होतें जगूनियां.
मधुर नाम किति कोकिल तें
मिळतें तरि सुखि मी होतें;
फुललेल्या आम्रावरतें
गात पंचमीं मी बसतें;
वसंत-सख मी होउनियां
तत्संगाने राहुनियां
ताना घेतें, सुंदर गीतें, किति तरि गातें,
परि आतां तें सौख्य नसे,
हुरहुर रात्रंदिन भासे
विहंग-जन्मा मी घेतें
सौख्य किती मज तयिं होतें!
प्रात:समयीं सूर्याचें
स्वागत करितें मौजेचें.
वृक्षकोटरीं मी बसतें,
उंच भराऱ्या नभिं घेतें.
बहू उंच मी, जाउनि व्योमीं, विश्वस्वामी
कोण असे तो कुठें वसे
बघण्या जातें मोदरसें !
जन्म भ्रमरा ! तव नामी
येता तरि सुखि होतें मी;
कुसुमी वसतें मौजेनें
गुङ् गुङ् गातें लीलेनें;
गंधयुक्त तो मकरंद
सेवुनि गणितें आनंद.

त्या उद्यानीं, सुमरसपानीं, गुंग होउनी,
बाह्य जगाला विसरुनियां
सुखि होतें मी याहुनियां !
त्रास असे या जगिं भारी,
सोडुनि जावें गमे दुरी !
क्रोध लोभ हे खरोखर
राज्य करीती निरंतर.
ईर्ष्या मत्सरही माजे
याचा डंका जगिं गाजे.
सोड येथुनी, त्वत्पदसेवनिं, सुख मी मानीं,
केशव हरि नारायण रे !
विनती माझी ऐक त्वरें !

---

## सौ० ‘ लक्ष्मीतनया. ’

### हंसदूत—काव्य.

( दमयंतीसंदेश. )

मंदाक्रांता.

वैदर्भाची प्रियतम सुता, नैषधाची प्रिया जी,
कौर्यें अंतःकरणिं तिजही केविं दुर्दैव गांजी ?
द्यूतीं सारें विभव पतिचें राज्यही घेइ बंधू.
पाडोनीयां व्यसनिं बुडवी सज्जना स्वार्थसाधु.
दैवाघातें पतिहुनि दुरी राहिली तातगेहीं,
साकेताच्या नरपतिपदीं सारथी नाथ होई;

वार्ताही ना कळत तिजला क्षेम वास्तव्य कोठें,
वैदर्भी ती पतिविण महाकष्टिं कालास नेते.
दुःखव्याप्ता क्षणहि युगसा घालवी संकटानें,
अर्ची ईशा, व्रत कटु करी, देत दीनांस दानें,
खाद्या पेया अवगणि सवी सौख्यभोगीं समस्त,
तों साकेतीं नृपति दिसला ऐकिलें ब्राह्मणोक्त.
उद्यानीं तों सहज पडला दृष्टिसी हंस पक्षी,
बाही त्यातें, वदत करिंच्या मुक्तहारास भक्षी.
बोले, ' बंधो ! करित तुझिया स्वागता प्रेमभावें !
नाथालागीं कुशल पुसुनी शोध घेऊन यावें.
श्वेतांगातें तव बघुनियां मानसांतील वृत्ति
आहे वाटे धवलचरिता; एक माझी विनंति.
जा वेगें ये, प्रियपति सुखी सांग आहेत ऐसें,
शोकार्ता ही विरहिणि तुझा मार्ग लक्षीत बैसे.
स्नेहौदार्यें युत तव पदीं ठेवुनी आज भावा
संदेशार्था तुजसि कथितें जाणुनी सुस्वभावा.
थोरांपाशीं विफल बरवें याचकीं इच्छिलें तें;
जावें क्षुद्राजवळ न कधीं कोणि मागावयातें.
मार्गीं तूतें बहुत असती वृक्ष बैसावयास,
श्रांता ! तेथें मग पळभरी हिंड तूं आसपास;
आहारा ये खगगण तया आपुले मित्र जोडीं,
भक्षीं नाना सुमधुर फळें घेइं विश्रांति थोडी.
तूतें सौख्या वितरिल पथीं चालतां वात मंद,
तैसा, हंसा ! रमविल तुला वल्लरीपुष्पगंध;
प्याया वारी मधुनि सरिता वाहती, हंसराया !
सारे साह्या करिति झिजवी जो परार्थी स्वकाया.
सायंकाळीं गिरिवरि सुखें घेइं निद्रा, प्रभातीं
लागें मार्गा मग पुनरपी ये नभीं जैं गभस्ती;

कार्यीं घाई, म्हणुनि न कधीं विश्रमावीण जाई;
प्रार्थीं, बंधो ! सकरुण तुला, याकडे लक्ष देई.
नाना वल्ली फलभरनता सिद्ध या स्वागतार्थ,
तूतें हर्षें सुरुचिर फला अर्पितील क्षुधार्थ;
बंधो ! तेथें किमपि न परी गुंग होऊन जावें,
मत्कार्याचें स्मरण हृदयीं सर्वदा बा असावें !
क्रीडोद्यानीं रमणरमणी कोकिला कांतसंगें,
तूंही त्यांना बघुनि शिणसी त्वत्प्रियेच्या वियोगें;
आहे येथें विरहि भगिनी दुःखिता ही त्वदीय
तूतें, बंधो ! मग सुख कसें भोगणें योग्य होय ?
कोणी जातां विकल विरहें देखसी दीन आर्त,
वृत्ता तीच्या कळविं पतिला होउनी शांतचित्त.
तेथें गेला जरि तव, सख्या ! काळ थोडा तरी ही--
मत्क्षोभासी तव कृति कधीं पात्र होणार नाहीं !
चालोनीयां पथ, खगवरा ! तूं अयोध्येस जातां,
अश्वागारीं बघसिल झणीं माझिया प्राणनाथा;
गेलें सिंहासन नृपतिचें, दुर्दशाग्रस्त होय;
कार्यालागीं श्रमति नमिले जे नृपानींहि पाय !
भक्षी कर्कोटक, तनु दिसे गौर ती कृष्णवर्ण,
पाहीं रूपा म्हणुनि निरखीं नासिका नेत्र कर्ण !
चित्तीं शांती, वदनिं विलसे सुप्रभा मूर्तिमंत;
दृष्टी येई पुनरपि कधीं ना कळे भाग्यवंत !
मंत्रोच्चारें त्वरित सदनीं लागती दीप सर्व,
पक्षींद्राचा निषधपति तो हारवी वेगगर्व,
होई अग्नीविण सकलही पाकसिद्धी तयाची;--
घे ध्यानीं हीं तुजसि, कथितें लक्षणें राजयाचीं.
सांगें आतां तुजसि विहगा ! आणखी एक खूण,
या योगें तो तुजसि नृपती ओळखे खास जाण;

' त्यागी भार्या विजन विपिनीं नैषधावीण कोण ? '
बोले ऐसें क्षणभरि; पुढें बैस घेऊन मौन.
नेत्रीं अश्रु स्त्रवनिल तदा, जाण तो नाथ माझा;
झाली कष्ट कृश तनु असा ओळखीं तोच राजा !
सेवेलागीं परिजनशतें वेष्टिती ज्या सदैव,
सेवा भाळीं लिहित अजि कां भूवरा त्या कुदैव !
इंद्रातेंही करुनि समरीं विक्रमा लाजवालें
सर्वप्रांतीं अजित नळ घे सार्वभौमत्व कालें.
वृत्ती साधी, रत जनहितीं, सर्वदा लोकपाळ;
प्रेमें केले वश पुरजनां, दुर्जना मात्र काळ.
आतां भृत्यां मुकुनि कपटें वित्त राज्यासनास
जाई कांतेसह विजनिं तो एकटा जीवितेश;
शौर्यें धैर्यें प्रमुख, असुनी सर्वथा दीप्तिमंत,
हा हा दैवा ! तरि तुजपुढें वाकला बुद्धिमंत !
कीर्ती गाती कवि, खग तिथें जाहले भाट आजी,
वारा घाली हलवुनि अतां पल्लवां वृक्षराजी,
गाई गीता मधु मृदुरवें कोकिला रंजनास,
सन्मार्गा जो जन अनुसरे ईश रक्षी तयास.
पाहीं ऐसा नळ नृपति तो वर्ततो राजगेहीं—
बंधो ! त्यातें कथिं गुज, तुला सांगतें, फार नाहीं,
बैसें स्कंधीं हळुच सखया सांगण्या हें तदीय:
सांगें त्यातें विशद सकला दुःस्थिती ही मदीय.
घालीं कानीं मम पुढिल ह्या दीन शब्दांस चार,
होई तेणें ऋणि भगिनि ही, हंसराया ! अपार;
मोठें पुण्य प्रकट वसतें दंपतीमेलनांत—
शास्त्रग्रंथीं लिहिति बुध तें नित्य ठेवीं मनांत.
" हस्तीं माझ्या अमित घडले थोर अन्याय, नाथा !
पोटीं घालीं, सदय नृपते ! नेइं सेवेस कांता !

क्षोभा कैसी तव सहचरी पात्र होई, कृपाळा !
पुष्पासंगें गुण न मळतां गंध लागे तयाला.
दीनार्ता हा तृषित हरिणी दर्शनावीण झाली,
चेतोभृंगी चरणकमळीं, नाथ ही रुंजि घाली;
कैसें, कांता ! अदयहृदयें लोटिलें दूर ईतें ?
त्यागी लोणी कधिं तरि मृदुत्वास ऐसें न होतें.
झाला आहे असह बहु हा आपणांही वियोग;
जाणें हें मी प्रभुसि न चुके भोगिल्यावीण भोग.
होई आतां कधिं नच कळे पूर्ण हें नष्टचर्य,
केव्हां देखें वदनरवि तो आपुला भूपवर्य !
शय्या हस्तें रचुनि निजती, नीज येईल कैसी ?
नाहीं सेवेस्तव जवळ, ही नैषधा ! दीन दासी !
होती पात्रीं अमित मधु ते, प्राणनाथा ! पदार्थ;
आतां देई कवण करुनी पाकसिद्धि क्षुधार्थ ?
चित्तीं घ्यावें मृदु शिशुमुखा, आठवा गोड बोला,
होती सारे मम अधगिरी क्षम्य तेव्हां, दयाळा !
यावें प्रेमें, तनयाहि तशी पाहते वाट बाला;
घ्यावें सौख्या ममहि हृदया दुःखिता अंगनेला ! "

* * *

वृत्तार्था या कथुनि तिथुनी शीघ्र हंसा ! निघें तूं,
येई वेगें कुशल कळवीं मानसीं हाच हेतू;
प्रार्थी ईशा सुखद पथ हा तुजला व्हावयास !
देवो मार्गीं बळ अमित तो जावयातें सुरेश ! !

# सौ० शारदाबाई परांजपे.

वऱ्हाडांत अकोला येथील वकील रा. मोरो बाळकृष्ण परांजपे यांच्या या पत्नी होत. यांचें शिक्षण बहुतेक घरींच झालें आहे. जुन्या संत कवींचें, विशेषत: समर्थांच्या ग्रंथांचें, यांनीं उत्तम परिशीलन केलें आहे, असें समजतें. इतर जुने व नवे मराठी कवि यांनीं वाचले आहेत. समर्थांच्या दासबोधाचा सारांश यांनीं भुजंग-प्रयातच्छंदांत मराठींत तयार केला आहे. यानीं रचिलेली स्फुट कविता पुष्कळ आहे. तिच्या पैकीं कांहीं विविधज्ञानविस्तार, मनोरंजन इत्यादि मासिकांत प्रसिद्ध झाली आहे. या कवयित्री थोड्या वेळांत वाटेल त्या विषयावर व वाटेल त्या छंदांत सहज कविता रचतात. यांची कविता सुबोध, गोड व प्रेमळ आहे.

## १. कृष्णजन्मरहस्य.

( पृथ्वी )

जळीं स्थळिं दिसे प्रभू नयनिं कृष्ण कंसा सदा;
 प्रमोद बहु होय त्या, अवतरे अरी तो यदा,
अनादि विभु पातला जरठबंदिशाळागृहीं,
 गमे हरिस तैं मिळे सुखद योग्यसें क्षेत्रही.
अधर्म कलि मातला, सबल रूढि ही जाहली,
 नुरे सुकृति नीति वा, समुळ उन्नती खुंटली.
स्वधर्म परिपाळुनी सुपथ दाखवावा जनीं
 म्हणोनि शिव येतसे जगति जीव तैं होउनी.
चतुर्भुज सुलक्षणी बहु पुढें उभा पाहतां,
 सुखोदधिंत पोहुनी जननि भोगि एकात्मता;

क्षणांत परि तो हरी रुचिर बालरूपा धरी,
सतृष्ण-हृदयें तया निरखि माय डोळेभरी.
पडे विकळ देवकी स्मरुनि कंस-कर्मे परी
म्हणे पतिस, "बाळ हें लपवितां नये स्वोदरीं !
कसें करुनि वांचवा तनय एवढा हा तरी !
न कंस वधि यास तों कुणिकडेहि ठेवा दुरी !"
पुशी पदरिं नेत्र ती, गंहिवरे, धरी त्या उरीं,
करी हृदय वज्रसें, तनय देइ नाथा-करीं,
पिता जड पदें निघे, वचहि बोलवेना तया;
असंग नर तो खरा, द्रव न पुत्रशोकें जया.
अपार यमुना भरे, वरुनि मेघही वर्षती,
जलीं हरि-पिता शिरे, तरि न चालवे त्याप्रती;
दुभंग परि होउनी तटिनि मार्ग देई तया;
घडे सुजन-संग जैं कुमतिगर्व जाई लया.
भयार्त वसुदेव तो लपत नंदगेहीं चढे,
तयें निराखिली तदा नवसुता यशोदेपुढें;
हरीस मग ठेवि तो, उचलि योग-मायेप्रती;
वसेल हरि त्या स्थलीं कधिं न सांपडे माव ती.
चिरंतन परेश तो प्रकट जाहला गोकुलीं;
व्रजीं सकल त्यामुळें प्रबळ चेतना लाभली.
जगज्जनक त्या स्थलीं जनन घेइ इच्छागुणें.
शिशु-स्वरुपि ईश तो रडुनि शब्द 'कोऽहं' म्हणे
प्रमोद निजनंदना बघुनि होइ नंदाप्रती,
जिवाहुनि जपे सुता सतत वासना-माय ती;
दुरी न करि, वाढवी स्वकरिं ती तया घेउनी,
शुचित्व-गुटि पाजि ती सजवि त्यास दिव्यांजनीं—
सदाचरण-तीट ती तनयभालिं लावी करें,
तदीय तनु झांकिते विमल पुत्र मायांबरें;

परोपकृति-ताइतीं हरिस भारुनी बांधि ती,
तशाच भव बंध ह्या यदुस सांखळ्या शोभती.
करी जननि कौतुका स्मरुनि जन्म-हेतू परी,
सखे करुनि गोकुलां रमवि त्यांप्रती श्रीहरी;
अकर्मदधि-गोरसां पचवि त्यांसवें चोरुनी,
अलिप्त-गतिनें कृती सफळ बोधि हें क्रीडनीं.
दशेंद्रिय-गणांसवें शिरुनि देह-वृंदावनीं
प्रपंच-भवऱ्याप्रती फिरवितो सदा हर्षुनी,
मनापरिस फेंकितो निज परिस्थिती-कंदुका,
स्व संचित-फळें तशीं स्वकरिं वांटि गो-बालकां.
गमे अबल तो जनां बघुनि बाह्य बालाकृती,
परी सहज खेळतां करि अतर्क्य दैवी कृती,
निराकृति अ नाम जो, जननि पुत्र मानी तया !
व्रजा स्ववश ठेवितो हरि निरोधुनी इंद्रियां.
खुडी स्व-अघ बीज तो वधुनि कोप-कामाऽसुरां,
वधी कुमति-पूतना तशिच शोषुनी तद्वरा,
विराटपुरुषा बघे हरि-मुखीं जई जन्मदा,
प्रभुस्वरुप बाल्य हें जणुं कथी तिला तो तदा..
वदेल हरि तें करी बनुनि पूर्ण सत्याग्रही,
परार्थ झटतो तसा अनुचरांसवें प्रत्यहीं,
पडे कु-वच-मेघ जैं करि तदा स्वकार्याविना,
हरी स्वबलवर्धनें उचलि धैर्य-गोवर्धना.
प्रसिद्ध यमुनाजलीं प्रबल जाहलासे कली,
विकार-गरलें तयें सुजन-मानसें दूषिलीं,
पिईल जल तो पडे तटिं गतासु तै होउनी,
म्हणून सजला हरी कुटिल कालिया-मर्दनीं.
अधर्म भय मानुनी करुन लोक धर्माश्रया,
म्हणून अहि हा असे, उलट तोच मोही तयां,—

भुजंग-खलता अशी बघुनि कोपला गो-पती,
म्हणे–“ करिन केधवां विगत-तेज मी त्याप्रती. ”
बसे प्रगतिरोधनीं टपुनियां कली-कालिया
रुढीस अवमानि जो, चिडुनि दंशितो हा, तया,
नियोजि मनिं देव कीं–“ म्हणुनि मर्दुनी त्याजला
करीन भय सोडुनी अमल लोक-गंगा-जला. ,’
विवेक-बल-यंत्रिं तो निज-मनस्तरी आंवरी,
अभंग मग तीप्रती षड्‌रि-छिद्र-नाशें करी,
अही-दमनिं नांव तो सु-मति नाविकां अर्पितो,
विदेहि हरि जाहला तदुपरी स्थित-प्रज्ञ तो.
बुडे जलिं हरी, पडे तटिंच वासना-माउली,
त्रुरे तदिय काज, ती निधन यास्तवें पावली,
करोनि लय वृत्तिचा प्रभु समाधि लावी जलीं,
अचेतन दशेंद्रियें म्हणुनि तेधवां जाहलीं.
हरी चरण-ताडनें फणि-मदा हरी जेधवां
अही गलित होइ तैं, त्रुरति दंत-संस्कार वा,
अनन्यगतिनें तदा शरण काल त्या येतसे,
दयार्द्र मतिनें प्रभू अभय त्याजला देतसे.
वदे प्रभु तया “ सुखें जलिं मदाश्रयें राहुनी
जनोन्नतिस साह्य हो मजसवेंच रात्रंदिनीं !
मला विसरुनी परी त्वदधिकार तूं दाविसी,
तरी मम करें असा कठिण शासना पावसी ! ”
प्रभू निज मनोबळें स्ववश काळ-वृत्ती करी,
विशुद्ध जन वारितें करुनि येइ मोदें वरी,
हरी बघुनि गोकुलीं स्व-पर-भावना लोपली,
विकल्प हरुनी व्रजा अढळ शांतता लाभली.
पदें फणिमदा हरी सगुण कर्मयोगी हरी,
स्वदेह-मुरली करीं धरुनि वाजवी सुस्वरीं,

अनंतमय होय तो, पुढतिं सत्स्वरूपा धरी,
शिवांश-मुरलीधरा मजसि आत्मबोधा करी !

---

## सौ० इंदिराबाई गोखले.

जन्म—इ० स० १८९५.

पुणें येथें 'ज्ञानचक्षु' नांवाचें पत्र होतें. त्याचे संपादक कै० वामनराव बाळकृष्ण रानडे हे प्रस्तुत कवयित्रींचे वडील होत. यांचें माहेरचें नांव 'सुशीला बाला' आहे. यांचें सासुरवाड नागपूर येथें आहे. यांचें शिक्षण यवतमाळ येथील राष्ट्रीय शाळेंत इंग्रेजी चवथ्या इयत्तेपर्यंत झालें आहे. पुढील कविता कवयित्रींनीं आपल्या परमप्रिय दिवंगत बालकास उद्देशून लिहिली आहे, हें सहज ध्यानांत येईल. ही कृति हृदयंगम आहे.

### १. 'जगिं कशासि आला होतास ?'

( चाल—दों दिवसांची तनु हे साची इ० )

सुंदर तव तें वदन स्मरतां क्षणभरिं विसरें भवत्रास,
जन्महेतु तव न कळे मज, जगिं कशासि आला होतास.
दिपवाळीचे दिन सौख्याचे पर्वणि ती आनंदाची,
त्या आनंदीं ईश घालि भर बाळा तुझिया जन्माची.
जन्मतांचि तूं तुझ्या धाकट्या काकू वाजविती थाळा,
नाद घुमे तो कर्णीं अजुनी हर्ष काय वर्णूं बाळा !
" द्वितीय सुत हा जन्मा आला, ईशा ! ठेव सुखी दोघे "
मनांत यापरि प्रार्थितसें मी, आणिक कांहीं नच मागें.
शांतिपाठ द्विज करिति; पंचमी—षष्ठी—पूजा केली ती.
अंगारे लावियले बाळा, म्हणती पीडा निवारिती.

सकल पाहती नूतन बालक, हर्ष काय वानूं त्याचा ?
 भाऊ तर बहु होय उतावीळ घ्याया बालक दशदिनिंचा.
पौत्रानिमित्तें ईशनाम मुखिं येउं वाटलें आजींना,
 म्हणुनि कौतुकें तुझ्या ठेविती ' पांडुरङ्ग ' या अभिधाना.
लहान इतुका परी घेउनी ओसरिवरि जाती काका,
 भाउ येउनी हंसवि खदखदा करुनि गुदगुल्या घेइ मुका.
आजी तुजला मांडीवरती घेउनि बोलति इतरांशीं,
 टक लावुनि तरि हुंकार देसी जणूं बोलती त्यां तुजशीं !
खेळायाला तुजसि कडेचा ठेवितांचि खालीं बाळा !
 वळसि पालथा चटकन् कौतुक आठवुं किति तें वेल्हाळा !
मातुलसदनीं सुंदर नयनीं सकलमनें वेधविलींस,
 घ्यायासी तुज, गोड बालका ! सकळां वाटे उल्हास.
निर्कोप प्रकृती बाळा ! तव ती सदा वदनिं तव मधु हास,
 परी कुठुनि कीं खरुज उद्भवे लागे तुझिया पाठीस !
त्या दुष्टेनें किति तुज छळिलें सकल सोशिला त्वां त्रास.
 यासाठिंच कीं काय चिमुकल्या जन्मा आला होतास ?
दुःख सोशिलें किति तें बाळा ! छळितां तुजला रोगांनीं,
 रुदन परी ना ठावें, पहुडसि पाळण्यांत तूं दिनरजनीं.
कधीं कौतुकें झोंपाळ्यावरि घेउनि बसति अत्याबाई,
 नानापरिचीं म्हणती गाणीं कीं लागो तुज अंगाई !
मांडीवरती घेउनि काका भजन करिति श्रीरंगाचें.
 भाऊ ' बचव्या, बचव्या, ' करुनी कवळुनि तुज हृदयीं नाचे.
खरूज गेली; ग्रंथि राहिल्या ! त्यांस कापणें भाग पडे,
 हाय करिसि आरंभ शिकविण्या, नशिबा ! अपुले कठिण धडे.
बहु कौशल्यें ग्रंथि कापिल्या, जखमहि भरली किती त्वरें,
 सोसायाची शक्ति सोनुल्या ! परि तुजमध्यें लेश नुरे.
अशक्त किति झालासि कापितां किती दिससि केविलवाणा !
 सोसण्यासि हें, हाय ! शक्ति परि माझी देतां येईना.

अथवा येतीं सकलहि दुखणीं बाळावरचीं मजासि जरी,
निदान गांठी त्या जरि येत्या, बाळ वांचता खास तरी !
हाय ! कापितां ग्रंथि सकल त्या बाळा—अंगीं ताप भरे !
नशिबचि अपुलें फिरे तिथें ते करितिल डॉक्टर काय ' खरे '?
पक्वबिंबसम रक्त अधर तव आलि तयासी पांडुरता,
गोंडस देहा तुझ्या चिमुकल्या येई, बाळा ! किति कृशता.
परि त्यायोगें सरल नासिका दिसे तुझी ती अधिक बरी,
विशाल शोभे भाल, चकाकति वरी केश शिरिं सोनेरी.
नयन मनोहर हिरे लकाकति, पाहसि त्यांहीं चहूंकडे,
बसतां जवळीं खुणाविसि घ्याया, आठवतां तें येइ रडें.
कोलन—वॉटरची घडि मस्तकिं सतत ज्वर उतरायाला,
नुतरे परि तो उलट खोकला होय तयाच्या जोडीला !
सतत शेकितां छाति पाठ तव तळमळसी जैसा मासा,
होसि पालथा उलथा बाळा ! परी सोडिना मज आशा !
किती शेकिलें, तेंहि सोसिलें, विफल सकल परि तें होय.
त्या कासाचा एकचि ठसका करि तव शेवट ना ? हाय !
तरिहि पाहसी काय मजकडे अपुल्या उघड्या नयनानीं !
जणों विचारिसि, ' हा बघ कैसा जातों तुजपासुनि पळुनी ? '
नकळत माझ्या मांडीवरुनी कसा चिमकुल्या गेलास ?
खेळ लपंडावाचा असला कुणाजवळ रे शिकलास ?
हाय ! सोडुनी जासी आम्हां, उदास करिसी सकळांस,
यासाठिंच कां सांग, लाडक्या, ! जन्मा आला होतास ?
भालचंद्र सकलांसी सांगे, बाळ म्हणे ' दादा ' मजसी,
'दा—दा—दा' करुं लागासि नुकतां 'दादा' म्हणण्या नुरलासी !

———

## श्रीमती यमुनाताई नागपूरकर.

जन्म—इ. स. १८७९.

कवयित्रींचें मूळगांव कोल्हापूर. येथील रहिवासी रा. कृष्णाजी आत्माराम पाठक यांच्या ह्या कन्या होत. यांच्या मातुश्रींचें नांव सौ० राधाबाई. हीं तिघें हल्लीं कोल्हापुरास राहातात. कवयित्रींच्या पतींचें नांव नारायणराव नागपूरकर असें आहे. हे पोष्ट खात्यांत नोकरीस होते. सुमारें आठ वर्षांपूर्वीं कवयित्रींचा व यांचा वियोग झाला ! यमुताईंना तीन मुली व तीन मुलगे अशीं सहा अपत्यें आहेत. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव व कनिष्ठ कन्या हीं दोघें चांगली काव्यरचना करतात. यमुनाताईच्या सासरच्या माणसांत काव्यरचनेचा पिढीजात गुण आढळून येतो. यमुनाताई लहानपणींच कविता रचूं लागल्या. यांचे ‘ यमुनातरंग ’ या नांवाचें नवीन काव्य स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें आहे. त्यांचीं इतर स्फुट काव्यें बरींच आहेत. तींही लवकरच प्रकाशित होण्याचा संभव आहे. हल्लींच्या परिस्थितीवरही त्यांचीं कांहीं काव्यें आहेत. कवयित्रींचें सासरचें नांव ‘ सरस्वतीबाई ’ असें आहे. परंतु वरती मथळ्यावर दिलेल्या नांवानेंच त्या प्रसिद्ध आहेत. कवयित्रींची वाणी प्रेमळ व गोड आहे.

### १. अहल्या.

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या० )

पादरजानें तुझ्या अहल्या उठली रघुराया ।
शिळा भंगुनी त्यांत निघाली सुंदरिची काया ॥ ध्रु० ॥

साधुसतींना दुष्ट गांजिती, जनिं त्यांच्या अवना
धनी जगाचा स्वयें हिंडतो भुवनिं रामराणा,

परिणुनि सीता आणायास्तव राम वनीं आला,
शिळा दावुनी मुनि त्या बोले " ऐक जगत्पाला,
सहस्र वर्षे झालीं रामा, पूर्वीं या ठायां
गौतममुनिनें सती शापिली क्रोधें निज जाया.
तुझी पाहतां वाट राघवा ! शिणली ही वायां.
नको रघुवरा ! विलंब आतां सतीसि उद्धरि या.
मुनिवर गौतम जाई स्नाना; पाहुनि एकटिला
मुनिवेषानें इंद्र पातला, भ्रष्टवि तो सतिला.
इतुक्यामाजीं स्नान करोनी मुनि परतुनि आला;
दोघां शापुनि कोपें केली शिळा अहल्येला !
शरणागत त्या सुरनाथाला सोडविलें त्यानें.
परी आजवरि कष्ट साहिले सती अहल्येनें.
पदरज लावुनि रामा ! आतां उद्धरि या सतिला,
वाट पाहतां तुझी राघवा ! देह तिचा शिणला. "
प्रथम वंदुनी पदरज लावी राम सखा तिजला,
साध्वी निजकर जोडुनि नमिती झाली रामाला.
शिळा अहल्या उद्धरिली तूं शापित मुनिजाया
दीन ' यमू '-ला कष्टविशी कां कौसल्यातनया !

---

## २. अक्रूरागमन.

( चाल—राजहंस माझा निजला. )

अक्रूरा, क्रूर कां झाला ! कां नेतो श्रीकृष्णाला ॥ धृ० ॥

श्रीकृष्ण अणाया कंसें, अक्रुरा दिलें धाडून,
प्रगटलीं गोकुळीं वार्ता, कीं जातो जगजीवन,
धांवती गोपिकावृंद, मनिं होउनि फारच खिन्न,
पातल्या नंदसदनातें, बोलती, " कुठें श्रीरमण ?

कोण तुम्ही कोठुनि आला ?
कां नेतां श्रीकृष्णाला ?
हा पदर अम्हीं पसरीला !
व्याकूळ जिव हा झाला !" कां नेतां श्रीकृष्णाला ? ॥१॥
श्रीकृष्ण राम रथिं चढले, अक्रूर धुरेवरि बसला.
नंदादिक गवळी निघती, गोरसें कावडी भरिल्या.
धांवुनी यशोदा बोले, "थांब रे बाळ घननीळा !
दाटला स्तनीं रे पान्हा, मी पाजुं अतां कवणाला ?
मम दैव कसें ओढवलें ?
आजि वत्स दूर मम गेलें !
ब्रह्मांड कसें कोसळलें ?"
हंबरडा फोडुनी लोळे, गडबडा माय धरणीला ॥कां॰नेतां॰॥२॥
गोपिका करित शोकातें, हरिमायेपाशीं आल्या.
वक्षःस्थल पिटुनी हातें, आठविती हरिगुणलीला.
"साधण्या वैर पूर्वीचें, हा काळ कोठुनी आला ?
कूपांत ढकलुनी आम्हां, अजि दोर कसा काढीला ?
हे दिवस कसे कंठावे ?
हरि तुला कुठें भेटावें ?
हें दुःख किती नेटावें ?
त्यागितों अम्ही प्राणांला," कां नेतां श्रीकृष्णाला ? ॥३॥
मथुरेंत मारुनी कंसा, सोडवी जनकमातेला,
देउनी सौख्य सकलांतें, हरि बोले उद्धवजीला,
मातेस गोपिंना भेटा, जाउनिया गोकूळाला,
मम दुःखें तळमळ करिती, कळवावें कुशल तयांला.
हृदयांत वसें मी तुमच्या, शांतवी वदुनि सकलांला.
ज्ञान हें मानवें घ्यावें,
रूप तें निर्गुण घ्यावें,
हरिपदांबुजा सेवावें,
जोडिते 'यमू' करकमलाला, कां नेतां श्रीकृष्णाला ? ॥ ४ ॥

---

## ३. गुरूचा धांवा!

( मालिनी )

निशिदिनिं गुरुनाथा ! खेद चित्तासि वाटे,
मलिनतर अहंता अंतरीं, फार दाटे.
मृगजलसम मारी देइ संसार चिंता,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां !
घडि घडि छळितो हा नेणिवेचा प्रताप,
प्रगटुनि हृदयीं तूं पाजळी ज्ञान-दीप,
तुजविण जगतीं या अन्य कोणी न त्राता,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां.
करिं दृढ धरुनीया ज्ञानखड्गा सुतीक्ष्णा,
गुरुवर मज तारीं, मारिं या षड्रिपूंना;
क्षणिं हरि तव माया, वासना मारि आतां,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां.
मज बहु छळियेलें हाय ! तापत्रयानें,
भ्रम मम मति पावे आत्मरूपासि नेणे;
बुडत भवनदीचे डोहिं तूं देइ हाता,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां.
हुडकत चुकलेलें वत्स मातेसि जाणा,
मजसि जवळिं घेईं पाजवीं प्रेम-पान्हा;
तव विरह पळाचा ताप दे फार चित्ता,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां.
तुजविण मज तारी कोण ऐसा असे हो ?
गहिंवर बहु येई फोडितां नाम—टाहो.
परिसुनि गुरुराया शांतवी त्रस्त चित्ता,
झडकरि गुरुनाथा ! धांव रे धांव आतां.
बघुनि जळधरातें चातकां हर्ष वाटे,
जलनिधि अटतां हो दुःख मीनांसि मोठें.

तळमळत तशी मी त्वत्कृपेवीण ताता!
झडकरि गुरुनाथा! धांव रे धांव आतां.
मजकरिं अनुतापें टाकवीं स्वार्थबुद्धि,
दवडुनि विषयांतें वासना दुष्ट छेदीं.
मन सुचपल माझें नावरे आवरीतां.
झडकरि गुरुनाथा! धांव रे धांव आतां.
स्तवन-अमृत-पेला पाजवीं हो दयाळा!
करुनि मज सुबोधा दाखवीं राम डोळां.
मम हृदय-कपाटीं सांठवीं ज्ञान-वित्ता,
झडकरि गुरुनाथा! धांव रे धांव आतां.
विकलित मन होतें, बा! किती नाम घ्यावें,
तुज नच करुणा ये, काय आतां करावें?
करिं धरुनि 'रामू'ला दाखवीं मोक्षपंथा,
झडकरि गुरुनाथा! धांव रे धांव आतां.

---

## ४. फटका.

( साध्या चालीवर )

मृगजल तेवीं संसृति, प्राण्या! क्षणभंगुर ही आहे रे!
कांहीं थोडा स्वार्थ करोनी स्वहित आपुलें पाहीं रे!
रामपदीं रत होइ मना तूं नाम सदा मुखिं गाई रे!
षड्रिपु वैरी कठिण अंतरीं त्रास मानवा देती रे!
धन—सुत—दारा यांच्यापासुनि घडिभरिही सुख नाहीं रे!
अनंत सुकृतें नरतनु लाभे पुनरपि येणें नाहीं रे!
यांतच साधन करुनी सारें काळाला त्या रगडी रे!
आप्त सोयरे संपत्तीचे बंधु सखे ते होती रे!
अंतिं एकला जाशी तुजशी कोण सोडवी पाही रे!
षड्रिपु जिंकुनि कुसंग सोडुनि संतसमागमिं राहीं रे!

गुरुवचनामृत हृदयिं साठवी एकरूप जगिं पाही रे !
ऐक मानवा गोष्ट एवढी निसंग जगतीं राही रे !
राम नाम हें साधन सगळें ! अर्थ दुज्यामधिं नाहीं रे !
पूर्ण ब्रह्मस्वरूप रामचि केशव हें मनिं समजे रे !
रामचरणिं जोडुनिया पाणी ' यमुना ' आली शरण बरें !

---

## कुमारी दुर्गाबाई नेने.

जन्म. इ. स. १८९५.

यांनीं इ. स. १९१७ च्या जानेवारी महिन्यापर्यंत मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजामध्यें इंटरमीजिएट परीक्षेचा अभ्यास केला. ऐन परीक्षेच्यावेळीं त्यांची प्रकृति फार बिघडली, यामुळें त्यांस शिक्षणक्रम सोडून द्यावा लागला ! इ. स. १९२० सालीं नासिक येथें ' महिला-सहकारी ' या नांवाची संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या पांच चालक भगिनींपैकीं या एक आहेत. याच संस्थेच्या मार्फत ' भारतीय कन्याशाळा ' नासिक येथें निघाली आहे. तिची व्यवस्था प्रस्तुत कवयित्रींकडे आहे. प्रकृति फार कमकुवत झाल्यामुळें, काम करण्याची हौस असतांही, यांना विशेष जबाबदारीचीं व मेहनतीचीं कामें करतां येत नाहींत. सुमारें चार वर्षांमागें यांनीं काव्यरचनेला आरंभ केला. शाळेंत किंवा कॉलेजांत शिकत असतां त्यांनीं केव्हांही कविता रचली नाहीं. आलीकडे चार सहा महिन्यांनीं स्फूर्ति झाली असतां त्या थोड्याबहुत कविता करतात. यांची रचना श्लोकात्मक व पदांच्या चालीवरही आहे. या पुस्तकांत ' कमलिनीं ' च्या कविता मागें आल्या आहेत. त्या कवयित्रींपासून दुर्गाबाईना काव्यस्फूर्ति झालेली आहे. यांच्या दोन कविता खालीं दिल्या

आहेत त्यांवरून यांचा प्रेमळपणा व देशाभिमान हे गुण स्पष्ट दिसून येतात.

## १. मुरलीचा विलाप.

या कवितेचें कथानक कवयित्रींच्या कल्पनेनें निर्माण केलें आहे.

( चाल—राजहंस माझा निजला० )

बोला हो झडकरि बोला । हृदयनाथ कोठें रमला ।
कशि कुठें तयाला शोधूं । तद्विरहें जीव भ्रमला ।
सूत्रधार या प्राणाचा ।
आधार एक गोपींचा ।
हरितो जो गर्व श्रीचा ।
तो सुंदर माधव गेला । कवणें स्थळिं सांगा मजला ॥
" कां व्यर्थ भ्रमसी मोहें । अश्रुपूर नयनीं वाहे ।
आठवी तुजसि रघुवीर । अजुनिही, सोडि आशा हे ।
लाभेल सांग अजि कैचा ।
आनंदकंद गोकुळिंचा ।
प्रिय पति द्वारकापुरिचा ।
कपटी तुज टाकुनि गेला । नटनायक अवनीं सजला ॥
या काय अमंगल बोला । बोलतां ? न रुचतें मजला ।
सांगतें सत्य तुम्हांला । विश्वास न तुमच्या बोला ।
द्वारकाच कवटाळीण ।
खचित त्यासि करणी करुन ।
भुलविलें तिनें तन्मन ।
हरि माझा भोळा भोळा । लिंबलोण त्या ओंवाळा ॥
सुन्दरी कोण दुष्टा ही । मोहिलें प्रियकरा बाई ।
प्रेमौघ परतवूं कैसा । नाथाचा करुं मी काई ।
प्रिय वेणू माधव मानी ।
तूं एक जिवाची रमणी ।

ऐकिलें वच किती कानीं ।
पारे आतां कोणे ठायीं । जडलें मन समजत नाहीं ॥
बाळपणापासुनि दोघे । खेळलों खेळ ते अवघे ।
मधुसूदनपादिं मन वेधे । मन्मूर्ति तयासी सुख दे ।
श्रीहरि प्रतिदिनीं नेमें ।
ही वेणू घेउनि संगें ।
आरण्यीं निर्जनिं रागें ।
जाऊनि बैसतो पाही । मागुती संवगडे बाही ॥
कालिंदीतीरिं येउनी । ठाकला पहा कंसारी ।
मुदित होय यमुना भारी । हांसतो सुदर्शनधारी ।
ये स्थळीं बसुनि एकांतीं ।
घेई मज अंकावरती ।
वाटे मी अभिनव युवती ।
श्रीकांत-हृदय-रमणाही । पाहूनि मोहिलें मीही ॥
श्रीरंगें अनुरागानें । निजहृदयीं मजला धरिलें ।
या तनुला पुलकित केलें । तैं अधोवदन मम झालें ।
करपद्मे मज उचलीलें ।
मुखकमला सन्निध नेलें ।
प्रेमभरें चुंबन केलें ।
ओष्ठांचा संगम होई । वेडावुनि मन्मन जाई ॥
रम्यता किती पण याची । पावित्र्य शुद्धि देहाची ।
स्मरुनिया निशिदिनीं जाची । कष्टता मना विरहाची ।
पुनरपि ते दिन येतिल कां ।
द्वारकाधीश तुज हांका ।
किति मारुं इंदिराकांता ।
तुज कां न आठवण येई । सांग या दीन अबलेची ॥
मन्मुखा चुंबुनी कान्हा । काढीतो मंजुळ ताना ।
टवकारुनि आपुले काना । मृगपशू उचलिती माना ।

ते सोडुनि चारा पाणी ।
मुग्ध होति वत्सें तान्हीं ।
दिव्य ती हरीची वाणी ।
भारले काय नवलाई । तें दृश्य मजासि सुखदायी ॥

तो प्रताप या वेणूचा । कीं मुरलीधर-करणीचा ।
ओढिला चाप गानाचा । सोडिला वास प्रेमाचा ।
धन्य तो जाहला सुफळी ।
व्याघ्र धेनु एके ओळी ।
हरिण बाळ निर्भय जवळीं ।
सांडुनि भीति हिंसादी । जाहले लीन हरिपायीं ॥

हळहळति आठवुनि कैशी । अति करिति मूक रुदनासी ।
जाउनी तटिनितीरासी । तव नित्य प्रतीक्षा करिती ।
फसविसी तयांना तरि कां ।
द्वारकेसहित रमसी का ।
वाटते न चित्तीं शंका ।
कां दया न ये हृदयासी । शपथ रे सांग हृषिकेशी ॥

जमुनियां भोंवती गाती । मधुगीत गोप कीं गोपी ।
श्यामदेहिं झळके कांती । वेणुसवें अडला गोफीं ।
कीं रुणझुण नूपुर नाचे ।
टिप टिप टिप टिपरी वाजे ।
मुरमथना मुरली साजे ।
दिन धन्य असे ते चित्तीं । स्मरतां ये प्रेमा भरती ॥

तें रम्य स्वप्न कीं माझें । गतकालिन झालें नुमजे ।
मुरलीचा महिमा गाजे । जोंवरि हरि तिज प्रिय समजे ।
टाकिली अंगना रमणें ।
पुशियलें तिला कधिं कवणें ।
धिक् कष्ट ! दुस्सहाचि जगणें ।
देसी न ठाव जरि पायीं । त्यागिन तनु अप्रिय बाई ॥

जधिं कधीं भेट ती होई । मौनव्रत धरिते कांहीं ।
बहु दावियला रुसवाहीं । नाथ परी हंसवी बाई ।
हरितो मम निश्चयबळ तें ।
देखतां मन उचंबळतें ।
प्रबळही बनति दुर्बळ ते ।
नच टाकि दीन दासी ही । वाहिला जीव तव पायीं ॥
पुशियलें परोपरि श्यामा । करि कृपा प्रेमसुखधामा ।
तुज कोण मोहिते रामा । मज सांग तियेच्या नामा ।
हंसुनियां हंसविसी मजसी ।
मुग्ध मंत्र कीं भारीसी ।
प्रत्युत्तर कांहिं न देसी ।
टाकूनि नाथ ! कां जासी । अति हीन दीन अबलेसी ॥
दिन–दिनें वर्षही गेलें । परि दर्शन ना तव घडलें ।
योजुनी काय ठेवीलें । प्रेमशब्द हृदयीं विरले ।
ये अशांत तो श्रीधर ।
तन्मूर्ति पाहिली रुचिर ।
करि दृष्टि स्थिर तिजवर ।
घेउनि मज अंकावर । बोलला, बासरी प्यार ॥
वल्लभे मनीं चिंतीलें । कार्य तें आज साधीलें ।
दुःख क्लेश बहु भोगीले । तव सखये ! दुर्दिन सरले ।
वारुनियां चिंता सारी ।
लाभे मन–हंस विहारी ।
नाम ' द्वारका ' ' सुंदरी ' ।
मम अंगीं झाली लाही । जणुं तप्त तेल तें दाही ! ॥
" नच दाखवि मुख वेणूला " । कटु शब्दें ऐशा वधिला ।
हाय ! घात कैसा केला । मुरलीधर प्रभु अंतरला ।
तव पुण्य द्वारके बाई ।
श्रीकृष्ण लीन तव पायीं ।

प्रतिक्षणिं परि सावध राही ।
जाईल चुकवुनी डोळा । देउनि गे अंतर तुजला ॥
विनवणी एक चरणांसी । मुरलीची अठवण त्यासी ।
देउनी सांग कृष्णासी । निशिदिनिं ही झुरते दासी ।
दर्शन मज हरिचें होतें ।
तूं घेशिल जरि तव मनिं तें ।
मानील खचित तव वच तें ।
मागणें अधिक तुज ॱॱहीं । प्रभुचें जरि दर्शन होई ॥
देवते प्रार्थितें तुजला । एकवार धाडी हरिला ।
परत गे पाठविन त्याला । धरुं नको लवहि शंकेला ।
पाहीन मुख प्रिय हरिचें ।
हंसवीन तया मम वाचें ।
सांगेन कोड मम मनिंचे ।
एकवार चुंबन घेई । मधुरसें गीत तें गाई ॥

---

## २. स्वदेशाभिमान.

इ० स० १९१९ सालीं म० गांधींच्या वाढदिवशीं नाशिक येथें स्त्रियांच्या सभेंत म्हटलेलें हें पद आहे.

( चाल—तूं टाक चिरुनि ही मान० )

धरा हो देशाचा अभिमान, नको धनमान.
हीं हिंदमाय बहु खिन्न होय, राखाच तियेचा मान ॥ ध्रु० ॥

तुम्हि पुत्र आर्यमातेचे.
राखावें ब्रीद सतीचें,
प्रसवली हिंदुभू तीचें,
स्वातंत्र्या मिळवा झटुनि तरिच हो धन्य तुम्ही संतान ॥ ध्रु० ॥

ती स्वातंत्र्याची मोक्की,
योजुनियां समर्यीं युक्ती,
हो करा तियेची मुक्ती,
परदास्यपाश तोडुनि तियेचे, काय तुम्ही नादान ॥ धृ० ॥
हा समय मनीं जाणावा,
द्वेष मनीं नच बाणावा,
मुखिं निंदावाद नसावा,
व्हा देशकारणीं मग्न, ठेवुनी नीतिचें अवधान ॥ धृ० ॥
येतील शत्रुचे फेरे,
भुलवितिल स्वार्थ-भोंवरे,
कलहाचे उलटे वारे,
प्रतिपदीं तुम्हां वेढितिल हे, उडवा दाणादाण ॥ धृ० ॥
निर्व्यसन मित्र हा पाही,
तो सहाय कार्या होई,
रत व्हावें कार्यो-ठायीं,
बुध्दि अक्षय मिळवा शांतिसंपदा, तीच करिल कल्याण ॥ धृ ॥
व्यसनांनीं फार बुडाली,
हिंदभू दीन ही झाली,
हिजला बा कोणि न वाली,
वित्तहीन ती होत चालली, सोडा हो अज्ञान ॥ धृ० ॥
परवस्तु कीड ती शिरली,
क्षीणता तियेला आली,
ही काय तिची स्थिति झाली,
द्या ' स्वदेशि ' - काढा रामबाण तिज, अंगीं येइल त्राण ॥ धृ० ॥

## कै० सौ० लक्ष्मीबाई बेहेरे.

जन्म इ० स० १८९७. मृत्यु इ० स० १९१४.

मध्यप्रांतांतील प्रसिद्ध मराठी कवि श्रीयुत रा. नारायण केशव बेहेरे यांच्या या पत्नी. यांचीं पुढील पद्यें मनोहर आहेत.

### १. उद्यान.

( चाल—भूपती खरें तें–)

दिवस तो स्मरे मज पूर्णपणें गे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ।। धृ० ।।

तुज शोभा सांगूं तेथिल कवण्या बोलें ।
आनंदें वाटे बाग सर्व कीं डोले ।।
शोभती वृक्ष चहुं बाजू, साजिरे ।
कारंजें खुललें तेथें, गोजिरें ।
चुंबिती लता कुंजांना, मोगरे ।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ।। १ ।।
हीं सुंदर कुसुमें हास्यमुखानें बघती ।
ह्या लता तरूंना आलिंगुनियां धरिती ।।
वृक्षावरि पक्षिकुलें तीं, येउनी ।
आनंदित करिति जनांला, गाउनी ।
तीं त्यांचीं मंजुळ गीतें, ऐकुनी ।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ।। २ ।।
हा गुलाब फुलला सुंदरता बागेंत ।
बहु मोद अम्हांला मधुर सुगंधें देत ।।

हे मधुकर काळे तेथें, येउनी ।
पुष्पांतिल मधुर रसातें, प्राशुनी ।
बागडती स्वैरपणें ते पाहुनी ।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई ।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ ३ ॥

---

## २. ' ना कळे ! '

( चाल—नृपममता रामा० )

ह्या जलांत लपल्या कमला ।
मधु गंध कुणीं गे दिधला ? ॥ ना कळे ॥
नाभींत मृगाच्या राही ।
कस्तुरी कशी ती बाई ! ॥ ना कळे ॥
वेडावी कोकिल-गान ।
मधुर कंठ देई कोण ? ॥ ना कळे ॥
दावुनी कृष्ण मेघांना ।
नाचवी कोण मयुरांना ? ॥ ना कळे ॥
रवि—चंद्र अखिल हे तारे ।
निर्मिले कुणीं जग सारें ? ॥ ना कळे ॥
हा देह—मी कशी झालें ? ।
कोठुनी भूवरी आलें ? ॥ ना कळे ॥
' चालक तो देव जगाचा ' ।
परि अर्थ मला ' देवाचा ' ॥ ना कळे ॥
अज्ञान पुरी मी वेडी ! ।
सुटतील कशीं हीं कोडीं ! ॥ ना कळे ॥

---

## सौ. वेणुबाई केळकर.

### १. सायंतारा.

( चाल—थांब थांब. )

भीषण दिसली रजनी काळी ।
पांघरली ती शाल काजळी ॥
विणितसे मेघांची जाळी ।
त्या अवकाळीं एक चमकली तारा रम्य नभांत ॥ १ ॥
निशादेविच्या वेणीमधलें ।
जणों हिऱ्याचें फूल चिमुकलें ॥
कृष्णकुंतलीं हांसत बसलें ।
हास्य तयाचें गगनीं नाचे ठसलें कविहृदयांत ॥ २ ॥
सुरलोकींच्या कीं उद्यानीं ।
शोभतसे ही कलिका चिमणी ॥
सौंदर्याची मूर्त शिराणी ।
हळुं हळुं उमले वास दरवळे भरला उद्यानांत ॥ ३ ॥
काव्यदेविची विमला बाला ।
गोड तियेच्या नवनव लीला ॥
वेड लाविती रसिकजनांला ।
मृदुल करांनीं ताल धरोनी नृत्य करी गगनांत ॥ ४ ॥
भरती आली शोकसागरा ।
नैराश्याचा सुटला वारा ॥
अज्ञानाचा होय पसारा ।
हृन्नौका ती खालीं वरती करिते बघ थैमान ॥ ५ ॥
संकटलाटा गर्दी करिती ।
अंधाराचीं भुतें भोंवतीं ॥

नाचत सुटती वेड लाविती ।
तों आशेचा दीपच साचा प्रकटे क्षितिजावरती ॥ ६ ॥
कोमल किरणीं हृदय खुलविलें ।
संसारीं या स्मर आढळे ॥
धरणी स्वर्ग न दोन राहिले ।
सुस्थिर झालें मन हें रमलें आशाभरणीं सजलें ॥ ७ ॥
बहर नवा ये आशातरुला ।
हृदयोद्यानीं सडा पसरला ॥
गुंफुनि पुष्पें रचिली माला ।
ठेवुनि हृदयीं तिला प्रीतिमयिं गाणीं तिजवर गातें ॥ ८ ॥

---

## श्रीमती लक्ष्मीबाई टिळक.

जन्म इ० स० १८७०

या प. वा. नारायण वामन टिळक यांच्या पत्नी होत. पतीच्या काव्यांतल्याप्रमाणें यांच्या कृतींतही प्रसाद व प्रेम आहे.

### १. करंज्यांमध्यें मोदक कशाला ?

करंज्या केल्या म्हणजे त्यांबरोबर एक लहानसा मोदक केलाच पाहिजे; पुरणाच्या किंवा गुळाच्या पोळ्या केल्या कीं त्यांत एक कानवला आलाच; पापड झाले कीं त्यांत एक लाटी तशीच राखून ठेविलीच; ही जी हिंदु स्त्रियांची चाल आहे, तिचा अर्थ पुढें दिलेल्या कवितेंत सांगितला आहे.

पद.

( चाल—भूपती खरे ते वैभव— )

नरनारीसंगम जिकडे तिकडे पाही,
बघ वरी खालतीं ! पहा जगीं कोठेंही ॥ धृ० ॥

वर सूर्य एकला; नाहीं ! क्षणभर नाहीं !
ही प्रभा नित्य त्या आलिंगुनियां राही.
हा चंद्र एकला, नाहीं ! हाही नाहीं !
ह्यासवें चंद्रिका सदैव रमलेली ही !
सप्तर्षी हे आभाळीं, यांजला,
ही अरुंधती सांभाळी, प्रेमला,
पति बंधू यांहीं केली, निश्चला,
नभ नटलें तारा तारे ह्या उभयांहीं
जें वरतीं दिसतें तेंच दिसे खालींही ?
ह्या नद्या सागरा जाउन अवघ्या मिळती,
ह्या लता तरूंना सावरूनियां धरिती,
ह्या जीवकुडीचा योग न हो जरि झाला,
तरि प्राणी कोठुन मिळे जगीं बघण्याला ?
कवि आणि स्फूर्ती दोघे, भेटती,
परिणिली मती अनुरागें, शोभती,
तेव्हांच गायनें ओघें, साधती;
नरनारीसंगम हीच संसृती बाई !
विश्वांत एकलें कुठेंच नाहीं कांहीं !
कां वदे करंजी मोदक कोठें गेला ?
कां पोळ्या म्हणती करा बघूं कानवला !
कां लाटीवांचुन पापड करि रुदनाला !
मज नको वाटतें कुणास शिकवायाला !
" किति हिंदकन्यका वेड्या ! या म्हणा, "
" ह्या किती पावल्या थोड्या, शिक्षणा "
" ह्यांकरवीं रचवी माड्या, कल्पना; "
जगीं राहूं वेड्या अशाच आम्ही बाई !
करुं वेड्या इतरां ! यांत न संशय कांहीं !

---

## २. कविसंमेलनास.

जळगांव येथें भरलेल्या कवींच्या संमेलनास कवयित्रींनीं पाठविलेला हा निरोप आहे.

### पद.

( चाल—भूपती खरें तें वैभवसुख भोगीती— )

ही काव्यतरूची छाया शीतळ भारी,
तुह्मि कवी फुलें हो ह्या तरुवरचीं सारीं ! ॥ ध्रु० ॥

तुम्हि हसतां हसती सृष्टि, सर्व नरनारीं !
तुम्हि कोमेजुन जातां जगीं खिन्नता सारी !
हा सुगंध तुमचा व्यापि दिशांना चारीं,
मग वाटे भरलें सुखच जगा माझारीं !
हे रसज्ञ मंजुळ गीतें, गाउनी,
हे तुमच्या मधुर रसातें, प्राशुनी,
हे तुमच्या भोंते भोंते हिंडुनी,
म्हणतात जगाला ह्याच फुलां माझारीं,
अम्हि जन्म घालवूं ! सौख्य हेंच संसारीं !
हें त्याच फुलांचें संमेलन हो झालें !
हा हार पाहुनी नाथ जगाचा डोले !
ह्या पुण्यसंगमा येउन असतें नमिलें,
परि दैव आडवें मज दीनेला झालें !
घ्या ! नमस्कार मम घ्या हो, मानुनी !
तरि हाच मला हो लाहो, जन्मुनी,
संबंध कवींनो राहो, ह्या जनीं,
मी बहीण, आपण भाउ सखे कैवारी !
कवि तुम्ही, भिकारिण मी तुमच्या हो दारीं !

---

### ३. लक्ष्मीनारायणसंगम !

( चाल—घोर भयंकर निर्जन विपिनीं० )

गिरिच्या शिखरा सोडुनि फों फों करित नदी धांवली,
आलिंगुनि सागरास आपण सागरता पावली. ॥ ध्रु. ॥

दो हातांनीं अडवायाला किती जणें पातलीं,
पुसे न कोणा, भिई न कोणा, नीट पुढें चालली.

खंदक गेले, धोंडे पडले, वृक्ष निमाले बळी.
पतिव्रतेचा मार्ग कशाचा अडवावा त्या खळीं.

समुद्रांत घालितां उडी ती नदीपणा विसरली.
फों फों गेलें! नर्तन गेलें! एकरूप जाहली!

माझें गाणें, माझी कविता, लोप कशीं पावलीं?
मला समजलें! लक्ष्मी लागे नारायणपावलीं!

---

## श्रीमती राधाबाई केळकर.

जन्म इ. स. १८५७.

कै. दामोदर गणेश केळकर, एम. ए., रत्नागिरी हायस्कुलाचे हेड-मास्तर, यांच्या या पत्नी होत. यांची काव्यरचना विशेषतः पौराणिक असून विपुल आहे. तिच्यांतून खालील उतारे दिले आहेत. कवयित्री हल्लीं पुणें येथें राहतात. यांचीं गजेंद्रमोक्ष, दितिकश्यपसंवाद, हरिश्चंद्राख्यान, कात्यायनीव्रत, मामाकृष्णविनोद इत्यादि लहान-मोठीं अनेक काव्यें असून तीं अमुद्रित आहेत.

## १. कीलोत्पाटी वानर.

( गीति )

दमनक नामें कोल्हा अपुल्या भावास गोष्ट सांग म्हणे,
न करावें तें करुनी तो वानर मृत्यु पावला जेणें.
बंधु वदे 'एक वणिक् देवालय बांधितां वनामाजीं,
योजी कर्म कराया कारागिर शिल्पकार त्या काजीं.
सर्वहि मिळोनि म्हणती मध्याह्नींचा सुमार पाहोन
नगरामध्यें निजगृहिं जाउन येऊं क्षणांत जेवून.
ऐसें बोलुनि सारे तेथुनि गेले निघोनि निजसदना,
तों कळप वानरांचा आलासे फिरत फिरत त्याच वना.
तेथें पडली होती सागाची एक तुळइ चिरलेली,
अर्धी कापुनि ठेवुनि खैराची कील त्यांत बैसविली.
इतर प्लवंग धांवति सैरावैरा वनांत स्वच्छंदें,
दुर्दैवी एक कपी बसला स्तंभावरी तया प्रमदें !
तेथें बैसुनि हलवी कील करीं प्लवग जोरजोरानें
ती निघतांचि गवसला कपि त्यामधिं मूर्ख कारभारानें !
'अव्यापारांत' असें पूर्वीं जें तुज निवेदिलें आहे,
त्याचा या समयिं मनीं बंधो ! अपुल्या विचार करि, पाहे.

---

## २. गृहस्थाश्रमधर्म.

( साकी )

नारदमुनिला प्रश्न विचारी ज्येष्ठ तनय कुंतीचा,
गृहासक्त पुरुषाला सांगे योग्य मार्ग मुक्तीचा.
मुनिवर सांगे, 'सत्संगतिनें मोक्षपदा जोडावें,
ममत्व तनुचे दारसुतांचें हळू हळू सोडावें.

मोक्ष मिळावा ऐसी इच्छा असेल ज्या पुरुषाला
कर्म हरीला अर्पुनि तेणें करणें तद्भजनाला.
यथासुखें गृहिं वास करावा चिंतुनियां भगवान,
साधु मुनी आदरें पुजावे देउनि त्यां बहु मान.
जनक—जननिचें ऋण फेडाया तद्धेतू पुरवावे,
सुहृदादिक जन जें जें मागति तें तें त्यांना द्यावें.
भाग्य होय जरि प्राप्त तरी करि दीनावरि उपकार,
कठोर भाषण न करी कोणा जरि आला अधिकार.
अतिथिपूजनीं दक्ष असावें सदा प्रसन्न मनानें
गुरु असतिल त्यां तुष्ट करावें तदीय पदनमनानें.
देव पितर संतुष्ट करावे पंचमहायज्ञानें,
तृप्त करावा अवशिष्टान्नें जठराग्नी सुज्ञानें.
परपीडा हें पातक मोठें आहे ऐसें मानी,
परसेवेमधिं थोर पुण्य हो असें जनीं कवि वानी.
जो धर्मानें नीतिनेंही वागे या जगतांत
मोक्ष तयाच्या, बा कौंतेया! राहतसे हातांत.'

---

## ३. मुरलीधर.

(साकी)

परिक्षितीला शुक मुनि सांगे दशमीं श्रीहरिलीला
दोहिं करांनीं अधरीं धरि तो कांचनमय मुरलीला.
श्रीहरि-चरणीं नमन करोनी सुंदर तनु अवलोकीं
भव तरण्याला उपाय दुसरा सत्य नसे या लोकीं.
अहर्निशीं कौतुक दावी तो गोकुळवासि जनाला,
धेनु चारितो वनांत त्याचा लागो ध्यास मनाला.
नंद-सूनुनें धेनु चारिल्या वर्णन भागवतांत
मुरलि वाजवुनि गोप मेळवी उभा राहि गवतांत

यमुनातटिं वृंदावनिं खेळे श्रीहरि गोपाळांसी,
योगी मुनिजन सदैव नमिती भावें तच्चरणांसी.
पूर्णब्रह्म श्रीहरि काळा पुतळा चैतन्याचा,
पुत्रत्वें नंदाच्या सदनीं वसे जनक विश्वाचा!
भक्तजनाला प्रियकर ऐसा कल्पवृक्ष वर साचा,
यमुनाह्रदिं कालियासि मर्दी श्रीहरि सावरसांचा.
मृत्तिकामिषें विश्वरूपही दावी तो जननीला
गोप-धेनुंचें रूप धरोनी भूषविही अवनीला.
अधरीं पावा धरुनि वाजवी अंग वांकडें ज्याचें,
काळि घोंगडी खांद्यावरती कंठिं हार गुंजांचे.
शकटधेनुकासुरांहि दिधली औदार्यें गति आर्या
यज्ञपरब्राह्मणान्न भक्षुनि अभय दिलें द्विजभार्यां.
मृत गो गोपां उठवुनि केलें स्वच्छ नदीसलिलाला.
निज गर्वाला सोडुनि सत्वर सागरिं सर्प पळाला.
मायावी पूतना तियेच्या हरिलें सत्वरिं प्राणां,
अज्ञेया श्रीहरिची माया, ती उमजेना कोणा.
मुनिच्या शापें सुत धनदाचे पादप होउनि थोर,
नंदद्वारीं उभे राहुनी दुर्गति भोगित घोर.
मुक्त कराया त्यां दामोदर जयासि लागे व्हावें,
'राधिका' प्रिया हीनमति तिनें तद्गुण किति वर्णावे?

---

## ४. दिव्य उद्यान.

( साकी )

स्फटिक मण्याचे रस्ते होते बांधिव सुंदर मोठे.
स्वच्छ जलाचे पाट वाहती झुळझुळ कोठें कोठें.
मोठे मोठे वृक्ष शोभती अशोक पुन्नागांचे,
इच्छित फल देणारे पिंपळ औदुंबरही साचे.

बोरि जांभळी तुती आंवळी बकुळी ठायीं ठायीं,
दोन बाजुंनीं वेतकमानी त्यांवरि पिंवळी जाई.
चंद्रविकासी सूर्यविकासी जलांत सुंदर कमळें
मधुर सुवासें गुंग होउनी भ्रमर तयांवरि खेळे!
सारस तित्तिर चक्रवाकही गरीब लावे असती,
मयूर पोपट मैना कोकिळ स्वच्छंदें किलबिलती
स्वभाव चंचल टाकुनि होती मधूमाक्षिका स्वस्थ,
भ्रमरांचा गुंजारव परिसुनि विहंग होति तटस्थ.
सुगंध शीतल मंद वायुनें होई सौख्य मनासी.
पापी निंदक देवद्रोही न दिसे स्थान तयांसी.
स्वच्छ जलाचे तलाव मोठे; तयांत कारंजाचे
उडाति फवारे जणुं मोत्यांचे तुरे उभविले साचे!
कांहिं कांसवें मीन पोहती कासारांत सुखानें.
वरूनि कांहीं पदार्थ पडतां झेलुनि घेति मुखानें.

---

## ‘कोणी तरी.’

—:o:—

### १. ‘भाउजी! वाट तुम्ही चुकलां!’

( चाल—दे हरी संतपदाची जोड. )

वाट तुम्ही चुकलां, भाउजी! वाट तुम्ही चुकलां! ॥ ध्रु० ॥
ऋषिचे आश्रम दिसाति न अजुनी,
होमधूम्र कां न दिसे नयनीं?
वेदघोष तो नचि ये श्रवणीं,
न सुचे कांहिं मला, भाउजी! वाट तुम्ही चुकलां! ॥ १ ॥
ऋषिपत्न्या मज दिसतिल केव्हां?
गंगेचें तिर मजला दावा,

लक्ष्मणा तुम्हीं शोध करावा,
स्वस्थ कसे बसलां ? भाउजी ! वाट तुम्ही चुकलां ॥ २ ॥

दुश्चिन्हें मज नयनीं दिसती,
धीर नसे किमपी मज चित्तीं,
निर्जन वन हें दिसतें पुढतीं,
फिरवा रथ अपुला, भाउजी ! वाट तुम्ही चुकलां ॥ ३ ॥

कैसे झाले मज डोहाळे,
मम दैवाचे विपरित चाळे,
काय कशी गत होइल न कळे,
रघुवर अंतरला; भाउजी ! वाट तुम्ही चुकलां ॥ ४ ॥

लक्ष्मण बोले कर जोडोनी,
रजकें निंदियलें परिसोनी
रामें त्यजिलें तुम्हांस वहिनी !
उपाय नचि याला; भाउजी ! वाट तुम्ही चुकलां ॥ ५ ॥

---

## २. जिह्वा.

( चाल—उद्धवा शांतवन कर जा० )

किति किती सांगु तुज रसने, नायकसी मम वचनाला ! ॥ धृ० ॥

तव लाड पुरविले किति मीं, पुत्राचे जेवीं जननी,
प्रिय तुजला जें जें व्हावें, मेळविलें तें बहुयत्नीं,
तुजला जें न रुचे कांहीं, दाविलें नसे मीं नयनीं,
ऐसें जरि केलें बाई !
झालीस बरी उतराई !
नायकसी माझें काई !
वद म्हणतां हरिनामाला, नायकसी मम वचनाला ! ॥ १ ॥

रुचि नेणे तुजविण कोणी, सखये, तूं चतुर शहाणी.
जगदीशें तुजला दिधली, बघ कैसी सुंदर वाणी !
शिणतोसि व्यर्थ मलभलती, बोलुनिया कर्मकहाणी !
सखये ! कां झालिस मूढ ?
कां तुला लागलें वेड !
श्री रामनाम वद गोड.
काशि आवड नुपजे तुजला ! नायकसी मम वचनाला ! ॥ २ ॥

---

## २. तुळशीवृंदावन.

( चाल—श्रीमंत पतीची राणी० )

सांडुनिया इतर उपावीं, तुळशीस भजावें आधीं ॥ धृ० ॥

हें सुंदर नरदेहाचें, वृंदावन किति मौजेचें !
पेरिलें श्रवणभक्तीचें, जणुं शांतिबी...
घालितें नित्य नियमाचें, हें उदक ...
अजवरी पाहिली वाट,
अंकूर दिसेना नीट,
जाहली निराशा स्पष्ट,
धरि धैर्य म्हणे, सद्बुद्धि, नचि निराश होई आधीं ॥ १ ॥
करुं नको खंत इतुक्यांत, ठाउकी नसे तुज मात,
हा क्रोध–किडा बघ त्यांत, अंकूर भक्षि दिनरात,
जरि त्याचा करिशिल घात, पुरतील तुझे मग हेत.
हा क्रोध-कीट नच हाले,
तुळसिचें रोप नच आलें,
वृंदावन वायां गेलें !
आशा मुळांत न ये सखी, लागली जिवाला व्याधी ॥ २ ॥

समाप्त.

REFBK-0002136
२१३६